# Minor Research Project

## Contribution of Women in Vidarbha in 1942 Quit India Movement – A Historical Study

Submitted To

**University Grant Commission**

**Western Regional Office, Pune**

For

**Financial Assistance Under 11th Plan Period**

Through

**Sant Gadge Baba Amravati University,**

**Amravati**

Submitted By

**Dr. Govind M. Tirmanwar**

Associate Professor (History)

**Late Dattatraya Pusadkar Arts College,**

**Nandgaon Peth Tq. Dist – Amravati**

# Certificate

This is to certify that Dr. Govind M. Tirmanwar has worked on "Contribution of Women in Vidarbha in 1942 Quit India Movement – A Historical Study" for the Minor Research Project to be submitted University Grant Commission Western Regional Office Pune.

This work is entirely his own, and that the dissertation has not formed the basis for the award previously of any degree, diploma, associate ship, fellowship or and other similar title.

Place : Nandgaon Peth
(Amravati)
Date :

**Dr. V. D. Darne**
Principal
Late Dattatraya Pusadkar Arts,
College, Nandgaon Peth

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की, **'१९४२ च्या चले जाव चळवळीत विदर्भातील स्त्रियांचे योगदान - एक ऐतिहासिक अध्ययन'** हा लघुशोध प्रबंध विद्यापीठ अनुदान आयोग, पश्चिम विभागीय केंद्र, पुणे यांना मी स्वत: लिहून प्रथमच सादर करीत आहे.

प्रस्तुत लघुशोध प्रबंध मी यापुर्वी कोणत्याही संस्थेस अथवा कोणत्याही विद्यापीठास कोणत्याही परीक्षेसाठी, पदवीसाठी, अनुदानासाठी सादर केलेला नाही.

**नांदगाव पेठ** (अमरावती)

**दिनांक :**

**संशोधक**

**डॉ. गोविंद मा. तिरमनवार**

सहयोगी प्राध्यापक-इतिहास
स्व दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय,
नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती

# ऋणनिर्देश

**'१९४२ च्या चले जाव चळवळीत विदर्भातील स्त्रियांचे योगदान'** या विषयावरील लघुशोधप्रबंध पूर्णत्वास जाण्यासाठी ज्यांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले त्यांचे आभार मानने हे मी माझे आद्य कर्तव्य मानतो.

सर्वप्रथम विद्यापीठ अनुदान आयोगाने मला संधी देवून लघुशोधप्रबंधासाठी अनुदान दिले, माझ्यावर विश्वास टाकला याबद्दल आयोगाचा मी ऋणी आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने लघु शोधप्रबंधाचा प्रस्ताव अनुदानासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविला त्याबद्दल त्यांचेही मनापासून आभार मानतो.

महाविद्यालयाचे व्यवस्थापन मंडळीने दिलेले प्रोत्साहन कार्यपूर्तीसाठी महत्वाचे ठरले. मा. अध्यक्ष श्री. सोमेश्वर पुसतकर, सचिव श्री. श्रीकृष्णजी बाळापुरे, संचालक श्री. ज्ञानेश्वर हिवसे व श्री. निदानभाऊ बारस्कर या सर्वांनी वेळोवेळी दिलेले प्रोत्साहन व केलेले योग्य मार्गदर्शन यासाठी मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे यांचा भक्कम पाठिंबा संशोधन कार्य पूर्ण करतांना मनोबल वाढविणारे होते. लघुशोध प्रबंधासाठी आवश्यक असलेल्या सर्व तांत्रिक बाबींची पुर्तता सरांनी अत्यंत सहजपणे करुन दिल्यामुळे कार्य सुलभ झाले. त्यामुळे त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

नागपूर येथील इतिहास संशोधन केंद्राचे संस्थापक आणि माझे मार्गदर्शक डॉ.भा.रा. अंधारे यांनी अनेक बाबतीत केलेले मार्गदर्शन व दिलेली मदत खूप मोलाचे आहे, त्यांचे ऋण शब्दातून व्यक्त करता येत नाही. संशोधन कार्यासाठी विविध अभिलेखागार, संग्रहालय, ग्रंथालये यांना भेटी देण्यात आल्या. तेथील सर्व व्यवस्थापकांचे त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मनापासून आभार. विदर्भातील विविध गावातील

स्वांतत्र्य सैनिकांच्या वंशजांनी संशोधन विषयाच्या माहितीसाठी भरपूर सहकार्य केले त्याबद्दल त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करतो.

महाविद्यालयाचे ग्रंथपाल विकास अडलोक यांनी लघुशोध प्रबंधाचा प्रस्ताव तयार करण्यापासून तर प्रबंध पूर्ण होईपर्यंत विशेष सहकार्य केले. त्यांच्या सहकार्याशिवाय सदर लघुशोधप्रबंध पूर्ण होणे शक्य नव्हते. त्यांच्या सहकार्याबद्दल त्यांचे विशेष आभार. डॉ.पी.आर. जाधव यांनी लघुशोधप्रबंधाचे लेखन खऱ्या अर्थाने शुध्द करण्याचे काम आवडीने करुन दिल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. माझे इतिहास विषयाचे सर्व प्राध्यापक मित्र, महाविद्यालयातील प्रा. आर. टी. ब्राम्हणे, डॉ. श्रीकांत माहूलकर, डॉ. सौ. सुनिता बाळापुरे, डॉ. सुभाष पवार, डॉ. पंकज मोरे, शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. ज्ञानेश्वर बारस्कर, राहुल पांडे, विनायक पावडे, दिलीप पारवे या सर्वांनी आवश्यक ते सहकार्य केले. त्याबद्दल त्या सर्वांचे आभार. तसेच श्री. अनिल डोंगरे यांनी अल्पावधीत लघु शोधप्रबंध टंकलिखित करुन दिल्याबद्दल त्यांचे विशेष आभार.

माझ्या आई-वडीलांचा भरपूर आशीर्वाद लघु शोधप्रबंधाच्या पूर्णत्वासाठी महत्त्वाचा ठरला. सोबतच पत्नी सौ. छाया, चि. आयुष, कु. सई, पुतण्या आदित्य या सर्वांनी घरात लिखाणाला पोषक वातावरण ठेवल्यामुळे संशोधन कार्याला गती आली. या सर्वांसह या शोध कार्यासाठी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचा मी आभारी आहे.

संशोधक

**डॉ. गोविंद मा. तिरमनवार**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | • प्राचार्याचे प्रमाणपत्र<br>• संशोधकाचे प्रतिज्ञापत्र<br>• ऋणनिर्देश<br>• अनुक्रमणिका | ii<br>iii<br>iv<br>vi<br>vii |
| | • प्रस्तावना | |
| १ | • प्रकरण पहिले - पार्श्वभूमी | १-१६ |
| २ | • प्रकरण दुसरे - नागपूर जिल्हयातील स्त्रियांचे योगदान | १७-२४ |
| ३ | • प्रकरण तिसरे - वर्धा जिल्हयातील स्त्रियांचे योगदान | २५-३९ |
| ४ | • प्रकरण चवथे - चंद्रपूर जिल्हयातील स्त्रियांचे योगदान | ४०-५१ |
| ५ | • प्रकरण पाचवे - भंडारा जिल्हयातील स्त्रियांचे योगदान | ५२-५७ |
| ६ | • प्रकरण सहावे - अमरावती जिल्हयातील स्त्रियांचे योगदान | ५८-६६ |
| ७ | • प्रकरण सातवे - अकोला जिल्हयातील स्त्रियांचे योगदान | ६७-८३ |
| ८ | • प्रकरण आठवे - यवतमाळ जिल्हयातील स्त्रियांचे योगदान | ८४-९० |
| ९ | • प्रकरण नववे - बुलडाणा जिल्हयातील स्त्रियांचे योगदान | ९१-९६ |
| १० | • प्रकरण दहावे - उपसंहार | ९७-१०३ |
| | • संदर्भ सूची | १०४-११० |

# प्रस्तावना

आधुनिक भारताच्या इतिहासातील व भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील एक महत्वपूर्ण टप्पा म्हणजे १९४२ ची 'चलेजाव चळवळ' किंवा 'भारत छोडो' आंदोलन होय. भारताला संपूर्ण स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या भारतीय जनतेने 'करु अथवा मरु' या प्रेरणेने हे आंदोलन गतिमान केले. सर्वव्यापी अशा या अंतिम लढ्यात भारतातील स्त्रियांचा सहभाग महत्त्वपूर्ण होता. या चळवळीनंतरच खऱ्या अर्थाने भारतातील ब्रिटीशांची सत्ता संपुष्टात येण्याच्या व भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली.

१९४२ च्या 'चलेजाव' चळवळीत विदर्भाचे महत्त्वाचे योगदान होते. विदर्भातील असामान्यापासून तर सामान्य जनतेपर्यंत या लढयाचे लोण पसरले होते. नेत्यांच्या अटकेनंतर सर्वसामान्यांनी उत्स्फुर्तपणे चळवळ सुरु केली. चिमूर, आष्टी, यावली, बेनोडा येथील वीरांनी दिलेले लढे राष्ट्रीय स्तरावर गाजले. विदर्भातील अनेक स्त्रियांनी या लढयात उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला. तुरुंगाची पर्वा न करता अनेक स्त्रियांनी जोखीम पत्करुन हिंसक कारवायांना हातभार लावला तर अनेक स्त्रियांनी पिछाडीची कामे करुन चळवळीला मदत केली. भूमिगतांना स्त्रियांनी केलेली मदत स्वातंत्र्य प्राप्तीच्या दृष्टीने मोलाची ठरली. ब्रिटीशांच्या दडपशाहीला न जुमानता विदर्भातील शिक्षीत, अशिक्षीत, उच्च व सामान्य घराण्यातील आणि तळागाळातील असंख्य स्त्रियांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्त्या या चळवळीत भाग घेवून ब्रिटीशांविरुध्द अत्यंत महत्वाची कामगिरी केली.

चलेजाव चळवळीत उत्स्फुर्तपणे सहभागी झालेल्या विदर्भातील स्त्रियांनी पराक्रम गाजवून स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासात आपले नाव अमर केले, या सर्व कर्तृत्ववान व पराक्रमी स्त्रियांच्या कार्याचा सखोलपणे अभ्यास करण्यासाठी आणि या चळवळीत पडद्याआडून महत्त्वाची भूमिका बजाविणाऱ्या तसेच ज्यांचे कार्य अजूनही इतिहासाला ज्ञात नाही अशा पराक्रमी स्त्रियांचे कार्य प्रकाशात आणण्यासाठी प्रस्तुत विषय या संशोधनासाठी घेण्यात आला.

सदर विषयाचे संशोधन अत्यंत प्रामाणिक व शास्त्रीय पध्दतीने करुन विदर्भातील स्त्रियांच्या १९४२ च्या चलेजाव चळवळीतील कामगिरीवर सखोलपणे प्रकाश टाकण्यात आला आणि सर्व स्तरातील स्त्रियांच्या कामगिरीचे विस्तुत विवेचन या लघुशोध प्रबंधात केलेले आहे.

## प्रकरण - पहिले

# पार्श्वभूमी

भारतात इंग्रजांची सत्ता स्थापन झाल्यापासून भारताच्या वेगवेगळया प्रदेशातील आणि वेगवेगळया स्तरावरील भारतीय नागरिकांनी परकीय इंग्रजी सत्तेचा सशस्त्र प्रतिकार केला. इ.स. १८५७ मध्ये इंग्रज सत्तेच्या उच्चाटनासाठी भारतीयांनी प्रचंड संग्राम केला परंतू १८५७ चा संग्राम अनेक कारणांमुळे अपयशी ठरला आणि त्यापुढे भारतात इंग्रजांची सत्ता दुढमूल झाली. या दरम्यान भारतात राष्ट्रवादाचा उदय झाला. भारतीयांनी पाश्चात्य राज्यकर्त्यांकडून न्याय अधिकार मिळावेत या हेतूने राष्ट्रीय सभा स्थापन केली. सुरवातीला मवाळ असणारी राष्ट्रीय सभा लोकमान्य टिळक व त्यांच्या जहाल सहकाऱ्यांच्या प्रेरणेने जहाल राष्ट्रवादी बनू लागली.

लोकमान्य टिळकांच्या निधनाने १९२० पर्यंत टिळक युग समाप्त होऊन हिंदुस्थानात महात्मा गांधींच्या युगास प्रारंभ झाला. आधुनिक भारताच्या इतिहासात १९२० हे वर्ष अनन्यसाधारण महत्त्वाचे ठरते. या वर्षी भारतीय स्वातंत्र्य संग्रामाला नवे वळण लागले आणि भारतीय स्वातंत्र्य संग्रामात आघाडीला असलेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या कार्यपध्दतीला नवी दिशा मिळाली. १९२० नंतर महात्मा गांधीजींनी हिंदुस्थानात ज्या ज्या चळवळी घडवून आणल्या त्या सर्व चळवळींची पूर्व तयारी एका परीने लोकमान्य टिळकांमुळे झाली. टिळकांनी जहाल तत्वज्ञानाचा आणि जहाल मार्गाचा पुरस्कार केला होता, परंतू काँग्रेसने प्रत्यक्षात प्रत्यक्ष प्रतिकाराचा कार्यक्रम हाती घेतला नव्हता. परंतु ब्रिटीश सरकारने भारतीय जनतेवर इतकी दडपशाही केली होती की, भारतीय जनतेला आता प्रत्यक्ष प्रतिकाराचा कार्यक्रम हाती घेण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. अशा स्थितीत काँग्रेसला खरे नेतृत्व दिले असेल तर ते महात्मा गांधींनी. १९२० नंतरच्या भारतातील राष्ट्रवादी चळवळीला खऱ्या अर्थाने जन आंदोलनाचे स्वरुप प्राप्त झाले. या कालावधीत काँग्रेसबरोबरच इतर अनेक गट

राष्ट्रीय आंदोलनात उतरले असले तरी सर्वसामान्य भारतीयांना राष्ट्रीय आंदोलनात ओढण्यात सिंहाचा वाटा गांधीजींच्या नेतृत्वाखालील कृतिप्रवण काँग्रेसचा होता. महात्मा गांधीजींनी १९२० मध्ये असहकार चळवळ सुरु केली. पुढे सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु केली. देशातल्या सर्वसामान्य लोकांनी या दोनही चळवळीत उत्साहाने भाग घेतला. महात्मा गांधीजींच्या या आंदोलनाला जनआंदोलनाचे स्वरुप प्राप्त झाले. भारतीयांच्या आंदोलनाला न जुमानता ब्रिटीश सरकारने आपले दडपशाहीचे धोरण सुरुच ठेवले. भारतीयांच्या मागण्यांकडे त्यांनी दुर्लक्ष केले. त्यामुळे महात्मा गांधीजींना ब्रिटीशांविरुध्द निर्णायक भूमिका घ्यावी लागली. ब्रिटीशांशी अखेरचा लढा देण्याचा, निर्णय महात्मा गांधींनी घेतला आणि त्यानुसार १९४२ मध्ये 'चले जाव' चळवळ सुरु केली.

१९४२ ची 'चले जाव चळवळ' किंवा 'भारत छोडो' हा लढा भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासातील अतिशय व्यापक स्वरुपाचा शेवटचा लढा होता. १८५७ पासून ते १९४२ पर्यंत लढल्या गेलेल्या स्वातंत्र्याच्या सर्व लढयात या लढयाचे स्वरुप जास्त सखोल, तीव्र व राष्ट्रव्यापी होते. 'भारत छोडो' हे घोषवाक्य, असलेल्या या लढयात गांधीजींनी दिलेल्या 'कृती करा व मरण पत्करा' या मंत्राने प्रेरित झालेल्या हजारो सर्वसामान्य स्त्री-पुरुष, लहान मुले या लढयात उतरले.[१]

१ सप्टेंबर १९३९ रोजी जर्मनीने पोलंडवर आक्रमण केल्याने दुसऱ्या महायुध्दाला सुरवात झाली. ३ सप्टेंबर १९३९ रोजी इंग्लंडने जर्मनीविरुध्द घोषणा केली. त्याच अनुरोधाने त्याच दिवशी भारताचे गर्व्हनर जनरल लॉर्ड लिनलिथगो यांनी भारतही युध्दात सामील झाले असल्याचे घोषीत केले. पहिल्या महायुध्दाच्या काळात इंग्लंडच्या युध्दकार्याला भारतीयांचे जसे सहकार्य, मिळाले तसे यावेळीही मिळेल अशी ब्रिटीश राज्यकर्त्यांची अपेक्षा होती परंतू ती भ्रामक ठरली. पहिल्या महायुध्दाच्या काळात इंग्लंडला सर्वतोपरी मदत करुनही ब्रिटीश राज्यकर्त्यांनी त्याचा योग्य तो मोबदला भारतीयांच्या पदरी टाकला नाही. त्यावेळी भारतीयांना दिली गेली ती सदोष अशी द्विदल शासनपध्दती आणि

त्याहीपेक्षा अपमानकारक असा रौलेट कायदा आणि जालियनवाला बाग हत्याकांड या आठवणी भारतीय नेते विसरले नव्हते. शिवाय १९१९ नंतर भारतात प्रचंड राजकीय जागृती झाली होती. जनतेच्या सुप्त स्वातंत्र्याकांक्षा प्रज्वलित झाल्या होत्या व त्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची त्यांची तयारी झाली होती. अशा स्थितीत भारतीय नेत्यांना विश्वासात न घेता गर्व्हनर जनरलने केलेली घोषणा म्हणजे भारतीयांची अवहेलना होती.[२]

लॉर्ड लिनलिथगो यांच्या ३ सप्टेंबरच्या घोषणेमुळे काँग्रेसपुढे मोठा पेच उपस्थित झाला. ब्रिटीश साम्राज्याच्या रक्षणासाठी इंग्लंड करणार असलेल्या युध्दात काँग्रेसला रस नाही, अशा युध्दात भारत इंग्लंडला सहकार्य देणार नाही अशी काँग्रेसची भूमिका यापूर्वी अनेकदा विशद करण्यात आली होती. परंतू त्याचबरोबर काँग्रेसचा नाझीवादालाही प्रखर विरोध होता. ब्रिटीशांना महायुध्दात सहकार्य करायचे की नाही या समस्येवर विचारविनिमय करण्यासाठी वर्धा येथे काँग्रेस कार्यकारिणीची ९ सप्टेंबर १९३९ रोजी बैठक सुरु झाली. पाच दिवसांच्या प्रदीर्घ चर्चेनंतर इंग्लंडने आपले युध्दहेतू आणि भारताबाबतची आपली भूमिका विशद केल्याखेरीज काँग्रेस इंग्लंडच्या युध्दकार्याला पाठिंबा देवू शकणार नाही अशा आशयाचा ठराव काँग्रेसच्या बैठकीत पास करण्यात आला. काँग्रेसच्या या आवाहनाला प्रतिसाद देण्याची ब्रिटीश राज्यकर्त्यांची तयारी नव्हती. परंतू भारतीय नेत्यांना पूर्णत: डावलून चालणार नाही याची जाणीव असल्यामुळे व्हाईसरॉयने भारतीय नेत्यांशी चर्चा करुन १७ ऑक्टोंबर १९३९ भारताविषयीचे आपले धोरण घोषित केले.[३] या धोरणाने भारतीय नेत्यांचे समाधान झाले नाही. काँग्रेसच्या केंद्रीय व प्रांतिक मंत्रिमंडळांनी राजीनामे दिलेत.[४]

पुढे काँग्रेसने युध्दकाळात देशात हंगामी राष्ट्रीय सरकार प्रस्थापित करण्याची आणि महायुध्द समाप्तीनंतर भारताला स्वातंत्र्य देणार असल्याचे सरकारने घोषीत करावे अशा स्वरुपाची मागणी ब्रिटीशांकडे केली. काँग्रेसच्या या मागणीला प्रत्युत्तर म्हणून गर्व्हनर जनरलने ८ ऑगस्ट १९४० रोजी एक घोषणा केली.[५] या घोषणेने महायुध्दानंतर वसाहतिक

स्वराज्य दिले जाईल किंवा नाही आणि भारताची भावी राज्यघटना तयार करण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व भारतीयांवर टाकले जाईल की नाही, या कॉंग्रेसने उपस्थित केलेल्या मुद्यांवर कोणताच प्रकाश न टाकल्यामुळे कॉंग्रेसने ही घोषणा साहजिकच फेटाळली. तडजोडीच्या मार्गावरुन सक्रीय असहकाराच्या मार्गाकडे कॉंग्रेस पुन्हा वळली. लढयाचा अंतिम निर्णय घेऊन कॉंग्रेसने चळवळ सुरु करताच ब्रिटीशांनी दडपशाही सुरु केली आणि दुसरीकडे भारतीय जनतेकडून युध्दकार्याला जास्तीत जास्त मदत मिळविण्यासाठी दडपण आणले जावू लागले. अशा तणावाच्या स्थितीत गांधीजींच्या सांगण्यावरुन कॉंग्रेस कार्यकारिणीने वैयक्तिक सत्याग्रह सुरु करण्याचे ठरविले. वैयक्तिक सत्याग्रह सुरु करणारे पहिले सत्याग्रही जवाहरलाल नेहरु होते.[६] त्यांना चार वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. पुढे या सत्याग्रहाची व्याप्ती वाढली. डिसेंबर १९४१ अखेरपर्यंत चाललेल्या या अपूर्व आंदोलनाच्या काळात २६००० च्या वर सत्याग्रहींना अटक करण्यात आली. या आंदोलनाचा सरकारच्या युध्दकार्यावर फारसा प्रतिकुल परिणाम झाला नाही. परंतू लोकमत तयार करण्यास व जनतेच्या राष्ट्रीय भावना प्रज्वलित करण्यास मदत झाली. शांततापूर्ण अहिंसक वैयक्तिक सत्याग्रहाच्या मार्गाने महात्मा गांधी ब्रिटीश साम्राज्याविरुध्द लोकमत भडकवीत होते व त्याद्वारा पुढील संघर्षाची पार्श्वभूमी तयार करीत होते.[७]

या दरम्यान द्वितीय महायुध्दाची व्याप्ती झपाटयाने वाढली. डिसेंबर १९४१ च्या प्रारंभी जपान-अमेरिका युध्द भडकले. त्याचबरोबर आग्नेय आशियातील युध्द आघाडीचे चित्र पार बदलले. चीनवरची आपली पोलादी पकड घट्ट करीत जपानी सैन्य वादळी वेगाने आग्नेय आशियातील फ्रेंच डच व ब्रिटीश वसाहतींचा ताबा घेत भारताच्या दिशेने आगेकूच करु लागले. आशियातील महायुध्दाच्या ज्वाला भारताच्या सीमेपर्यंत येण्याची स्पष्ट लक्षणे दिसू लागली. अशा स्थितीत ब्रिटीशांना भारतीयांच्या सहकार्याची नितांत आवश्यकता वाटू लागली. भारतीयांचे सहकार्य मिळविण्यासाठी ब्रिटीश सरकारने २३ मार्च १९४२ रोजी सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांना भारतात पाठविले. क्रिप्सने सर्व प्रमुख भारतीय नेत्यांच्या भेटी घेवून

भारताबाबची आपली योजना जाहीर केली. परंतू काँग्रेसने आणि इतर मुत्सद्यांनी क्रिप्स योजना फेटाळून लावली.

क्रिप्स शिष्टाई असफल ठरल्यामुळे देशाच्या राजकीय प्रगतीचा मार्ग अवरुध्द झाला आणि काँग्रेसमध्येच नव्हे तर संपूर्ण देशात निराशेचे, संभ्रमाचे वातावरण पसरले. अशा नैराश्यपूर्ण वातावरणाला छेद देण्यासाठी महात्मा गांधीजी पुढे सरसावले आणि त्यांनी आपल्या लिखाणातून ब्रिटीश राज्यकर्त्यांवर आग पाखडू लागले आणि त्याद्धारा व्यापक लढयासाठी जनमत उत्तेजीत करण्याची तयारी करु लागले. या काळात गांधीजींनी आपल्या सर्व लिखाणातून ब्रिटीशांनी भारत सोडून जाणे निकडीचे वाटत असल्याचा सूर मांडला. ब्रिटीश भारतातून स्वेच्छेने गेले तर ठीकच, नाहीतर भारतीयांनी त्यांना घालवून देण्यासाठी चळवळ करावी असेही सूतोवाच त्यांनी करुन ठेवले. याच विचाराला 'छोडो भारत' असे घोषणारुप पुढे मिळाले. केवळ हरिजनमध्ये नाही, तर परकीय पत्रकारांशी बोलतांनाही त्यांनी हा विचार तपशीलात मांडण्याचे सत्र सुरु केले.[८]

अखेरीस ६ जुलै १९४२ रोजी वर्धेला झालेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत 'चले जाव' ठराव एकमताने पास झाला. या ठरावावर मुंबईला ७ ऑगस्ट रोजी भारताच्या काँग्रेसच्या खुल्या अधिवेशनात शिक्का मोर्तब व्हावयाचे होते. काँग्रेसच्या नव्हे तर देशाच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासातील काँग्रेस अधिवेशन मुंबईला ७ ऑगस्ट रोजी सुरु झाले. मौलाना आझाद अधिवेनशाच्या अध्यक्षपदी होते. गोवलिया तलाव मैदानावरील भव्य मंडपात सदस्यांची व श्रोत्यांची गर्दी उसळली होती. मौलाना आझाद आणि महात्मा गांधीजींच्या भाषणानंतर जवाहरलाल नेहरुंनी 'छोडो भारत' चा ठराव मांडला व सरदार पटेलांनी त्याला पुष्टी दिली. दुसऱ्या दिवशी म्हणजे ८ ऑगस्टला 'भारत छोडो' चा ठराव बहुमताने पास झाला. त्यानंतर त्र्याहत्तर वर्षाच्या गांधीजींनी सुमारे दोन अडीच तास ओजस्वी भाषण केले. भाषणादरम्यान गांधीजींनी आगामी संघर्षाच्या उद्दिष्टाविषयी व स्वरुपाविषयी विवेचन करतांना म्हटले की, यावेळी चळवळीचे उद्दिष्ट केवळ कायदेभंगाचे

नसून, परकीय गुलामगिरीच्या बेडया तोडण्याचे व स्वातंत्र्यप्राप्तीचे आहे, त्यामुळे हा लढा केवळ काँग्रेसचा नसून सर्व भारतीयांचा लढा राहणार आहे, समाजातील सर्व व्यवसायाच्या व स्तराच्या लोकांनी त्यात सामील व्हावयाचे आहे, स्वातंत्र्यासाठी कोणतेही अग्निदिव्य करण्याची जनतेने तयारी ठेवावी, संकल्पित लढा शक्य तो अहिंसक असावाअसे सांगत असतांना, या क्षणापासून सर्व भारतीयांनी आपण स्वतंत्र झालो आहोत, असे समजावे आणि 'करेंगे या मरेंगे' या निर्धाराने चळवळ चालवावी, असा मंत्रही दिला. ८ ऑगस्ट १९४२ ला रात्री चलेजाव चा जो ठराव पास झाला, त्यात चळवळ सुरु करण्याची कारणमीमांसा, ब्रिटीश गेल्यावर प्रस्थापित करावयाच्या शासनव्यवस्थेची रुपरेषा, महायुध्दात दोस्तांना मदतीचे आश्वासन, तसेच जागतिक शांतीसंघटना प्रस्थापित करण्यास व निशस्त्रीकरणास समर्थन या मुद्यांचा अंतर्भाव होता.[९]

'करेंगे या मरेंगे' या निर्धाराने महात्मा गांधीजींनी चले जाव चळवळीला सुरवात करताच ९ ऑगस्ट १९४२ रोजी पहाटे पाच वाजून दोन मिनिटांनी मुंबईचे पोलीस आयुक्त बटलर आपल्या सहकाऱ्यांसह बिर्ला भवनात आले आणि त्यांनी गांधीजी व महादेवभाई देसाई यांना अटक केली. सकाळी साडेसहापर्यंत काँग्रेस कार्यकारीणीच्या सदस्यांसकट सर्व प्रमुख काँग्रेस नेत्यांची धरपकड करण्याची योजना सरकारने आधीच आखली होती. रात्रीपासून टेलिफोन बंद करण्यात आले होते. सकाळी सात सव्वासातपर्यंत पकडल्या गेलेल्या ५४ पुढाऱ्यांमध्ये आणि प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये शंकरराव देव, स.का. पाटील, मुंबईचे महापौर युसूफ मेहरअली, अशोक मेहता, शांताबाई वेंगसकर, श्रीमती किसन घुमटकर वगैरे महाराष्ट्रातील मंडळींचा समावेश होता.[१०]

एकूणच ब्रिटीश सरकारने महात्मा गांधीजीसह राष्ट्रसभेचे प्रमुख पुढारी आणि जिल्हयाजिल्हयातून पसरलेले तिचे कार्यकर्ते सुमारे वीस हजार लोक कोणताही विशिष्ट आरोप न ठेवता किंवा कोणतीही चौकशी न करता एकदम पकडून तुरुंगात नेऊन ठेवले. यामुळे जनता गोंधळून जाईल आणि तिला मार्गदर्शन करण्याला कोणीही न उरल्याने चार-

आठ दिवसात जनतेच्या अंत:करणात निर्माण झालेला क्षोभ आपणांस दडपशाहीच्या जोरावर शांत करता येईल, अशी ब्रिटीश सरकारची अपेक्षा होती, परंतू ती अपेक्षा सफल होणे शक्य नव्हते कारण महात्मा गांधीजी हे सुमारे पंचवीस वर्षे जनतेला निरनिराळ्या रुपांनी सरकारविरुध्द नि:शस्त्र प्रतिकार करण्याचा धडा देत होते.[११]

ज्या दिवशी महात्मा गांधीजींना व इतर पुढाऱ्यांना पकडण्यात आले, त्यानंतर एक दोन दिवसात सरकारने ठिकठिकाणी केलेल्या राजबंदीच्या धरपकडीमुळे आणि त्यांच्या निषेधार्थ जनतेने जी शांततेची निदर्शने केली, त्या शांततेच्या निदर्शनावर केलेल्या गोळीबारामुळे ही बातमी देशाच्या सर्व कानाकोपऱ्यात जावून पोहोचली. सर्व देशातील जनता एकदम खडबडून जागी झाली आणि ब्रिटीश राज्यकर्त्यांविरुध्द खवळून तिने उघड बंडच पुकारले.[१२]

९ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधीजी व राष्ट्रसभेचे प्रमुख नेते यांना बंदिखान्यात नेऊन ठेवल्यानंतर मुंबईत अ.भा. राष्ट्रसभा समितीच्या काही सभासदांनी ताबडतोब एक गुप्त बैठक भरविली आणि देशातील जनतेला शांततेच्या क्रांतीचा एक बारा कलमी कार्यक्रम आखून देवून तो ताबडतोब खेडोपाडी पोहोचेल अशी व्यवस्था केली. हा बारा कलमी कार्यक्रम पुढीलप्रमाणे होता.

१) सर्व देशभर एक सार्वजनिक हरताळ शांततेने पाळण्यात यावा. सायंकाळी सभा भरवून 'चले जाव' या राष्ट्रसभेचा संदेश जनतेला कळविण्यात यावा. जरी या सभांवर बंदी घालण्यात आली तरी ती बंदी मोडून सभा घ्याव्यात. २) ज्या ज्या ठिकाणी मीठ तयार करणे शक्य असेल त्या त्या ठिकाणी मिठासंबंधीचे कायदे मोडून मीठ तयार करण्यात यावे. ३) खेडयातील सर्व जनतेने सरकारी अधिकाऱ्यांशी व राज्ययंत्राशी पूर्ण असहकार करावा. ४) सोळा वर्षावरील सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षण संस्था सोडून या क्रांतीच्या कार्यात सामील व्हावे. ५) सर्व सरकारी अधिकाऱ्यांनी आपल्या नोकऱ्या सोडाव्यात. ६) देशातील सैनिकांनी लोकांवर लाठी हल्ला करणे, अश्रुवायू सोडणे किंवा शांततेच्या सभा व मिरवणूकी

यांच्यावर गोळीबार करणे अशा प्रकारचे हुकूम त्यांना देण्यात आले, तर त्यांनी ते हुकूम पाळू नयेत. ७) जे संस्थानिक या लढयात जनतेच्या बाजूने सामील होतील त्यांना सामील करुन घ्यावे आणि जे जनतेविरुध्द परकीय सरकारशी सहकार्य करतील. त्यांच्याविरुध्द तेथील प्रजेने क्रांती पुकारावी. ८) स्त्रियांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घ्यावा. ९) देशातील सर्व स्त्री पुरुषांनी 'करेंगे या मरेंगे' या वृत्तीने या लढ्यात स्वातंत्र्य तरी मिळवू किंवा नष्ट होवू असे म्हणून सामील व्हावे. १०) हा लढा हिंदू, मुसलमान, शीख, पारशी, आणि ख्रिस्ती अशा सर्व धर्मीयांचा आहे. त्यात सर्वांनी जाती धर्मभेद विसरुन आपापले कर्तव्य करण्यास पुढे यावे. ११) महात्मा गांधींना पकडल्यामुळे हिंदुस्थानातील प्रत्येक स्त्री व पुरुष आता या लढ्याचे नेते बनले आहेत. 'जय किंवा मृत्यू' हेच आमचे ब्रीद आता बनले पाहिजे. जोपर्यंत गांधीजी तुरुंगात आहेत, तोपर्यंत कोणीही विश्रांती घेता कामा नये, प्रत्येक मनुष्य हाच स्वत:चा नेता बनला पाहिजे. प्रत्येक प्रांताने अहिंसा पाळून आपल्या परिस्थितीस अनुरुप असा कार्यक्रम आखून घ्यावा आणि स्वतंत्रपणे तो अंमलात आणावा. १२) अखेरीस महात्मा गांधीजींना प्रिय असलेले सूत कातण्याचे कर्तव्य करण्यास विसरु नये.[१३]

वरील बारा कलमी कार्यक्रम आणि संदेश खेडोपाडी पोहोतचाच ठिकठिकाणी प्रचंड मोर्च आणि निदर्शने निघू लागली. निषेधपर सभा झाल्या. मोठया औद्योगिक केंद्रातील कामगार संपावर गेले. महाविद्यालयीन तरुण तरुणीच नाही तर शाळकरी मुलेही हातात तिरंगा फडकावीत चले जाव च्या घोषणा देत रस्तोरस्ती मिरवणूका काढतांना दिसू लागली. महिला तर मोठया संख्येने सक्रिय होत्या. अशा शांततापूर्ण निदर्शकांवर सरकारने जेव्हा लाठी हल्ले केले, अगर जमाव पांगवायला अश्रुधूर सोडला, तेव्हा लोकांचा खदखदत असलेला संताप उफाळून आला आणि लोक बेडरपणे आक्रमक बनले. पोलीसांवर त्यांच्या वाहनांवर, सरकारी कार्यालयावर दगडफेक करणे, रस्तोरस्ती पोलीस वाहनांना अडवायला दगड व लाकडे आणून ठेवणे, घरांच्या खिडक्यांतून पोलीसांवर मारा करणे, सरकारी इमारतीवर तिरंगा लावणे, भारतीय शासकीय अधिकाऱ्यांना गाधी टोप्या घालायला लावणे,

अशा मार्गाचा अवलंब लोक करु लागले. अहमदाबाद, कलकत्ता, अलाहाबाद, पाटना इत्यादी मोठया शहरातील अधिकाऱ्यांनी पाठविलेल्या वृत्तांवरुन असे दिसते की, तेथे ब्रिटीशाविरोधी कृत्ये मोठया शिताफीने व नियोजीत पध्दतीने लोक करत. पोलीस येण्याचा सुगावा लागला की, लपून बसत आणि ते गेले की, पुन्हा आक्रमक कारवायांसाठी पुढे येत. ही लाट एखाद्या आठवडयात ग्रामीण भागातही पसरली, भिंती भिंतीवर 'चले जाव' घोषणा झळकू लागल्या. तिथे शेतकरी आणि आदिवासींही लढयात उतरले. त्यांच्या हाती एरवी असलेल्या काठया, कुठे कोयते तर ही शस्त्रे बाहेर काढायला त्यांनी कमी केले नाही. या लोकांनी ग्रामीण भागात काही ठिकाणी पोलीस चौक्या, ताब्यात घेतल्या आणि तेथील शस्त्रे पळविली. त्यामुळे पोलीसांचे नीतिधैर्य खचले. या काळात बिहार, संयुक्तप्रांत, गुजरात इत्यादी प्रांतातील अधिकाऱ्यांनी ती परिस्थिती हाताबाहेर गेली असल्याची स्पष्ट कबुली दिली. तसेच प्रत्यक्ष हल्ले कार्यकर्त व तरुण करीत असले, तरी त्यांना शेतकरी व इतर खेडूतांचा पूर्ण पाठींबा असल्याचेही त्यांनी वरिष्ठांना कळविलेले आढळते. बंगाल, आसाम, पंजाब हे प्रांतही चळवळीने पेटले होते.[१४]

९ ऑगस्टला पोलीसांची धरपकड सुरु होताच काही कार्यकर्ते भूमिगत झाले होते. अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफअली, डॉ. राममनोहर लोहिया, सुचेता कृपलानी यांनी एक मध्यवर्ती समिती स्थापन केली आणि या समितीमार्फत ठिकठिकाणी कार्यकर्त्यांना गुप्त रितीने सूचना पाठविण्यास त्यांनी सुरवात केली. मुंबईला त्यांनी आपले कार्यालय थाटले आणि चळवळीच्या एकसूत्री संचालनाचे कम हाती घेतले. चळवळीसाठी निरनिराळे कार्यक्रम सुचविणारी, गांधींचा संदेश देणारी पत्रके प्रांतोप्रांती पोचविण्याची व्यवस्था केली, तसेच देशाच्या निरनिराळ्या भागात चळवळी कशाप्रकारे चालू आहेत, कोठे मोर्चे निघाले, कोठे लाठीमार झाला इत्यादी घटनांची इत्यंभूत माहितीही या गुप्त पत्रकातून दिली जाई. देशातील अबालवृध्दांना चळवळीचे वृत्त कळावे म्हणून मुंबई, पुणे, कलकत्ता व नेपाळच्या सीमेनजीक ध्वनिप्रक्षेपण केंद्रे स्थापन झाली.[१५]

मुंबईसह देशाच्या अनेक भागात चळवळीने जोर धरला असतांना विदर्भातही चळवळीने चांगला पेट घेतला. १९४२ ची चळवळ विदर्भात मोठया प्रमाणावर झाली. विदर्भातील लोक सक्रियपणे चळवळीत सहभागी झालीत. दुसरीकडे मुंबईचे कॉंग्रेस अधिवेशन आटपून ज्यावेळी नागपूर विदर्भातील नेते विदर्भात परत येत होते त्यावेळी त्यांना आपल्या हद्दीत आल्यानंतर म्हणजे मलकापूरला गाडी आल्यानंतर पकडण्यात आले. मोठया नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना ठिकठिकाणच्या रेल्वे स्टेशनवर पकडण्यात आले. अशास्थितीत विदर्भातील जनतेला कोणाचेही नेतृत्व राहिले नसतांना जनतेने स्वबळावर हिंसा अथवा अहिंसा याचा विशेष विचार न करता ही चळवळ चालविली.[१६]

विदर्भात या कालावधीत अनेक रोमांचकारी घटना घडल्या. सरकारी कार्यालयावर, पोस्ट ऑफिसांवर, विद्युत केंद्रावर, सरकारी धान्याच्या गोदामावर हल्ले झाले. शासकीय महाविद्यालयाला आग लावण्याचा प्रयत्न झाला. घातपाती कृत्यांचे संयोजन हिंदुस्थान रेड आर्मीचे नेते करीत होते. येथील चिमूर, आष्टी, यावली, बेनोडा लोकांनी दिलेला साहसी लढा तर स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहिला जातो.[१७] १९४२ च्या या लढ्यात विदर्भातील अनेक भागातील महिलांनी महत्त्वाचे योगदान दिले. पुरुषाच्या खांद्याला खांद्या भिडवून स्त्रिया लहान मुली लढल्या.

भारतातील महिलांनी सर्वच स्वातंत्र्य चळवळींमध्ये महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. महात्मा गांधींनीसुध्दा त्यांची प्रशंसा केलेली आहे आणि राष्ट्रीय कॉंग्रेसनेही एक प्रस्ताव पारीत केला की, भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महिलांनी जे योगदान दिले ते भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहले जाईलच. भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्य संग्रामाचे लक्षणीय वैशिष्टय म्हणजे भारतीय महिलांचा त्यातील उत्स्फूर्त व उत्साहपूर्ण सहभाग होय. शेकडो वर्ष घराच्या चौकटीत अडकून पडलेल्या भारतीय महिलांनी परंपरागत चौकट ओलांडली आणि पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढा दिला. सुशिक्षित-अशिक्षित, गर्भश्रीमंत-दारिद्री भिन्न धर्माच्या, भिन्न जातीच्या, भिन्न संस्काराचा प्रभाव असलेल्या लक्षावधी भारतीय महिला

सतीचे वाण हाती घेऊन स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झाल्या. साऱ्या जगाच्या इतिहासात अपवादानेच आळणारे हे वास्तव आहे म्हणूनच भारतीय स्वातंत्र्य लढयातील महिलांच्या सहभागाला वैशिष्टयपूर्ण स्थान आहे.[१८] भारतीय स्वातंत्र्यलढयात भारताच्या निरनिराळ्या भागातील महिलांप्रमाणेच वैदर्भीय महिलांचाही मोठा वाटा आहे.

इंग्रजी सत्तेच्या स्थापनेबरोबर भारतात केवळ राजकीयच नव्हे तर सामाजिक परिवर्तनाचेही युग सुरु झाले. भारतात धार्मिक व सामाजिक प्रबोधनाचे वैचारिक क्रांतीचे युग सुरु झाले. मध्ययुगीन काळात रेंगाळणारी भारताची पावले आधुनिकतेकडे वाटचाल करु लागली. भारतीय महिलांच्या अगतिक, दयनीय परिस्थितीकडे या आद्य भारतीय सुधारकांचे लक्ष गेले. महिलांना शिक्षण देवून त्यांना जाणते केल्यास, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायांची व अत्याचारांची त्यांना जाणीव होईल आणि त्यातून आपोआपच त्यांच्या उन्नतीच्या मार्ग खुला होईल, अशा धारणेतून स्त्री शिक्षणाचा श्रीगणेशा झाला. शिक्षणाबरोबर महिलांच्यातही नवे विचार रुजू लागले, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होऊ लागला, सामाजिक जाण निर्माण होऊ लागली आणि घराच्या चार भिंतीच्या बाहेर पाऊल ठेण्याचे मनोधैर्य त्यांच्यात निर्माण झाले. महिलांच्यात राजकीय जाणीव निर्माण होण्याची पूर्व तयारी होती. या दरम्यान भारतात राष्ट्रवादाचा उदय झाला. भारतीयांना पाश्चात्य राज्यकर्त्यांकडून न्याय व अधिकार मिळावेत या हेतूने राष्ट्रीय सभा स्थापन झाली. प्रारंभी मवाळ असणारी राष्ट्रीय सभा लोकमान्य टिळक व त्यांच्या जहाल सहकाऱ्यांच्या प्रेरणेने जहाल राष्ट्रवादी बनू लागली. या प्रक्रियेला महात्मा गांधींच्या नेतृत्वाने प्रचंड गती दिली. भारतीय स्त्री मुक्तपणे व उत्साहाने राजकीय क्षेत्रात वावरु लागली, स्वातंत्र्यलढयात सहभागी होवू लागली. राष्ट्रीय कार्यासाठी शारीरिक हालअपेष्टा सोसू लागली. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचा वाढता सहभाग हे संग्रामातील महत्वाचे व मोलाचे पर्व ठरले.[१९]

एकोणविसाव्या शतकाच्या मध्यापासून विदर्भात सामाजिक प्रबोधनाला प्रारंभ झाला. पाश्चात्य शिक्षणाची सुरुवात झाली. मुलींसाठी शाळा स्थापन झाल्या. पश्चिम महाराष्ट्रात सुरु झालेल्या वैचारिक प्रबोधनाचे वारे विदर्भात पसरु लागले. समान सुधारणेचा विचार विदर्भात सुशिक्षित व सुबुध्द वर्गात मूळ धरु लागला. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात महिलांच्या उन्नतीचे कार्य करण्यासाठी हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या का होईना, पण महिला पुढे सरसावल्या. या सामाजिक प्रबोधनातून वैदर्भीय महिलात राजकीय जाणिवेचा उदय होऊ लागला. या शतकाच्या अखेरीस राष्ट्रवादी विचारांचा स्त्रोत काही वैदर्भीय महिलांना राष्ट्रीय कार्यात सहभागी होण्यास प्रवृत्त करु लागला.[२०]

नंतरच्या दशकात लोकमान्य टिळकांचे विदर्भात अनेकदा दोरे झाले त्यांनी आपल्या भाषणातून आपले जहाल राजकीय विचार मांडले. स्वदेशीचा सातत्याने प्रसार केला. सरकारकडे केवळ अर्ज विनंत्या करुन भारतीयांना न्याय्य अधिकार मिळणार नाहीत, त्यासाठी लोकमत जागृत करुन, कृती करुन सरकारवर दडपण आणणे आवश्यक आहे असा विचार ते प्रतिपादीत करु लागते. याचा प्रभाव वैदर्भीय जनतेवर पडणे स्वाभाविकच होते.[२१]

विदर्भातील त्यांच्या सहकाऱ्यांच्या राष्ट्रवादी प्रचाराचा प्रभाव अमरावतीच्या यशोदाबाई जोशी यांच्याप्रमाणेच विदर्भातील इतरही काही महिलांवर पडला.[२२] १९२० च्या डिसेंबर महिन्यात कॉंग्रेसचे अधिवेशन नागपूर येथे झाले. या अधिवेशनात १६९ महिला उपस्थित होत्या. जानकीदेवी बजाज, शांताबाई काळे, केसरबाई, नागझरीच्या जाधव कुटूंबातील स्त्रिया, यशोदाबाई जोशी, चंद्राताई शेवडे, लक्ष्मीबाई खापर्डे आणि नागपूरच्या चिटणविस, बुटी, किनखेडे इत्यादी कुटूंबातील महिला उपस्थित होत्या. नागपूरच्या या अधिवेशनानंतर राष्ट्रीय चळवळीला जसे नवे वळण लागले, तसेच महिलांच्या सहभागाच्या दृष्टीने संख्यात्मक तसेच गुणात्मक बदल झाला.[२३]

१९२० साली सुर झालेल्या असहकार चळवळीत पूर्वीपेक्षा अधिक संस्थेने महिला भाग घेऊ लागल्या.  मोठया शहरातच नव्हे तर लहान गावातही स्त्रियांनी कार्यकर्त्यांची पथक् आयोजित केली. स्वदेशीचा पुरस्कार, परदेशी मालाचा बहिष्कार, चरखा खादीचा प्रचार, मद्यपानाविरोधी प्रचार अशा विविध उपक्रमात महिला सामील झाल्या. मुख्य म्हणजे १९२० पर्यंत जी राजकीय जागृती वाढली. १९ व्या शतकात 'गृहबंदी शाळेतील गुलाम' असलेली स्त्री घराबाहेर पडून समष्टी कार्यात नवा आयाम लागला.[२४] १९२१ ते १९२९ च्या दरम्यान राष्ट्रीय आंदोलनाचे प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढली आणि त्यांच्या राष्ट्रीय कार्याचे क्षेत्रही विस्तारले. राजकीय जाणिवेचा व राष्ट्रीय भावनेचा प्रादुर्भाव झालेल्या विदर्भातील महिला १९२० पासून झपाटयाने बदलणाऱ्या देशातील वातावरणामुळे प्रभावित होणे आणि राष्ट्रीय कार्यासाठी प्रेरित होणे स्वाभाविकच होते.[२५]

राष्ट्रीय सभेने १९२९ च्या लाहोर अधिवेशनात घेतलेल्या निर्णयानुसार महात्मा गांधीजींनी १९३० साली ब्रिटीश सत्तेविरुध्द सविनय कायदेभंगाचा लढा सुरु केला. हा लढा १९२० च्या असहकार चळवळीपेक्षा अधिक व्यापक स्वरुपाचा होता. या लढयात भारतीय महिला प्रथमच फार मोठया प्रमाणावर सहभागी झाल्या. विदर्भातील महिलासुध्दा मोठया उत्साहाने सहभागी झाल्या. वैदर्भीय महिलांनी सविनय कायदेभंग चळवळीत मिठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, विदेशी कापडावर बहिष्कार, खादीप्रचार, परिषदांचे आयोजन याशिवाय प्रात: फेऱ्या, सायंफेऱ्या काढून राष्ट्रीय स्वरचित गीते, पोवाडे इत्यादी मार्गांनी प्रचारकार्य केले. ह्याशिवाय निधी गोळा करणे, लोकांना काँग्रेसचे सभासद करणे अशी नानाविध कामे केली.

१९४२ च्या चलेजाव चळवळीत विदर्भातील अनेक स्त्रियांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला. काही तुरुंगाची पर्वा न करता धडपडीने कार्य करीत राहिल्या. काही मूठभर का होईना स्त्रियांनी पिछाडीची कामे करुन चळवळीला मदत केली. भूमिगतांना स्त्रियांनी केलेली मदत स्वातंत्र्य प्राप्तीच्या दृष्टिने मोलाची ठरली. ब्रिटीशांच्या दडपशाहीला न

जुमानता विदर्भातील शिक्षीत, अशिक्षित, उच्च व सामान्य घराण्यातील आणि तळागाळातील असंख्य स्त्रियांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या या चळवळीत भाग घेवून ब्रिटीशांविरुध्द अत्यंत महत्वाची कामगिरी केली. विदर्भातील राधाबाई ओक, सुभद्राबाई जोशी, राधाबाई गोयनका, विमलाताई देशपांडे, प्रमिलाताई ओक, अनुसयाबाई काळे, दुर्गाताई जोशी, कृष्णाबाई रंगारी, राधाबेन भाटीया, ताराबाई मश्रुवाल, सरलाताई शेर्लेकर, शांताबाई माडखोलकर, पद्मा शेवडे, सिंधुताई करंदीकर, निर्मला साळवे, प्रभा हरकटे, सुभद्राबाई काशीकर, विमल अभ्यंकर, रमाबाई तांबे, दुर्गाताई वझलवार, प्रभाताई वझलवार, प्रेमाबाई अनीस, दर्याबाई दहीकर, सुशीलाबाई खत्री, गोपिकाबाई कन्नमवार, सावित्रीबाई बियाणी, सीताबाई नाईक आणि इतर अनेक स्त्रियांचे चळवळीतील योगदान महत्त्वाचे होते.

१९४२ च्या चले जाव चळवळीत विदर्भातील स्त्रियांनी केलेली कामगिरी स्वातंत्र्य प्राप्तीच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली. चलेजाव चळवळीत उत्स्फूर्तपणे सहभागी झालेल्या विदर्भातील स्त्रियांनी विदर्भाच्या इतिहासात नव्हे तर देशाच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासातही आपले नाव अमर केले. या सर्व स्त्रियांची कार्य कर्तृत्वाची स्वतंत्र व सखोलपणे मांडणी जिल्हानिहाय पुढील प्रकरणांमध्ये करण्यात आलेली आहे.

**संदर्भ :-**

१) दमयंती पाठक, वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील सहकार्य, मंगेश प्रकाशन, नागपूर २००३, पृ.१७५.

२) सुमन वैद्य, शांता कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर २००९, पृ.९१.

३) कित्ता पृ.९२.

४) कित्ता पृ.९३.

५) कित्ता पृ.९४.

६) कित्ता पृ.९५.

७) कित्ता पृ.९६.

८) कित्ता पृ.१०२.

९) कित्ता पृ.१०४.

१०) य.दि. फडके, विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड-५ के. सागर, पुणे २००८ पृ.८६.

११) शं.द. जावडेकर, आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, २००१ पृ ४७२.

१२) कित्ता पृ.४७४.

१३) कित्ता पृ.४७५.

१४) सुमन वैद्य, शांता कोठेकर, उपरोक्त पृ.१०७.

१५) कित्ता पृ.१०८.

१६) श.गो. कोलारकर, आधुनिक विदर्भाचा इतिहास, मंगेश प्रकाशन, २००३, पृ.१९८.

१७) सुमन वैद्य, शांता कोठेकर, उपरोक्त पृ.१०९.

१८) R.C. Mujumdar(ed.) struggle for freedom page no. ४७२-७३.

१९) दमयंती पाठक, उपरोक्त पृ.१.

२०) दमयंती पाठक, वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील सहकार्य, मंगेश प्रकाशन, नागपूर २००३, पृ.२९.

२१) कित्ता पृ.३२.

२२) कित्ता पृ.३४.

२३) कित्ता पृ.४२.

२४) कित्ता पृ.४३.

२५) कित्ता पृ.४६.

## प्रकरण - दुसरे

# नागपूर जिल्हयातील चलेजाव चळवळ

देशाच्या अनेक भागात चलेजाव चळवळ जोरात सुरु होताच नागपूर शहर आणि नागपूर जिल्हयात ठिकठिकाणी इंग्रज सरकारविरुध्द ९ ऑगस्ट १९४२ रोजी प्रक्षोभ उसळला. नेत्यांच्या आदेशानुसार जनतेने इंग्रज सरकारविरुध्द भारत छोडो आंदोलन किंवा चले जाव चळवळ चालविली. या आंदोलनात जनतेला मार्गदर्शन करण्यासाठी कोणी नव्हते. कारण नेत्यांना सरकारने अटक करुन अज्ञातस्थळी नेवून ठेवले होते. त्यामुळे जनतेने आपल्या मतानुसार उत्स्फूर्त चळवळ चालविली. इंग्रज सरकारच्या राज्य करण्याच्या ज्या ज्या यंत्रणा होत्या त्या त्या खुणा पुसून टाकण्याचा त्यांनी प्रसंगी धडाका चालविला. त्यामुळे जनतेचा राग पोलीस चौक्या, पोस्ट ऑफिसेस, रेल्वे स्टेशन्स, सेक्रेटरियट, सरकारी कार्यालये, कोषागार यावर विशेष दिसून आला. टेलिफोन टेलिग्राफच्या तारा ठिकठिकाणी तोडण्यात आल्या. इंग्रज सरकार ज्या ज्या साधनांमार्फत हिंदुस्थानात राज्य करीत होते. ती ती साधने जनतेने उद्ध्वस्त केली आणि जनतेने आपला राग व्यक्त केला. तो राग व्यक्त करतांना जनतेने हिंसा किंवा अहिंसा यांचा यत्किंचितही विचार केला नाही. पुरुषांबरोबरच नागपूर शहर आणि जिल्हयातील इतर भागातील महिलांनीही या आंदोलनात उडी घेतली.[१]

### २.१ नागपूर शहरातील चले जाव चळवळ :-

मुंबईहून अखिल भारतीय कॉंग्रेस कमेटीच्या अधिवेशनावरुन नागपूरला परतत असतांना मलकापूर स्टेशनवर नागपूर विदर्भातील सर्व मंत्री आणि पं. द्वारकाप्रसाद मिश्रा यांनाही मलकापूर स्टेशनवरच अटक करण्यात आली. परंतु त्याही परिस्थितीत काही नेते मंडळी शिताफीने नागपूरला पोहोचली. त्यात श्री वामनराव गावंडे आणि त्यांच्या बरोबरची कार्यकर्ते मंडळी होती. श्री वामनराव गावंडे यांच्याकडून मुंबईची सर्व हकीकत ऐकल्यानंतर

नागपूरला 'चले जाव' चळवळ सुरु झाली. नागपूर शहरातील जनतेने राष्ट्रीय नेतृत्वाच्या आवाहनास प्रतिसाद देवून ब्रिटीश राज्य संपुष्टात आणावयाचे असा निश्चय केला. सर्वत्र हरताळ, मिरवणुका, घोषणा यांना उत आला. हिंदुस्थानी लाल सेनेचे सर्वश्री मगनलाल बागडी आणि त्यांचे सहकारी, नवाबपुऱ्याचे शिवाजी मंडळ, राष्ट्रीय युवक संघ, विद्यार्थी काँग्रेस, काँग्रेसचे सेवादल कार्यकर्ते यांनी उत्स्फूर्तपणे चळवळीत भाग घेतला. नागपूरात १२ ऑगस्ट १९४२ ला चळवळीची खरी सुरवात झाली. अनावर झालेल्या जमावावर पोलिसांनी गोळीबार केला. त्यात अनेक निष्पाप लोकांचा बळी गेला. त्यामुळे लोकांमध्ये प्रक्षोभ होवून इतवारी पोस्ट ऑफीस, इतवारी रेल्वे स्टेशन, पोलीस चौक्या आणि गोदामे यांच्यावर हल्ले चढविल्या गेले. शुक्रवार तलावावरील को-ऑपरेटिव्ह बँकेवर, जिल्हा कचेरीवर, राष्ट्रीय निशान फडकविण्यात आले.[२]

१३,१४,१५ ऑगस्ट हे तीन दिवस नागपूरच्या इतिहासात रक्तरंजीत क्रांतचे ठरले. या तीन दिवसात इतिहासात ब्रिटीशांची राजवट जणू येथे नव्हतीच. अनेक भागात सैनिक आणि जनता त्यांच्यात चकमकी होऊन सर्व ठिकाणी लोकांनी शौर्याची शर्थ केली.

हिंदुस्थानी लाल सेनेने १९४२ च्या चळवळीत फार मोठी कामगिरी करुन दाखविली. सर्कल नं. १७ च्या पोलीस ठाण्यावर बाजेरियाच्या लाल सेना सैनिकांनी हल्ला करुन रायफली हिसकावून घेतल्या. १३ ऑगस्टला एक टोळी शनिचरा क्रॅडॉक पोस्ट ऑफीसवर गेली. नोटांचे बंडल काढून त्यांची होळी करण्यात आली. गोळीबार सुरु झाल्यामुळे लोक पळायला लागले होते. परंतु जमावातून तीरासारखा कृष्णराव काकडे छाती ताणून समोर आला. त्यांच्यावर गोळी झाडण्यात आली. त्यात ते शहीद झाले. यानंतर चिडलेल्या जनतेने इतवारी पोलीस नाका, तहसील पोलीस नाका, हंसापुरी पोलीस नाका, यावर हल्ले करुन त्या चौक्या जाळण्यात आल्या. बंदुका पळविल्या. नवाबपुरा पोलीस ठाण्याच्या हेड कॉन्स्टेबलला लोकांनी जीवे मारले. त्यामुळे या भागात पोलीसांची दडपशाही सुरु झाली. या प्रकरणात शंकर महाल्ले यांना फाशीची शिक्षा झाली.[३]

१९ जानेवारी १९४३ रोजी शंकर महाल्ले यांना फाशी देण्यात आली. त्यावेळी त्यांचे वय १८ वर्षाचे होते. त्यांचे वडील दाजोबा महाल्ले हे १९४२ च्या चळवळीत शहीद झाले होते.[४]

रामभाऊ रुईकरांच्या प्रेरणेने नागपूरच्या कामगारांनी हजारोंच्या संख्येने आपली लढाऊ भूमिका बजावली. राष्ट्रीय युवक संघ, विद्यार्थी कॉंग्रेस, कॉंग्रेस सेवादल या संस्थाचे अनेक विद्यार्थी कार्यकर्ते यांनी जीव धोक्यात घालून भूमिगत चळवळींचा कारभार सांभाळला. रुईकरांना १९४२ च्या चलेजाव आंदोलनात तीन वर्षाची शिक्षा झाली. डॉ. काशीकर हे 'इंटक' या कामगार संघटनेचे शेवटपर्यंत नेते राहिले. त्यांच्या पत्नी सौ.सुभगाबाई काशीकर याही चांगल्या कार्यकर्त्या होत्या. या दोघांनीही १९४२ मध्ये गावोगावी जाऊन जनजागृतीचे कार्य केले. १९४२ मध्ये त्यांनी कारावास भोगला.[५] तिरंगा ध्वजाच्या रक्षणाकरीता सुभगाबाई काशीकर यांनी बाणेदारपणा दाखविला. सुभगाबाई काशीकर यांच्या घरावर असलेला तिरंगा ध्वज काढण्याकरीता मॅजिस्टेट व पोलीस आले तेव्हा तिने मी जो पर्यंत जिवंत आहे तोपर्यंत ध्वज खाली उतरणार नाही असे बाणेदार उत्तर दिले. यामुळे पोलीस हतबल झाले आणि निघून गेले. सुभगाबाई काशीकर यांनी १९४२ च्या आंदोलनात अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजाविली.

१४ ऑगस्ट १९४२ रोजी शहराची स्थिती सुधारावी म्हणून जबलपूरवरुन सैन्य बोलविण्यात आले. १५ ऑगस्ट रोजी सैन्याने गोळीबार केला त्यात तीन व्यक्ती जखमी झाले. मॉऊंट हॉटेलजवळ एका बंगल्यात काम करीत असणारा खानसामा पुलाजवळ रेल्वे रुळ ओलांडत असतांना त्यांच्यावर गोळी झाडली. त्यात त्याचा मृत्यू झाला. या आंदोलनात भूमिगत क्रांतिकारकांनी भाग घेतला. २१ सप्टेंबर १९४२ रोजी नागपूर पोलीस निरीक्षक यांचे घराच्या भिंतीला असलेल्या छिद्रामध्ये बारुद भरुन स्फोट करण्यात आला त्यामुळे पोलीस अधिक सावध झाले. २ ऑक्टोंबर १९४२ रोजी रार्बटसन मेडीकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी गांधी जयंतीचा कार्यक्रम आयोजित केला त्यावेळी राष्ट्रीय ध्वज फडकविला.

१० फेब्रुवारी १९४३ रोजी महात्मा गांधीनी सुरु केलेल्या उपोषणाचे पडसाद नागपूरातही उमटले आणि १९ फेब्रुवारी १९४३ रोजी नागपूर पत्रकार परिषदेने सभा बोलावून गांधींच्या उपोषणावर चिंता व्यक्त केली.[६]

## २.२ नागपूर ग्रामीण मधील चलेजाव चळवळ :-

नागपूर शहराप्रमाणे नागपूर जिल्हयातील ग्रामीण भागात ठिकठिकाणी ब्रिटीश सरकार विरुध्द १ ऑगस्ट १९४२ रोजी प्रक्षोभ उसळला. आपल्या नेत्यांनी दिलेल्या आदेशानुसार जनतेने ब्रिटीश सरकारविरुध्द 'भारत छोडो' आंदोलन चालविले. या आंदोलनात सुरवातीलाच ब्रिटीश सरकारने नेत्यांना अज्ञातस्थळी नेवून ठेवल्यामुळे जनतेला मार्गदर्शन करण्यास कोणी नव्हते. त्यामुळे जनतेने आपल्या मतानुसार उस्फूर्त चळवळ चालविली. ब्रिटीश सरकारच्या राज्य करण्याच्या ज्या ज्या खुणा होत्या त्या पूसून टाकण्याचा त्यांनी धडाका चालविला. त्यामुळे जनतेचा राग पोलीस चौक्या, पोस्ट ऑफिसेस, रेल्वे स्टेशन्स, सेक्रेटरियट, सरकारी कार्यालये, कोषागार कार्यालये, यावर विशेष दिसून आला. टेलिफोन-टेलिग्राफच्या तारा ठिकठिकाणी तोडण्यात आल्या. ब्रिटीश सरकार ज्या ज्या साधनामार्फत हिंदुस्थानात राज्य करीत होते ती ती साधने जनतेने उध्वस्त केली आणि आपला राग व्यक्त केला. तो राग व्यक्त करीत असतांना जनतेने हिंसा किंवा अहिंसा यांचा किंचितही विचार केला नाही. या प्रक्षोभचा भडका रामटेक तहसिलीत विशेष होता. याशिवाय मौदा, उमरेड, बेला, काटोल, सावनेर, पाटणसावंगी, खापा, गुमगाव या भागात लोकांनी ब्रिटीशांविरुध्द आंदोलने केली.

## २.३ नागपूर जिल्ह्यातील स्त्रियांचा सहभाग :-

१९४२ च्या भारत छोडो आंदोलनात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिला सुध्दा मोठया प्रमाणात सहभागी झाल्या. १९४२ च्या पूर्वार्धात नागपूरच्या इतवारी भागात कॉंग्रेस

कमिटीचे एक कार्यालये विद्यावती देवडियांच्या हस्ते उद्‌घाटन होवून सुरु करण्यात आले. या प्रसंगी १५० लोक उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना कॉंग्रेस दलाला मदत करण्याची सभेत विनंती करण्यात आली. २३ फेब्रुवारी १९४२ ला 'बजाज दिन' साजरा करण्यात आला. सकाळी ध्वजवंदनाचा कार्यक्रम झाला आणि सायंकाळी १५० लोकांच्या उपस्थितीत सभा घेण्यात आली. अध्यक्षस्थानी दिनदयाल गुप्ता होते. यावेळी विद्यावती देवडिया यांनी जमनालालजींच्या स्तुतिपर भाषण दिले. याप्रसंगी इतवारा चौकाला बजाज चौक असे नाव देण्याचे निश्चित करण्यात आले. मार्च १९४२ ला विद्यावती देवडियांच्या हस्ते ध्वजवंदनाचा कार्यक्रम नागपूरच्या वार्ड १० मध्ये ३० लोकांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी विद्यावती म्हणाल्या की, त्यांना वार्ड कमिटीचे अध्यक्ष करण्यात आले. दलांच्या स्वयंसेवकांनी समोर येऊन कार्य करणे अशी विनंती श्रोत्यांना करण्यात आली. त्यानंतर विद्यावती यांनी वॉर्ड मेंबर्सची सभा घेतली.[७]

दादा बालकृष्ण संत यांच्या उपस्थितीत गोपालसिंग ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली १०० लोकांची एक सभा घेण्यात आली. या सभेत गुंडेराव फकिरा बारी, मीराबाई चिंतामण तिडके (चिंतामणरावांची मुलगी) आणि चिंतामणराव तिडकेंनी सभेतील नगसंरक्षक दलाला मदत करण्याची विनंती केली. त्याचप्रमाणे ते आपल्या भाषणात महागाई, धान्याची टंचाई, या प्रश्नांवरही बोलले. सरकारने धान्याच्या किंमतीवर नियंत्रण ठेवावे अशी विनंतीही त्यांनी सरकारला केली.

रायपूर कॉंग्रेसने १ ऑगस्ट १९४२ ला मिरवणूक काढली आणि शेवटी ५०० लोकांची सभा शिवदास डागांच्या अध्यक्षतेखाली घेवून टिळक जयंती संपन्न केली. या सभेत पन्नालाल देवडिया आणि विद्यावती देवडिया उपस्थित होते तसेच रवीशंकर शुक्ला सुध्दा उपस्थित होते. पन्नालाल देवडिया आणि विद्यावती देवडियांची सभेत भाषणे झाली. विद्यावती देवडियांनी जनतेला विनंती केली की, आजच्या अडचणीच्या परिस्थितीत सगळ्या जातींनी आपली एकी कायम ठेवावी. २ ऑगस्टला विद्यावती देवडियांनी नागपूला ५०

महिलांची सभा रविशंकर शुक्लांच्या घरी घेतली. त्यांनी उपस्थित महिलांना अशी विनंती केली की, त्यांनी येऊ घातलेल्या स्वातंत्र्य लढयात भाग घ्यावा आणि खादी वापरावी. विद्यावती देवडिया आणि काही मुलांनी विद्यार्थ्यांमध्ये चीड निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांना अटक झाली. एका मुलाने काँग्रेसचा ध्वज लावण्याचाही प्रयत्न केला.[८]

मुंबईला गवालिया टँक मैदानावर 'भारत छोडो' प्रस्ताव पारित होताच संपूर्ण राष्ट्र एका वेगळया राष्ट्रीय वृत्तीने झपाटले होते. नागपूरात १२ ऑगस्टला खऱ्या युध्दाला सुरवात झाली. पहिला हल्ला को. ऑपरेटिव्ह बँकेवर बालकांनी आत्मबळाने केला. बंदुकीच्या फेरी झडल्या. बालकांच्या लढयापुढे पोलीसांना शरणागती पत्करावी लागली. एका बालकाने जिल्हा कचेरीवर राष्ट्रीय ध्वज फडकाविला. त्या ठिकाणी निशस्त्र लोकांवर गोळीबार झाला. १३, १४ आणि १५ हे दिवस नागपूरच्या इतिहासात रक्तरंजित क्रांतीचे दिवस ठरले. त्या तीन दिवसात ब्रिटीशांची राजवट जणू नव्हतीच. त्या तीन दिवसात इतवारा पोष्ट ऑफीस लुटण्यात आले. त्यावेळी गंगूबाई बुधे या महिलेने पोलिसांना मारण्याकरीता लोकांना दगड पुरविले. मातीच्या तेलाच्या बाटल्या घेवून पूनमचंदजी राकांबरोबर जाळपोळीत मदत करायला त्या जात असत व भूमिगतांना जेवण पुरविण्याचे काम करीत.[९]

१९४२ च्या भारत छोडो आंदोलनाच्या प्रारंभीच्या एक दोन महिन्यात सभा व मिरवणूका झाल्या. त्यानंतर सभा व मिरवणूकांवर कडक निर्बंध लादले गेले व दमनचक्रे सुरु झाले. त्यानंतरही चळवळ प्रामुख्याने विध्वसंक स्वरुपाची होती. त्यामुळे भूमिगत सत्याग्रहींना मदत, शिवाय विध्वंसक कृत्यांना मदत, अशा प्रकारची कामे महिलांनी केली. भूमिगत होवून पुढे काही दिवस लढा चालविला. ते तर बहादूर होतेच परंतू त्यांना वेळोवेळी आश्रय देणाऱ्या महिलाही कमी धैर्याच्या नव्हत्या. आंदोलनाच्या साधारणत: २ वर्षाच्या कालखंडात भारतीय जनतेला अपार कष्ट सहन करावे लागले. एकतर हा महायुध्दाचा काळ होता त्यामुळे आंदोलनकाळात अनेक महिलांना कोदो, कुटकी, ठेप, झाडपाला खाऊन तर

कधी एक वेळा जेवण करुन, तर कधी पेज पिऊन मुलांबाळासह दिवस काढावे लागले. कधी कधी भिकही मागावी लागली.[१०]

नागपूरचा शेर्लेकर परिवार क्रांतीकार्यात सहभागी होता. त्यांच्या घरी बॉम्ब बनविण्याचा एक लहान कारखाना होता. ॲ. लक्ष्मणराव शेर्लेकर कॉंग्रेस कार्यकर्ते असून त्यांच्या पत्नी सरलाबाईंची क्रांतीकार्याला साथ होती. त्यांची मुलगी स्मृती यांनी मुंबईहून बॉम्बचे सामान आणले. शांताबाई माडखोलकरांचा या क्रांतीकार्याशी संबंध होता. त्यांच्याकडे मगनलाल बागडींच्या सभा होत असत. निलाबेन, अनुसयाबाई जोशी मिळून क्रांतीकारी कामे करीत असत. सिंधूताई करंदीकर यांनी बॉम्बचे सामान मुंबईला नेऊन दिले. त्यांच्याबरोबर पद्मा शेवडे (ए.बी. बर्धनच्या पत्नी) निर्मला साळवे, प्रभा हरकरे हया काम करीत असत. क्रांतीकारी लालसेनेचे मगनलाल बागडी आणि त्यांच्या साथीदारांनी 'क्रांतदेवी' म्हणून पदवी दिलेल्या साळूबाई घोडमारे यांचा तेलखेडी बॉम्ब खटल्याशी संबंध होता. सगळी टोळी पकडली गेली  पण त्या शिताफीने भूमिगत राहिल्या. राधाबाई अहेर ही महिला क्रांतीकारी गटांना रुळ उखडण्याचे सामान लपवून नेऊन देत असे तर सावनेर तहसील मधील खापा येथील क्रांतीकारी आणि लालसेनचे कार्यकर्ते बाबूलाल गुप्ता यांच्या पत्नी लक्ष्मीबाई क्रांतीकार्याला मदत करीत असत.

कमलाताई हॉस्पेटचे सूतिकागृह हे भूमिगतांचे नागपूर येथील प्रमुख आश्रमस्थान होते. भूमिगतांना आश्रय देणे, त्यांना योग्य स्थळी पोहचविणे, त्यांचे निरोप पोहचविणे, त्यांच्या कुटूंबियांना अडीअडचणीत मदत करणे अशी कामे कमलताई जातीने लक्ष देवून करीत. उमाबाई फडणविस, सुशिलाताई मोहनी आणि त्यांचा परिवार ही भूमिगतांची आश्रयस्थाने होती. वेणूताई यांनी वामनराव गावंडेना तर कुलसुंबी याकूब यांनी मगनलाल बागडी यांना गुप्तपणे राहण्यास मदत केली.[११]

एकूणच १९४२ च्या चले जाव चळवळीत नागपूर जिल्हयातील अनेक महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. अनेकांनी भूमिगतांना मदत करण्याचे महत्वाचे कार्य केले.

**संदर्भ :-**

१) श.गो. कोलारकर, आधुनिक विदर्भाचा इतिहास, मंगेश प्रकाशन, २००३, पृ.२०६.

२) कित्ता पृ.१९१.

३) कित्ता पृ.२०१.

४) भा.रा. अंधारे, श्रीकांत सोनटक्के, आधुनिक नागपूर, हिंदी मराठी प्रकाशन, नागपूर २०१५ पृ. १४०.

५) श.गो. कोलारकर, उपरोक्त पृ.२०२.

६) भा.रा. अंधारे, श्रीकांत सोनटक्के, उपरोक्त पृ. १४१.

७) दमयंती पाठक, वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील सहकार्य, मंगेश प्रकाशन, नागपूर २००३, पृ.१९२.

८) कित्ता पृ.१९३.

९) कित्ता पृ.१९४.

१०) कित्ता पृ.१९५.

११) कित्ता पृ.१९६.

## प्रकरण - तिसरे

# वर्धा जिल्हयातील स्त्रियांचे योगदान

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात वर्धा जिल्हयाचे स्थान अतिशय महत्वपूर्ण आहे. भारताला स्वातंत्र्य मिळवून देणारा १९४२ चा 'भारत छोडो' ठराव या शहरातच पारित झाला. त्यामुळे वर्धा शहर देशाच्या स्वातंत्र्यलढयाचे केंद्रस्थान बनले होते. महात्मा गांधीजींचे वास्तव्य वर्धेजवळील सेवाग्राम येथे असल्यामुळे भारतातील आणि परदेशातील लोकही त्यांना भेटायला सेवाग्रामला येत असत. मीराबेनचे वास्तव्य सेवाग्रामला होते इथूनच त्यांनी प्रचार कार्य केले. कस्तुरबा गांधी, जानकीदेवी आणि जमनालाल बजाज यांच्या सहकार्यामुळे या जिल्हयात महिलाश्रमासारख्या संस्थांची स्थापना झाली. परिणामत: महिला वर्गात राजकीय जागृती, अन्य जिल्हयांच्या तुलनेत अधिक झालेली या लढयाच्या वेळी दिसून आली.[१]

ऑगस्ट १९४२ ला 'भारत छोडो' चा ठराव पास झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी पहाटेलाच गांधीजीसह कॉंग्रेस श्रेष्ठींना मुंबईत अटक केल्याचे खळबळजनक वृत्त ९ ऑगस्टच्या सायंकाळपर्यंत वर्धेत पसरले. बरेच नेते मुंबईहून परत येत असतांना त्यांना जळगांव येथे त्यांना अटक करण्यात आली. आचार्य विनोबा भावे आणि दादा धर्माधिकारी वर्ध्याला येताच पकडण्यात आले. त्यांना प्रथम नागपूरला व नंतर वेल्लोरच्या मध्यवर्ती कारागृहात डांबण्यात आले. १० ऑगस्ट रोजी वर्ध्यात मिरवणुका व निषेध सभांना जोर चढला. जनमत प्रक्षुब्ध झाले. परंतू राधाकृष्णन बजाज व दीनदयाल चुडीवाले यांनी प्रक्षुब्ध जमावास आवरले. दिनांक ११ ऑगस्टच्या दुपारी गोळीबारात जंगलु धोंडबाजी ढोरे पहिला हुतात्मा झाला त्यामुळे लोक अधिकच प्रक्षुब्ध झाले. प्रा. ठाकुरदास बंग यांनी गांधीजींच्या अटकेच्या निषेधार्थ प्राध्यापक पदाचा राजीनामा दिला. देवळी गावातील वातावरण अधिकच प्रक्षुब्ध झाले. जमनालाल बजाज यांचे सुपुत्र रामकृष्ण बजाज आणि कॉंग्रेस

पुढारी गोपाळराव काळे या दोघांनी देवळीतील लोकांना आंदोलनात एकमताने भाग घेण्यासाठी आवाहन केले. मुंबईहून आणलेला काँग्रेसचा कार्यक्रम त्यांनी लोकांपुढे ठेवला. त्यांच्या आवाहनास देवळीमध्ये चांगला प्रतिसाद मिळाला. १४ ऑगस्टला देवळीतील जनतेने डाकघर व पोलीस ठाणे भस्मसात करुन तारायंत्रणेची नासधूस केली.[२]

वर्धा व देवळीनंतर खरांगणा या गावी आंदोलन तीव्र स्वरुपात पसरले. गांधीजींचे सहकारी महादेव अनंत मोघे खरांगण्याला गेले होते. त्यामुळे तेथील जनमत सरकारविरुध्द प्रक्षुब्ध झाले.[३]

वर्धा, देवळी, खरांगणा व इतर भागातील तीव्र आंदोलनामुळे सरकारने आक्रमक पवित्रा घेतला. परंतू काँग्रेसजन व विद्यार्थी स्वयंसेवकही लढण्यास सिध्द होते. वर्धा, नागपूर मधील स्वातंत्र्य संग्राम लढयाच्या घटना तसेच मुंबई, बनारस, अलाहाबाद, बालीया, गाझीपूर इत्यादी ठिकाणच्या स्फूर्तिदायक बातम्यांनी वर्धा, देवळी, आष्टी, खरांगणा या गावातील नागरिक प्रभावित झाले होते. 'करु अथवा मरु' या घोषवाक्याने सर्व परिसर जागृत झाला. यातूनच चिमूर, आष्टीचा स्वातंत्र्य संग्राम आणि त्यातून निर्माण झालेले हत्याकांड इत्यादी प्रकरणे निर्माण झाली. नागपूरच्या एका गुप्तवार्ता अधिकाऱ्याच्या २० ऑगस्टच्या अहवालानुसार वर्धा जिल्हयातील परिस्थिती भयानक होती. वर्धा, आष्टी, देवळी, खरांगणा, आर्वी इत्यादी गावे व त्यांचा परिसर भयंकर पेटला होता. संपूर्ण ऑगस्टमध्ये आंदोलनाचा जोर कायम राहिला. शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, आश्रमवादी व सर्वसाधारण जनता नोकरशाहीशी प्राणपणाने लढले, 'रेड आर्मी' व 'फारवर्ड ब्लॉक' पक्षाचे कार्यकर्ते काँग्रेसच्या खांद्याला खांद्या लावून लढले. गिरण्यातील कामगारांनीही आंदोलनास चांगला पाठिंबा दिला.[४]

वर्धेतील १९४२ ची चळवळ अनेक महिन्यापर्यंत चालू होती. या चळवळीत वर्धा जिल्हयातील १७ लोक हुतात्मे झाले. अनेकांना तुरुंगवास भोगावा लागला.[५]

## ३.१ स्त्रियांचा सहभाग :-

१९४२ च्या आंदोलनात वर्धा जिल्हयातील स्त्रियांनी मोठया प्रमाणात भाग घेतला. पश्चिम महाराष्ट्रात १९ व्या शतकाच्या मध्यास सुरु झालेली सर्वांगीण चळवळ नागपूर वऱ्हाड प्रांतात काहीशा उशीरा पोहोचली. १८९७ सालच्या अमरावतीच्या काँग्रेस अधिवेशनात मोरोपंत जोशींच्या पत्नी यशोदाबाई सहभागी झाल्या. तेव्हांपासून सार्वजनिक कार्यात महिला वऱ्हाडात सहभागी होऊ लागल्या. १९३० च्या कायदेभंग चळवळीत स्त्रियांचा सहभाग लक्षणीय होता. स्वातंत्र्य लढयात स्त्रियांचा वाटा वाढावा याकरीता महात्मा गांधीजी सतत प्रयत्नशील होते. गांधीजीनी वर्धेतील बजाजवाडी परिसरातील सौ. दमयंती धर्माधिकारी व सौ. शरयूताई धोत्रे यांना वैयक्तिक सत्याग्रहाची परवानगी दिलेली होती. समाजात पन्नास टक्के असलेल्या स्त्रियांपर्यंत जर पुरुषांना पोहोचता येत नसेल तर हे काम करण्यासाठी स्त्रियांनी पुढे आले पाहिजे असा विचार मांडण्यात आला. या दृष्टीने सौ. दमयंतीबाई धर्माधिकारी यांनी गावोगावी जाऊन प्रचार करुन भाषणे केली. शेवटी त्यांना अटक करण्यात आली, तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ साली त्यांची सुटका झाली. परंतू चळवळीच्या निमित्ताने त्यांना पुन्हा पकडण्यात आले. त्यांना एकूण ३ वर्षे तुरुंगवास भोगावा लागला. १९४५ मध्ये त्या तुरुंगाच्या बाहेर आल्या. दमयंतीबाईंना अटक झाल्यानंतर त्यांनी कोर्टात दिलेले भाषण स्त्रियांच्या भावना दर्शविणारे होते.[६]

## ३.२ महिला श्रमातील स्त्रियांचे योगदान

१९४२ च्या चले जाव चळवळीत महिलाश्रमातील मुलींनी महत्त्वाची कामगिरी बजाविली. जमनालाल बजाज यांच्या प्रेरणेतून १९२४ मध्ये महिलाश्रम या संस्थेची स्थापना झाली. मुंबईचे सेठ सुरजमलजी रुईया यांचेशी जमनालाल यांची घनिष्ठ मैत्री होती. त्यांच्या मुली शांताबाई राणीवाला, रत्नीबाई कानोडिया, मनीबाई मुरारका या तिघींनीही आपल्या स्त्रीधनातून महिलाश्रमाला २.७५ लाख रुपये दान दिले. स्त्रियांना राष्ट्रीय शिक्षणातून

आत्मनिर्भर करणे तसेच देशसेवेची योग्यता त्यांच्या अंगी बाणवणे या उद्देशाने महिलाश्रमाची स्थापना करण्यात आली. महिलाश्रमाच्या अनेक स्त्रियांनी राष्ट्रीय आंदोलनास सक्रिय सहभाग घेतला.

महिलाश्रमात भारताच्या अनेक प्रांतातील महिला सामील झाल्या. महिलांसाठी निवारा संस्कार व शिक्षण केंद्र म्हणून ही संस्था विकसित झाली. सूत कातणे, खादीचे कापड विणणे, त्यावर विणकाम करणे असे अनेक प्रकारचे शिक्षण त्यांना दिले जाई. त्यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास वाढवण्यात मदत झाली. पुढे राष्ट्रीय चळवळीच्या काळात येथील अनेक महिला स्वयंस्फूर्तीने स्वातंत्र्य आंदोलनात सामील झाल्या. जमनालालजींच्या मृत्यूनंतर विनोबा भावे, महात्मा गांधी यांनी महिलाश्रमाकडे जातीने लक्ष देणे सुरु केले. १९४२ मध्ये चले जाव चळवळ सुरु झाल्यानंतर महिलाश्रमातील मुली, महिला सक्रिय झाल्या. यावेळी शहरातील जनता ब्रिटीशांच्या भीतीने घराच्या आत राहत असे. कारण ब्रिटीशांच्या दडपशाहीची त्यांना भीती वाटत होती. अशावेळी नवी चेतना, नवा उत्साह घेऊन आश्रमातील भगिनी मृत्यूची पर्वा न करता प्रभात फेरी, जुलूस, भाषण आणि हस्तलिखित बुलेटीन दारोदारी देऊन मातृभूमीला ब्रिटीश सत्तेपासून मुक्त करण्याचे आवाहन करीत होत्या. या कार्यात महिलाश्रमातील ३ ते १४ या वर्षाच्या मुलीसुध्दा सहभागी झाल्या होत्या. महिलाश्रमातील मुली महिलांनी धैर्याने तुरुंगातील यातनांचे स्वागत केले. महिलाश्रमातील माजी विद्यार्थीनींनी सुध्दा आपापल्या भागात आंदोलनात भाग घेतला. या आंदोलनादरम्यान महिलाश्रमातील एकूण ४३ बंधू-भगिनींना अटक झाली. यात २६ विद्यार्थीनी होत्या. महिलाश्रम संस्थेच्या इतिहासातील ही गौरवास्पद घटना होय.[७]

महिलाश्रमातील अनेक महिलांचे स्वातंत्र्यलढयातील कार्य गौरवास्पद आहे. महिलाश्रमातील मालनीताई थत्ते विदर्भातील पहिल्या महिला सत्याग्रही होत. महिलाश्रम संस्थेत त्यांनी १९३२ ते १९६८ या काळात शैक्षणिक, सामाजिक व राजकीय कार्य केले. १९४२ च्या आंदोलनात मालनीताई आणि त्यांचे पती श्रीधर थत्ते या दोघांनीही बेमुदत

कारावासाची शिक्षा झाली होती. परंतू मालनीताई १३ महिन्यांनी आणि थत्ते काका १८ महिन्यांनी मुक्त झाले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही मालनीताई महिला आश्रमात स्त्री शिक्षणाचे काम करीत राहिल्या.

महिलाश्रमात मॅट्रीक झालेल्या शरयूताई धोत्रे यांनी १९२१ च्या असहकार आंदोलनात भाग घेतला. १९१९ पासून त्यांना महात्मा गांधीजींचा सहवास लाभला. १९४२ च्या चलेजाव चळवळीत भाग घेवून प्रचारकार्य केल्यामुळे त्याना अटक करण्यात आली. दोन महिन्यांच्या शिक्षेनंतर त्यांची सुटका झाली. मालनीताई दास्ताने या मूळच्या कोल्हापूरच्या होत्या. त्या वनिता महिलाश्रम वर्धा इथे मॅट्रीक पास झाल्या. १९४२ च्या आंदोलनात त्यांनी पाच महिलांना घेवून प्रभात फेरी काढली. त्यांनाही अटक करण्यात आली. मुळच्या बडोदा येथील कमलाताई लेले यांच्यावर १९३६ मध्ये जमनालाल बजाज यांनी महिलाश्रमाच्या शिक्षणाचा कार्यभार सोपविला. कमलाताई यांचे प्रेरणास्थान महात्मा गांधीजी होते. १९४२ च्या आंदोलनासमयी धरपकड सुरु होताच महिलाश्रम विसर्जीत करुन राहिलेल्या विद्यार्थीनी व शिक्षक यांनी गट तयार करुन जिल्हाभर प्रचार दोरे सुरु केले. याचवेळी ३१ ऑगस्ट ला कमलाताईंना अटक करण्यात आली. १३ महिन्यानंतर त्यांची सुध्दा सुटका झाली. शांताबाई मानक या महिलाश्रमातून मॅट्रीक पास झालेल्या होत्या. त्यांचे प्रेरणास्थान महात्मा गांधीजी होते.

१९४२ चे आंदोलन सुरु होताच काही मुली आश्रम सोडून निघून गेल्या. परंतू बऱ्याच मुली आश्रमातच थांबल्या. त्यात शांताबाई होत्या. त्यांनी खेडयात फिरुन प्रचारकार्य केले. ठिकठिकाणी भाषणे देत त्या लोकांना प्रेरीत करीत होत्या. त्यांनाही ब्रिटीश सरकारने अटक केली आणि चार महिन्यांची सक्त मजूरीची शिक्षा ठोठावली. वरील सर्व महिला सोबतच सुंदराबाई चन्ने, उषा देशपांडे, वेणूताई चौधरी, यमुनाबाई पाटील, मीरा शहा, रमाबेन रुईया या महिलाश्रमातील महिलांनी स्वातंत्र्यलढ्यात प्रत्यक्ष सहभाग घेतला त्यांनी

कुटूंबाची, मुलांची पर्वा न करता स्वत:ला स्वातंत्र्य संग्रामात झोकून दिले.[८] महिलाश्रमातील महिलांचे स्वातंत्र्यसंग्रामातील कार्य गौरवास्पद आहे.

## ३.३ अंजनाताई नंदरधने यांचे योगदान :-

१९४२ च्या 'चलेजाव' चळवळीत अंजनाताई सोमाजी नंदरधने या १४ वर्षीय मुलीने केलेले कार्य महत्त्वाचे होते. वर्धा येथील अनेक मुली आणि महिलांनी उत्स्फूर्तपणे या आंदोलनात सहभाग घेतला. त्यापैकीच एक अंजनाबाई या होत्या. अंजनाताईंचा जन्म १ जुलै १९२९ रोजी वर्धा येथे सोमाजी नंदरधने या भाजीपाल्यांचे दुकानदार असलेल्या घरामध्ये झाला. आई लहानपणीच वारल्यामुळे त्यांच्या भावडांना शिक्षण बेताचेच मिळाले. त्यांचे काका तुकाराम नंदरधने यांनी स्वातंत्र्यलढयात भाग घेतल्यामुळे दोन वेळा कारावास भोगला होता. चुलत्याच्या या राष्ट्रीय वृत्तीमुळे लहान मुलांना हीच दीक्षा मिळाली. अंजनाताईचे शिक्षण ८ वी पर्यंत झाले. त्यांच्या वडीलांचे जेथे दुकान होते तेथूनच महात्मा गांधीजी स्टेशनवर जात असत. त्यामुळे बालपणीच त्यांना गांधीजीचे अनेक वेळा दर्शन झाले. अंजनाताईंना बालपणीच लाठीकाठी, भाला, जांबिया, तलवार, पोहणे इत्यादींचे शिक्षण मिळाले.

१९४२ ची चले जाव चळवळ देशभर सुरु झाल्यानंतर अंजनाताई शिकत असलेल्या वर्धा येथील शाळा, शाळेतील छोटया मुलींनी पिकेटींग करुन बंद पाडली. व्यायाम शाळेतील आणि सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या दुर्गाताई, सरस्वतीबाई धांदे, सुगंधाबाई पोटदुखी यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली वयाच्या १४ व्या वर्षापासून अंजनाताईंनी कामाला सुरवात केली. देशाच्या स्वातंत्र्य चळवळीच्या घडामोडीला कल्पना देणारी पुस्तके घरोघरी वाटण्याचे काम त्यांच्याकडे सोपविण्यात आले. अंजनाताईंनी कशाचीही भीती न बाळगता हे कार्य अव्याहतपणे चालूच ठेवले.[९]

अंजनाताईचे भाऊ गोपाल यांच्यावर रेल्वेचे रुळ उखडणे, पोस्ट ऑफीस जाळणे या सारखी घातपाती कृत्ये करण्यासंबंधी पकड वॉरंट होते. भूमिगत असलेल्या भावाला अन्न पुरविणे, पोलिसांच्या व सरकारच्या कार्यवाहीची कल्पना देणे इ. कामे अंजनाताई व अन्य मुली करीत असत. त्यांचा लहान भाऊ रामदास व इतर मुले रस्त्यावर आडवे पडून गाडया अडवित असत. पोलीस त्यांना पकडून लाठयांचे तडाखे देऊन सोडून देत. कारण ती मुले खूपच लहान होती. पोलिसांच्या गाडया गेल्या की मुले रस्त्यावर परत येत. अशा प्रसंगातून त्यांना प्रेरणा मिळत असे. अंजनाताईंच्या सहकारी मैत्रिणी यांनी महिला दल स्थापन केले होते. लढयात भाग घेऊन कोणी कोणती कामे करावी याचे मार्गदर्शन त्यांना जमनालाल बजाज यांच्या बंगल्यावर मिळाले. बजाज यांच्या घरी तीन दिवस मार्गदर्शन मिळाल्यावर सर्व मुलींनी मार्गदर्शनानुसार मिरवणूकी काढण्यास सुरवात केली. या मिरवणूकीचे नेतृत्व विनोबाजी भावे यांची मानसकन्या महादेवीताई या करीत होत्या. मिरवणूकीनंतर झेंडावंदन चालू असतांना पोलिसांनी सर्वांना पकडून तुरुंगात टाकले. वर्ध्याच्या जेलमध्ये त्यांना एक महिना ठेवण्यात आले. येथे अंजनाबाई आणि त्यांच्या सोबतच्या मुलींनी माफी मागावी यासाठी पोलीसांनी प्रयत्न केले. परंतू कोणीही माफी मागीतली नाही. शेवटी अंजनाताई आणि त्यांच्या वयाच्या लहान मुलींना लहान वय असल्यामुळे सोडून देण्यात आले. मात्र १६ वर्षावरील सर्व मुलींना शिक्षा झाली.[१०]

तुरुंगाबाहेर आल्यानंतर अंजनाताईंनी भूमीगत असलेला आपला भाऊ गोपाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांना जेवण व गरजेच्या वस्तू पुरविण्याचे कार्य केले. सोबतच त्यांच्या लपून राहण्याची व्यवस्था केली. दुर्देवाने गोपाल भूमिगत अवस्थेत असतांना आजारी पडला आणि उपचाराविना त्यातच त्याचा मृत्यू झाला. बालवयातच अंजनाबाई तुरुंगात गेल्यामुळे यापुढे तिला शाळेत कोणी घेणार नाही असे वाटून त्यांच्या वडीलांनी १९४३ साली रेल्वेत नोकरी करणाऱ्या रघुनाथ सहदेव कामडे या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे अनुयायी

असलेल्या तरुणांशी त्यांचे लग्न लावून दिले. लग्नानंतर अंजनाताई तुकडोजी महाराजांच्या अनुयायी बनल्या.[११]

आपले काका आणि भाऊ देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी होत असलेल्या चळवळीत उत्स्फूर्तपणे भाग घेतात. यापासून प्रेरणा घेऊन १४ वर्षाच्या बालवयात अंजनाबाई चले जाव चळवळीत सहभागी झाल्या. लहान वयात त्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लहान मोठी कामे केली. एक महिन्याचा कारावासही भोगला. अंजनाताईंचे कार्य आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असेच आहे.

## ३.४ जानकीदेवी बजाज यांचे योगदान :-

महात्मा गांधीजींचे मानलेले पाचवे पुत्र सेठ जमनालाल बजाज यांचे स्वातंत्र्य आंदोलनात फार मोठे योगदान आहे. वर्धा ही त्यांची कर्मभूमी असून त्यांचा विवाह जानकीदेवीसोबत झाला. विवाहानंतर जानकीदेवींनी महात्मा गांधीजींच्या आदेशानुसार साधी राहणी स्वीकारली.[१२]

सविनय कायदेभंगाच्या चळवळीत जानकीदेवींनी सहभाग घेतला होता. जमनलालजी बजाज यांच्या मृत्यूनंतर ऑगस्ट १९४२ मध्ये चले जाव चळवळ सुरु झाली. जानकीदेवीने आपला क्षण न क्षण जमनालालजींनी स्वीकारलेल्या कामाला लावावा असे गांधीजींना वाटत होते. त्यामुळे जानकीदेवींनी प्रथम गोसेवा करण्याचा संकल्प करुन टाकला. त्यामुळे स्वत: सत्याग्रहात भाग न घेता आपला मुलगा राधाकृष्ण याला भारत छोडो सत्याग्रहात भाग घेण्यास सांगितले. तेव्हा सरकारने राधाकृष्ण याला पवनार घातपात खटल्यात अडकविले. यावेळी जानकीदेवींनी रचनात्मक कार्य स्वीकारले होते. महात्मा गांधीजीच्या मते रचनात्मक कार्य सुध्दा सत्याग्रहीप्रमाणेच आहे.[१३]

१९४२ चे आंदोलनात जानकीदेवी रचनात्मक काम करीत असतांनाच मागे राहून कार्यकर्त्यांना कार्यप्रवण करण्यामध्ये आणि स्वातंत्र्यलढा सदैव ज्वलंत राहावा म्हणून सदैव

कार्यरत होत्या. जानकीदेवींनी आपली संपूर्ण जीवनशैली आणि निष्ठा भारतमातेच्या चरणी अर्पण केली होती.[१४] जानकीदेवींची सून सावित्रीदेवी (कमलनयन बजाज यांची पत्नी) या सुध्दा स्वातंत्र्यलढयात सामील झाल्या. १९४२ च्या आंदोलनासमयी त्या पकडल्या गेल्या. त्यांना काही काळ तुरुंगवासही झाला.[१५]

## ३.५ आष्टीच्या महिलांचे योगदान :-

आष्टी हे वर्धा जिल्हयातील एक गाव. १९४२ च्या आंदोलनाच्या काळात यावली, चिमूरबरोबर आष्टीचेही नाव भारतभर गाजत होते. आष्टी परिसरातील महिलांनी आष्टीला अहिंसक पध्दतीने लढा सुरु करुन हिंसक पध्दतीने संपलेल्या या शेवटच्या रणसंग्रामात प्रत्यक्ष भाग घेतला.

वर्धा येथील आंदोलनाचे पडसाद आष्टी येथे उमटले. मोतीराम होले यांच्याद्वारे आष्टीकरांना वर्धेवरुन महात्मा गांधींचा संदेश पोहोचला की, १७ ऑगस्टपासून सत्याग्रह आंदोलन सुरु करावयाचे आहे. परंतू त्याआधीच म्हणजे ९ ऑगस्ट पासूनच जेष्ठ नेत्यांची धरपकड सुरु होऊन बरेच नेते तुरुंगात गेले होते. आष्टीच्या नेत्यांनीही पोलीस स्टेशनवर ध्वज लावून सत्याग्रह आंदोलन सुरु करणार ही बातमी कळविली होती. त्यामुळे निरनिराळ्या गावातून लोक आष्टीला यायला निघाले. ठरल्यानुसार १६ ऑगस्ट रोजी आष्टीचे सत्याग्रही पोलीस स्टेशनवर राष्ट्रीय ध्वज लाण्याकरीता निघाले. तेव्हा पोलीसांनी लोकांवर गोळीबार केला. त्यात काही लोक शहीद झाले. तर अनेक लोक जखमी झाले.[१६]

## ३.६ खडकींच्या महिलांचा पराक्रम :-

आष्टीला रणकंदन सुरु असतांनाच खडकी व सिरसोलीचे सत्याग्रही गुलाबराव वाघांच्या नेतृत्वाखाली निघाले होते. त्यांच्यासोबत १००-१२५ सत्याग्रही होते. सत्याग्रही भगोती नदीवर शिदोऱ्या खात असतांनाच रामकृष्ण जोमदे यांनी आष्टीच्या रणकंदनाची त्यांना माहिती दिली.[१७]

खडकीच्या ३० ते ४० महिला उत्कृष्ट संघटक म्हणून काम करणाऱ्या कासाबाई शिंदे यांच्या नेतृत्वाखाली त्या ठिकाणी येऊन पोहोचल्या होत्या. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा मंत्र त्यांच्या कानात धुमत होता. 'झाड झडुले शस्त्र बनेंगे, पत्थर सारे बॉम्ब' आणि हे शेवटचे आंदोलन आहे, त्यामुळे आपल्या पराक्रमाची शर्थ मातृभूमीला दास्यातून मुक्त करण्याकरीता करावयाची आहे. या दोन मंत्रांनी मोहीत झालेल्या खडकीच्या जागृत महिलांचा जथ्था, सोबत नागपूरे कुटूंबातील अहिल्याबाई, कलावतीबाई आणि अन्नपूर्णाबाई, कौसल्याबाई, गंगूबाई शिवाय विठाबाई शिंदे या प्रमुख महिला सहभागी झाल्या होत्या. खडकी नदीच्या खडकाळ पात्रात वसलेल्या लहानशा खेडयातून ब्रिटीशांना भारतातून हाकलून लावण्यासाठी 'चले जाव' चा नारा देत खडकीच्या महिला निघाल्या होत्या.

रामकृष्ण जोमदे यांच्याकडून आष्टीच्या रणकंदनाची माहिती ऐकताच खडकी व सिरसोलीच्या सत्याग्रही जथ्थ्यातील काही लोकांत चुलबल सुरु झाली. काहींनी काढता पाय घेण्याची भाषा सुरु केली. अशा समयी खडकीच्या कासाबाई शिंदे खडकीचा रस्ता अडवून उभ्या राहिल्या आणि म्हणाल्या "ज्यांना घरी जायचे असेल त्यांनी खुशाल जावे परंतू जाण्यापूर्वी आपले कपडे उतरुन ठेवावे आणि आमचे कपडे घालावे. तुमचे उतरलेले कपडे आम्ही घालू म्हणजे पोलीसांना सत्याग्रहींची संख्या वाढलेली दिसेल. घरी गेल्यावर आमच्याकरीता स्वयंपाक करुन ठेवा"[१८]

कासाबाईंच्या या वाक्याने गावाच्या दिशेने माघारी वळलेल्या सत्याग्रहींच्या मनातील भीती नष्ट झाली. त्यांच्या स्वातंत्र्य भावना पुन्हा जागृत झाल्या. कासाबाईंच्या धैर्यामुळे एकही व्यक्ती गावाकडे परत गेला नाही. घाबरलेल्या लोकांच्या मनात लढण्याची भावना निर्माण करण्याचे काम काशीबाई शिंदे या बाणेदार स्त्रीने केले. खडकी गावाचे नाव काशीबाईने मोठे केले.

काशीबाईंमुळे उत्साहीत झालेले खडकीचे सत्याग्रही भारतमातेचा जयजयकार करीत तुकडोजी महाराजांची भजने म्हणत उत्साहाने आष्टीत शिरले.[१९] यावेळपर्यंत आष्टीच्या परिसरातील देलवाडी, झोलवाडी, खंबीत, अंतोरा, भारसवाडा, किन्हाळा या गावातील सत्याग्रही आष्टीत येवून पोहोचले. आष्टीतील लोकही सत्याग्रहाकरीता घराबाहेर पडत होते. 'इनक्लाब जिंदाबाद, वंदे मारतम, भारत माता की जय', असे नारे सुरु होते. सर्व सत्याग्रही पोलीस स्टेशनवर गेले. गुलाबराव वाघ यांनी इन्स्पेक्टर मिश्रा याला फाटक उघडण्यास सांगितले. जखमींना आम्हाला दवाखान्यात न्यायचे आहे, त्यांना पाणी द्यायचे आहे असे म्हटले त्यावर इन्स्पेक्टर मिश्रा म्हणाला, 'उन्हे हम कुत्तो का मूत पिलायेंगे, वे शहीद नही, कुत्ते है', हे ऐकताच गुलाबरावांनी मिश्राच्या दिशेने उडी घेतली. तेव्हा मिश्राने गोळी चालविली. परंतू धोतरात पाय अडकल्याने गुलाबराव पडले आणि वाचले. याचवेळी जमावाने दगडफेक सुरु केली. दगडांचा वर्षाव मिश्राच्या दिशेने होऊ लागला. मिश्राने गोळीबार सुरु  ठेवला. खडकीच्या अहिल्याबाई नागपूरे च्या दंडाला गोळी लागली. अहिल्याबाई जखमी झाली तरी ती लोकांना हिंमत देत होती व देशासाठी मरण्याची वेळ पुन्हा येत नाही अशी सांगत होती. मारा, झोडा असे अहिल्याबाई ओरडतच  होती. यावेळी स्त्रियांनी अष्टभूजेचे रुप धारण केले. यातच १८ वर्षाच्या खडकीच्या हिरालालला गोळी लागली. त्यावेळी गावातील कासाबाई, गंगूबाई, मंजुळाबाईंनी त्याला सावरले. परंतू तिथेच त्याला हौतात्म्य प्राप्त झाले.  गोळयांचा वर्षाव महिलांच्या दिशेने व्हायला लागला. एक गोळी कासाबाई शिंदेच्या उजव्या पंजाला लागलेली पाहून मंजूळाबाई धाऊन आली तोच एक छर्रा मंजुळाबाईंच्या कानाला चाऊन गेला.[२०] आपल्या हाताच्या दंडाला गोळी लागलेल्या अवस्थेतही अहिल्याबाई पोलीसांना म्हणाली, "अरे आयाबहिणींवर गोळया घालतांना तुम्हाला लाज कशी वाटत नाही? तुमच्या बायकांना गोटमार करुन त्यांना मारले तर तुम्हाला कसे वाटेल?" या वाक्याने पोलीस खरोखरच घाबरले. त्यांच्या बंदुकीतील

गोळयाही संपलेल्या होत्या. शेवटी इन्स्पेक्टर मिश्राला एकटे सोडून त्यांचे सहकारी पोलीस पळून गेले.

सब इन्स्पेक्टर मिश्रा दगडाच्या माऱ्याने मारला गेला. दोन पोलीस लाकडांच्या गंजीत दडले होते. गंजी पेटविल्याने ते जळून गेले. संमद नावाचा अधिकारीही मारला गेला.[२१]

आष्टीच्या या घटनेनंतर १७ गाडयांचा ताफा घेवून ऑफीसर यंग आष्टीला आला. आष्टीत त्याने अत्याचार सुरु केले. ११४ आरोपींना वर्धेला पाठवून ५२ हजार रुपये सामुदायिक दंड वसूल केला. आष्टीचा समाचार घेतल्यानंतर लष्कर खडकी, सिरसोली, वडाळा, नरसापूर येथे गेले. लोकांना मारझोड केली, आरोपी ठरविले त्यांना आष्टी व वर्धेला नेले. या काळात बहुतेक खेडयात महिला वर्ग एकजुटीने राहीला. लष्कर होते तोपर्यंत चार दोन ठिकाणे ठरवून मोठमोठया वाडयांच्या बाहेर महिला येऊन बसत, दोनचार दिवसांची बाळंतीण असो, की आजारी असो, सर्वांना बाहेर घेऊन त्या बसत त्यामुळे आणि मेहतासारखा शीलवान व कडवा प्रशासक आष्टीला असल्यामुळे येथील स्त्रियांवर चिमूरच्या स्त्रियांसारखे अत्याचार झाले नाहीत.

## ३.७ खडकीतील पराक्रम :-

आष्टीच्या संग्रामानंतर खडकीत लष्कर येणार याची कल्पना खडकीच्या लोकांना असल्यामुळे त्या गावात येणाऱ्या रस्त्यांवर अडथळे निर्माण केलेले होते. तसेच प्रत्येक घरात एक गोफण ठेवण्यात आली होती. दगडांचे ढीग रचण्यात आले होते. २५ महिला विठाबाई शिंदेच्या नेतृत्वाखाली गळयात गोफणी अडकवून देवळावर तयार राहणार अशी तयारी होती.

२५ ऑगस्टला अडथळे बाजूला करीत ५०० लष्करांचे सैनिक खडकीत आले. लोक मैदानात गोळा झाले. त्यात महिलाही होत्या. लष्करी अधिकाऱ्याजवळ आरोपी म्हणून ११

पुरुष व २ महिलांची नावे होती. अहिल्याबाई नागपूरे व कासाबाई शिंदे या दोन महिलांची नावे पोलीसांच्या यादीत होती. गावकरी मैदानात येताच कासाबाई झेंडयाच्या चबूतऱ्यावर उभ्या राहून झेंडयाचे रक्षण करीत होत्या. तेव्हा मॅजिस्ट्रेटने जोरात आदेश दिला, हट जावो वहाँ से तेव्हा कासाबाईने उत्तर दिले "मला मारल्याशिवाय तुम्हाला झेंडा काढता येणार नाही" कासाबाईने एकटीने ध्वजाचे ५०० शिपायांपासून रक्षण केले. शेवटी ३५ पुरुष व २ महिलांना घेवून पोलीस परत फिरले. परंतु कासाबाई शिंदे व अहिल्याबाई नागपूरे यांना पोलीसांनी रस्त्यातूनच घरी जाऊ दिले.[२२]

एकूणच खडकीच्या महिला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या शिकवणीमुळे प्रभावित झालेल्या असल्यामुळे आपल्या प्राणाची, कुटूंबाची किंवा मुलाबाळांची पर्वा न करता पुरुषांच्या खांद्याला खांद्या लावून प्रत्यक्ष लढ्यात सहभागी झाल्या. या महिलांचा हा पराक्रम ऐतिहासिक असाच आहे.

## संदर्भ


१. दमयंती पाठक, वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील सहकार्य, मंगेश प्रकाशन, नागपूर, २००३ पृ. १७६.

२. शं.गो. कोलारकर, आधुनिक विदर्भाचा इतिहास, मंगेश प्रकाशन, नागपूर २००३, पृ. २३४.

३. कित्ता पृ. २३५.

४. कित्ता पृ. २४१,२४२.

५. कित्ता पृ. २४५.

६. चंद्रशेखर धर्माधिकारी वर्धा जिल्हयातील स्वातंत्र्यलढा, पृ. ७२, ७३.

७. प्रशांत कोठे (संपा) भारतीय स्वातंत्र्यलढयात विदर्भाचे योगदान, स्मरणिका, शिवाजी महा. अकोट २०११, पृ. ३६.

८. कित्ता पृ. ३७.

९. श्याम येडेकर, भारतीय स्वातंत्र्यलढयातील स्त्रियांचे योगदान, मंगला येडकर, कोल्हापूर २००७ पृ. ३२९.

१०. कित्ता पृ. ३३०.

११. कित्ता पृ. ३३१.

१२. जानकीदेवी बजाज, माझी जीवनयात्रा, पृ. २७.

१३. सुधाकर पवार (संपा) वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्यलढयात व शैक्षणिक कार्यात योगदान (स्मरणिका) पंढरीनाथ महाविद्यालय, नरखेड २०१३ पृ. ७३.

१४. श्याम येडेकर, उपरोक्त पृ. १३६.

१५. कित्ता पृ. २४९.

१६. दमयंती पाठक, उपरोक्त पृ. १७९.

१७. रघुनाथ कडवे, आष्टीचा स्वातंत्र्यलढा पृ. ६३ ते ६७.

१८. दमयंती पाठक, उपरोक्त पृ. १८०.

१९. आर.एस. ठाकरे, आष्टीचा क्रांतीदिन पृ. ४५-४६.

२०. रमेश गुप्ता, बंडखोर खेडयांची गोष्ट पृ. १९५.

२१. दमयंती पाठक, उपरोक्त पृ. १८२.

२२. कित्ता पृ. १८३.

## प्रकरण - चवथे

# चंद्रपूर जिल्ह्यातील स्त्रियांचे योगदान

चंद्रपूर हे इतिहास प्रसिध्द शहर असून गोंड राजांची राजधानी होती. गोंड राजानंतर चंद्रपूरवर नागपूरकर भोसल्यांची सत्ता प्रस्थापित झाली. १३ मार्च १८५७ रोजी नागपूरचे राज्य डलहौसीने खालसा केल्याबरोबरच चंद्रपूरवर ब्रिटीशांचा अंमल सुरु झाला. १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दाचे पडसाद चंद्रपूर जिल्हयातही उमटले. लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधीजीच्या काळात चंद्रपूरमध्ये स्वातंत्र्य चळवळ जोमाने सुरु झाली. महात्मा गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रहाची घोषणा करताच चंद्रपूर जिल्हयात उत्स्फूर्तपणे सत्याग्रहाला सुरवात झ ाली. यात चंद्रपूर जिल्हयातील अनेक व्यक्तींनी भाग घेतला. १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनात विदर्भातील अन्य जिल्हयाप्रमाणेच चंद्रपूर जिल्हा सुध्दा आघाडीवर होता. चंद्रपूर जिल्हयीतल चिमूर येथील स्वातंत्र्य आंदोलनामुळे या जिल्हयाचे भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील स्थान अग्रेसर असलेले दिसून येते. या जिल्हयातील महिलाही या शेवटच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाल्या. स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झालेल्या चंद्रपूर जिल्हयातील महिलांना खूप यातना सहन कराव्या लागल्या.

१९४२ मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या 'चले जाव' घोषणेस राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या गीतातून साथ दिली. विदर्भ, मराठवाडा, मध्यप्रदेश व पश्चिम महाराष्ट्र या भागात खरे चैतन्य जागवून लोकांमध्ये प्रखर राष्ट्रभावना जागृत केली. त्यांच्या गीतांची रचना, शैली आणि गीत म्हणण्याची हातोटी अलौकिक होती. त्यांचे वक्तृत्व अजोड होते आणि भजन अप्रतिम होते. राष्ट्रसंतामुळे साऱ्या खेडयापाडयातील लोक जागे झाले आणि देशासाठी वाटेल तो त्याग करायला तयार झाले.

८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाची आणि राष्ट्रीय पुढाऱ्यांना ब्रिटीश सरकारने तुरुंगात टाकण्याची प्रतिक्रिया विदर्भातील इतर जिल्ह्या

प्रमाणेच चंद्रपूर जिल्हयात उमटली. पहाटे चार वाजता कॉंग्रेस वर्कस कमेटीच्या सर्व सदस्यांना सरकारने पकडून अहमदनगरच्या किल्ल्यात गुप्तपणे रवाना केले. शेठ खुशालचंदजी हे चंद्रपूर कॉंग्रेसचे प्रतिनिधी म्हणून मुंबईला अखिल भारतीय कॉंग्रेस कमेटीच्या अधिवेशनाला गेले होते. मुंबईचे अधिवेशन आटोपून ते चंद्रपूरला येत होते. त्यांना वाटेतच सरकारने अटक करुन तुरुंगात ठेवले. त्यामुळे उरलेल्या कार्यकर्त्यांनी कॉंग्रेसचा कार्यक्रम काय आहे याची माहिती जनतेला करुन दिली आणि मुंबईत तयार झालेल्या कार्यक्रमानुसार आपली चळवळ चालविली. १० ऑगस्ट रोजी राष्ट्रध्वज घेवून मिरवणूक काढण्यात आली. अटकसत्र सुरु असतांनाही लोकांचा मिरवणूका काढण्याचा उत्साह कमी झाला नाही. रोजच मिरवणूका निघू लागल्या. लोक पकडण्यात येवू लागले. जनार्दनपंत उपल्लवार यांना एका मिरवणूकी दरम्यान बेदम मारहाण करण्यात आली. एक महिन्यानंतर तुरुंगातच त्यांचे निधन झाले.[१]

१९४२ च्या स्वातंत्र्यचळवळीत चंद्रपूर जिल्हयातील अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते. त्यात प्रमुख सर्वश्री दादासाहेब कन्नमवार, जगदीशराव साळवे, निळकंठराव दिवाणजी, लक्ष्मणराव वासेकर, भगवतीप्रसाद मिश्रा, माधवराव फडके, कृष्णराव जोगी, गुलाबचंदजी बाढिया, रामचंद्रराव कवाडे आणि व्ही.ए. पाटील हे होते. या सर्व कार्यकर्त्यांना सरकारने अटक केली आणि निरनिराळ्या मुदतीच्या शिक्षा दिल्या.[२]

## ४.१ चिमूरचा स्वातंत्र्यलढाः-

१९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात चंद्रपूर जिल्हयातील चिमूर या गावाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. चिमूरचा इतिहास पाहता सुरवातीला बालाजीचे नाव डोळयासमोर येते. चिमूरमध्ये बल्लाळ नावाचा राजा होऊन गेला. परंतू तो बालाजी या नावाने प्रसिध्द झाला. चिमूरचा पहिला राजा बालाजी, चिमूरचा देव बालाजी, चिमूरचा पहिला शहीद बालाजी, अशाप्रकारे बालाजी नावाचे चिमूरमध्ये अत्यंत महत्व आहे. एवढेच नव्हे तर प्राचीन काळी

चिमूर ही नागवंशीय राजधानी होती. शिवाय चिमूरची घोडायात्रा ही विदर्भात प्रसिध्द आहे.[३] प्रसिध्द असलेल्या चिमूर गावात १६ ऑगस्ट १९४२ च्या क्रांतीने एक वेगळाच इतिहास घडविला.

९ ऑगस्ट पासून सर्वत्र 'चलेजाव' चळवळ सुरु झाली. संपूर्ण देशातील आंदोलनाची वार्ता चिमूरकरांच्या कानी येताच चिमूर मधील तरुण मंडळी पेटून उठली. चिमूरचे नेतृत्व कॉंग्रेसचे पुढारी श्री. उध्दवराव कोरेकर यांनी स्वीकारले. सेवाग्रामला स्वत: जावून प्रचारार्थ पत्रके आणून गावोगावी त्याचे वितरण सुरु झाले. १४ ऑगस्टला चिमूरला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे भजन झाले. त्यातील एक भजन, सरकारला उद्देशून म्हणण्यात आले होते.

राष्ट्रसंतांच्या भजनाच्या ओळी पुढीलप्रमाणे होते.

अब काहे को धूम मचाते हो,
दुखवाकर भारत सारे, आते है नाथ हमारे ॥
झाड झडूले शस्त्र बनेंगे, भक्त बनेगी सेना
पथ्थर सारे बॉंब बनेंगे, नाव लगेगी किनारे ॥

राष्ट्रसंताचे हे भजन ऐकून चिमूरची जनता ब्रिटीश अत्याचाराला प्रतिकार करण्यास सिध्द झाली.[४]

१५ ऑगस्ट १९४२ ला सकाळी चिमूरला प्रचंड मोठी मिरवणूक निघाली. भारत माता की जय, महात्मा गांधी की जय अशा घोषणा मिरवणूकीतील लोक देत होते. १६ ऑगस्टला वातावरण आणखी तापले होते. त्या दिवशी नागपंचमी असून रविवारचा दिवस होता. मिरवणूकीतील लोक आपल्या नेत्यांना मुक्त करण्याची मागणी करीत होते. मिरवणूकीच्या शेवटी सभा होणार होती. विश्रामगृहाकडे जाणाऱ्या मोर्चाला रोखण्यासाठी सर्कल इन्स्पेक्टर जरासंध याने गोळीबार सुरु केला. त्यात सोळा वर्षाचा कुमार बालाजी

रायपुरे शहीद झाला. पोलीसांच्या दडपशाहीने जनतेची सहनशक्ती संपलेली होती. जनतेने खूनका बदला खून म्हणून सब इन्सपेक्टर जरासंधाला त्याच्या पोलीस साथीदारासह मारुन टाकले. पुढे जनता सबडिवीजनला मॅजिस्टेट डुंगाजीकडे दाद मागायला विश्रामगृहात गेले असतांना डुंगाजीने त्यांचे म्हणणे ऐकायला बाहेर न येता 'तुम्हाला गोळ्या घालून भाजून काढू', असे म्हणून दार लावून घेतले.

मॅजिस्टेट डुंगाजीच्या अशा वागण्यामुळे लोकांचा संताप अनावर झाला आणि त्यांनी विश्रामगृहाला आग लावली. त्यात नायब तहसिलदार सोनवणे आणि डुंगाजी दोघेही जळून खाक झाले.[५] पोलीस स्टेशन, पोलीस क्वार्टर्स, पोस्ट ऑफीस इत्यादी सरकारी इमारतींना लोकांनी आग लावली. १७ ऑगस्टला चिमूरवर स्वातंत्र्याचा तिरंगा डौलाने फडकू लागला. १९ ऑगस्ट पर्यंत चिमूरवर जनतेचे शासन होते.[६]

चिमूर हत्याकांडाची माहिती कळताच सशस्त्र लष्करी दले चिमूरला मागविली गेली. चिमूरच्या जनतेने रस्त्यांवर उभे केलेले अडथळे पार करीत ४० पोलीसांसह, चंद्रपूरचे कलेक्टर आणि लष्करातील २०० ब्रिटीश व ५० भारतीय सैनिक चिमूरला येऊन पोहचले. १७ ते १९ ऑगस्ट असे तीन दिवस पूर्णपणे स्वतंत्र्य असलेल्या या गावावर लष्कराचा कडक अंमल सुरु झाला. लष्कराने लोकांवर अत्याचार सुरु केले. घरात जो सापडेल त्याला फरकटत बाहेर काढण्याचा व बेदम मार देण्यास लष्कराने सुरवात केली. नागरिकांच्या घरातील संपत्ती लुटली, स्त्रियांवर अत्याचार व बलात्कार केले. ब्रिटीश सैनिकांच्या हातून म्हाताऱ्या स्त्रिया, मुली, गर्भवती स्त्रिया सुध्दा सुटल्या नव्हत्या. ३०० लोकांना अटक करुन १५ फुट रुंद व २० फुट लांब कांजी हैसामध्ये ठेवण्यात आले. या खोलीतील लोकांची अवस्था मरणप्राय झाली होती.[७]

चिमूरमधील लष्ककाराच्या स्त्रियांवरील अत्याचारादरम्यान बऱ्याच स्त्रियांनी एकजूट करुन त्यांनी आपला बचाव केला. परंतु काही स्त्रिया घरात दडून बसल्या. त्यांच्यावर वयाचा विचार न करता सैनिकांनी अमानुष बलात्कार केले. चौकात चौफेर चालणारी

मशीनगण बसविली होती. परंतु चंद्रपूरचे कलेक्टर सुब्रमण्यम यांनी गोळ्या चालण्याचा आदेश माणुसकीला जागून दिला नाही. चिमूरमध्ये नादिरशहा सारखी लुट आणि दहशत सुरु होती. चिमूरच्या बातम्या बाहेर जाऊ दिल्या जात नसत. वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनाही तुरुंगात टाकण्यात आले. त्यांच्या अब काहे का धूम मचाते हो, या गीतांवर आणि वृत्तपत्रांवर बंदी लावण्यात आली.[८]

## ४.२ दादीबाई बेगडे यांचा पराक्रम :-

चिमूरमधील लष्कराच्या अत्याचाराने परीसीमा गाठली होती. या अत्याचाराचा तीव्र प्रतिकार करणारे पुरुषार्थी वीर चिमूरमध्ये किंवा परिसरात नव्हते अशातला भाग नाही परंतू सर्व पोलीस कोठडीत बंदिस्त होते. हे चिमूरकरांचे दुर्दैवच म्हणावे लागेल. त्यामुळे चिमूरकरांना कोणीच वाली नव्हता. सर्व चिमूरकर गर्भगळीत होवून शुन्यात पाहू लागले होते. कारण अशा प्रकारचे अत्याचार दैनंदिन स्वरुपात चालू होते. यावेळी कलेक्टर सुब्रमण्यम आठ दिवस चिमूरला ठाण मांडून बसला होता. त्याचेसमोर या सगळ्या किळसवाण्या घटना घडत होत्या. या अधिकाऱ्याला आपल्या भारतीय महिलांची भरदिवसा होत असलेल्या अत्याचाराची अजिबात लाज वाटली नाही. कारण सुब्रम्हण्यम जरी भारतीय असला तरी तो इंग्रजांचे तुकडे तोडणारच होता.

चिमूरमधील स्त्रियांवरील अत्याचाराला उधाण यायला लागले तेव्हा मात्र सौ. दादीबाई बेगडे ही महिला चवताळून उठली. तिला हे सारे अत्याचार व जुलूम सहन झाले नाही. दादीबाई पेटून उठल्या आणि त्यांनी निश्चय केला की, महिलांवरील अत्याचाराचे सर्व प्रकार कलेक्टरसमोर मांडायचे. शेवटी दादीबाई या सीताबाई नाईक, राधाबाई भोपे, मंदाकिनी भोपे, रुक्मिणी नाईक, भागीरथी राचलवार, सुंदरा नेनूलकर, या आपल्या मैत्रिणींसह सैनिकांच्या व पोलीसांच्या धमक्यांना न जुमानता शिताफीने जिल्हा मॅजिस्ट्रेट सुब्रमण्यम यांच्याकडे येवून पोहोचल्या. आतापर्यंत पोटात साठवून ठेवलेल्या

रागाचे 'ज्वालामुखीचा भडका' व्हावा तसा झाला. दादीबाई कलेक्टरांना म्हणाल्या की, "तुम्ही इंग्रजांचे वरिष्ठ अधिकारी आहात, शिवाय भारतीय आहात. आपल्याच भारतीय महिलांची इभ्रत हे बाटगे इंग्रज घेत असतांना तुम्ही चक्क उघडया डोळ्यांनी ते अत्याचार पाहत आहात. गोऱ्यांचे देशात भारतीयांनी जर असे अत्याचार केले असते तर गोरे चुप बसले असते काय"?

दादीबाईंच्या प्रश्नांनी कलेक्टर सुब्रम्हण्यम यांची भारतीयता काही अंशी जागृत झाली आणि त्यांनी लगेच गावगुंड, बलात्कार करणारे गोरे सोल्जर यांना ताबडतोब गावाबाहेर काढले आणि आदेश देवून अत्याचार थांबविले. दादीबाईंनी पराक्रमाने व धैर्याने आपल्या आईबहिणींवर होणारे अत्याचार थांबविले. त्यांनी झाशीच्या राणीचे रुप घेवून इतर महिलांना बेअब्रू होण्यापासून वाचविले. दादीबाईंचे कार्य अविस्मणीय आहे.[९]

दादीबाई बेगडे यांनी चिमूरमधील अत्याचाराच्या कालखंडात ५० महिलांना आपल्या वाडयात आश्रय दिला. ज्या महिला दादीबाईंच्या वाडयात आश्रयाला आल्या त्यांनी त्यांचे दागदागिने एका पातळात बांधून विहीरीत टाकले आणि त्यावर टीन टाकून रद्दी समान ठेवून दिले, त्यामुळे त्यांच्या अब्रूचे व मालमत्तेचे सरंक्षण झाले.[१०]

## ४.३ राधाबाई भोपे यांचे कार्य :-

१५ ऑगस्टला चिमूरमधील मुलींनी मिरवणूका काढून सरकार विरोधी नारे लावले. तेव्हा त्या मिरवणुकीत एका पोलीसांने एका मुलाला मारले आणि महात्मा गांधी व पंडीत नेहरुंना शिव्या दिल्या. ही घटना राधाबाई भोपे नावाची महिला अंगणातून पाहत होती. तेव्हा तिचा राग अनावर झाला आणि तिने लगेच अंगणाच्या कुंपणाची काठी काढून त्या पोलीसाची धुलाई केली.[११] राधाबाई भोपेंनी पोलीसांवर काठीचा प्रयोग करुन राष्ट्रसंतांच्या भजनाच्या ओळीचा प्रत्यक्ष पुरावा जनतेसमोर सादर केला.

## ४.४ प्रभावतीबाई घरोटे यांचे कार्य :-

प्रभावतीबाई घरोटे या शासकीय मुलींच्या शाळेत मुख्याध्यापिका होत्या. त्यांनीही आपल्या शासकीय कर्मचारी निवासस्थानामध्ये २५ महिलांना आश्रय दिला. प्रभावतीबाईंनी इंग्रजांच्या दडपशाहीची पर्वा न करता जुलमी अधिकाऱ्यांपासून महिलांचे संरक्षण केले.[१२]

२० ऑगस्टला चिमूरला लष्कर आल्यापासून चिमूर गावचा अन्य गावांशी संपर्क तोडून टाकण्यात आला होता. तरीही तेथील अत्याचाराची बातमी कर्णोपकर्णी चंद्रपूरच्या लोकांच्या कानावर गेली. चंद्रपूर बार असोसिएशनने ऑगस्ट १९४२ च्या शेवटच्या आठवडयात एक ठराव पारीत करुन सरकारने चिमूरच्या अत्याचारांची चौकशी करावी अशी मागणी केली. परंतू त्याकडे लक्ष न देता उलट सरकारने चिमूरला जाण्याच्या मार्गावर बंदी घातली.

## ४.५ नागपूरकर महिलांची चिमूरला भेट:-

जर्मन रेडीओ आणि स्वातंत्र्य सैनिकांच्या भूमिगत रेडीओने चिमूरची बातमी प्रसारीत केली. नागपूर व वर्धेला ही बातमी पोहोचताच वीर हरकरे व गोपाळराव वाळुंजकर यांनी चिमूरला जाता यावे म्हणून प्रयत्न केले. शेवटी विमलाबाई देशपांडे, द्वारकाताई देऊस्कर, विमल अभ्यंकर या प्रथम चिमूरला गेल्या. रमाबाई तांबे आणि डॉ. दुर्गाताई वझलवार नंतर गेल्या प्रथम गेलेल्या महिला चिमूरला बालाजीच्या दर्शनाला जातो म्हणून सांगून चिमूरच्या मंदिरात महिलांना भेटल्या. डॉ. वझलवारांनी बलात्कारी महिलांची वैद्यकीय तपासणी केली. चिमूरच्या महिलांचे सांत्वन केले. डॉक्टरी तपासणी करीत असतांना त्यांना एका पाच दिवसाच्या बाळंत झालेल्या स्त्रीवर बलात्कार झाला असे दिसले. तिच्या तोंडून शब्द निघत नव्हते इतकी ती या प्रसंगामुळे घाबरली होती.[१३]

नागपूरहून चिमूरला गेलेल्या डॉ. दुर्गाताई वझलवार प्रभूती पाच भगिनी व डॉ. मुंजे आणि घटाटे यांनी चिमूर प्रकरणावर सरकारने पाडलेला पडदा दूर करुन त्यांचे अघोर स्वरुप लोकांच्या निदर्शनास आणून दिल्यामुळे प्रांतिक सरकारला तोंड उघडावे लागले.[१४]

## ४.६ प्रा. भंसाळीचे ऐतिहासिक उपोषण :-

लंडन विद्यापीठात शिक्षण घेतलेले प्रा. भंसाळी मुंबईच्या एलफिन्टन्टन महाविद्यालयात काही काळ प्राध्यापक होते. गांधीजींच्या विचाराने प्रभावित झालेले प्रा. भंसाळी नोकरीच्या राजीनामा देवून साबरमतीच्या आश्रमात आले. पुढे गांधीजीबरोबर ते सेवाग्रामला आले. चिमूरच्या आणि आष्टीच्या अत्याचाराच्या बातम्याने प्रा. भंसाळी अत्यंत व्यथीत झाले. चिमूर आष्टीच्या हत्याकांडातील अत्याचाराच्या परिमार्जनासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले पण नोकरशाहीने त्यांना अजिबात प्रतिसाद न दिल्याने त्यांनी बलात्कारीत महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी आमरण उपोषण सुरु केले. (११ नोव्हेंबर १९४२) उपोषणादरम्यान ते चिमूरला पायी जावून परिस्थिती पाहून आले. पोलीसांनी येतांना त्यांना अटक केली आणि सेवाग्रामला आणून सोडले. प्रा. भंसाळी यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत चालली होती. ६ जानेवारी १९४३ रोजी सौ. अनुसयाबाई काळे यांच्या आग्रहास्तव डॉ. ना. भ. खरे यांनी उपोषणाच्या ठिकाणी जावून प्रा. भंसाळी यांची प्रकृती तपासली. प्रा. भंसाली यांची अतिशय बिघडलेली प्रकृती पाहून डॉ. ना.भ. खरे यांनी त्यांच्या मागण्या मध्यप्रांत सरकारच्या गर्व्हनरसमोर ठेवून त्यांचा पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश आले. शेवटी सरकार झुकले व त्यांच्या मागण्या मान्य झाल्या. त्यामुळे प्रा.भंसाळी यांनी ६३ व्या दिवशी म्हणजे १२ जानेवारी १९४३ रोजी आपले आमरण उपोषण सोडले.[१५] चिमूर येथील अत्याचारग्रस्त महिलांना न्याय मिळावा यासाठी प्रा. भंसाळी यांनी केलेले उपोषण संवेदनशीलतेचे व देशप्रेमाचे फार मोठे उदाहरण होय.

## ४.७ अनुसयाबाई काळे यांचे कार्य :-

१९४२ च्या चळवळीत सरकारने चिमूरच्या अपराधी लोकांवर खटले भरले. त्या खटल्यात काही लोकांना फाशीची शिक्षा होण्याच्या संभव होता. १९४२ च्या आंदोलनात शंकर नावाच्या एका अल्पवयीन मुलाला फाशी देण्यात आली होती. त्याला जर कायदेशीर मदत देता आली असती तर फाशी टळू शकली असती असे वकीलांचे मत पडले म्हणून डॉ. ना.भ. खरे यांच्या घरी नागपूरच्या काही प्रतिष्ठीत नागरिकांची आणि कार्यकर्त्यांची एक सभा होवून या प्रश्नाचा विचार करण्यात आला. त्यानंतर डॉ. खरे यांच्या अध्यक्षतेखाली एक 'फाशी निवारक समिती' स्थापन करण्यात आली. त्या समितीचे उपाध्यक्षपद सौ. अनुसयाबाई काळे यांना देण्यात आले. परंतू एका महिन्याच्या आतच डॉ. खरे यांची व्हॉईसरॉयच्या कौन्सिलवर नेमणूक झाल्यामुळे अनुसयांबाईंकडे फाशी निवारण समितीचे अध्यक्षपद आले. यावेळी एकूण फाशीची शिक्षा झालेल्यांची संख्या २४ होती. त्यात १ बैतूलचा, १० आष्टीचे आणि १३ चिमूरचे असे वीर होते.[१६]

अनुसयाबाई काळे यांनी १९४२ च्या चळवळीत प्रत्यक्ष भाग न घेतल्यामुळे त्यांना मनस्वास्थ नव्हते. त्यामुळे त्यांनी तनमनधनाने फाशी निवारण समितीचे कार्य सुरु केले. अनुसयाबाईंनी मुंबई, पुणे, अहमदाबाद, येथे दौरे काढले. सहासष्ट हजारांच्या जवळपास फंड गोळा केला. अनुसयाबाईंना नामवंत वकील रामभाऊ मनोहर, ॲड.बी.जी. घाटे, डॉ. केदार, डॉ. खरे, न्यायमूर्ती काकासाहेब पुराणिक, न्यायमुर्ती शंकरराव नियोगी इत्यादींचा पाठींबा होता. नागपूरच्या तरुण भारत ने चिमूरचे फाशी प्रकरण आपले प्रकरण मानले. अनुसयाबाईंनी सर्व प्राण व शक्ती पणाला लावली. कायदेशीर चक्रातून वगळता वगळता शेवटी सातजण उरले होते. सात जणांना वाचविण्यासाठी अनुसयाबाईंनी कशाचीही पर्वा केली नाही.[१७] शेवटी अनुसयाबाईंच्या प्रयत्नाला यश आले आणि सात जणांची फाशी टळली. चिमूर व आष्टी प्रकरणातील २४ पैकी २४ आरोपींची फाशीची शिक्षा रद्द झाली. याचे श्रेय अनुसयाबाई काळे यांनाच जाते.

फाशी निवारण समितीच्या अध्यक्ष म्हणून काम करतांना अनुसयाबाईंनी चिमूरच्या निराधार महिलांसाठी मदत मिळविली. सर्व सेवासंघाचे कार्यकर्ते ठक्करबाबांकडून चिमूरच्या महिलांकरीता, बाबांना चिमूरच्या निराधार महिलांची परिस्थिती दाखवून मदत मिळविली. नागपूरातून विशेषत: धंतोली भागातून धान्य, कपडे, पैसा अशी मदत अनुसयाबाई चिमूरपर्यंत पाठवीत असत. चिमूरला जाण्यावरचे निर्बंध यावेळेपर्यंत कमी झाल्यामुळे ही मदत चिमूर पर्यंत पोहचू शकली. त्यावेळी गोपिकाताई कन्नमवार या चिमूरच्या चरखासंघात होत्या त्यांनी चिमूरच्या महिलांना हिंमत दिली.[१८]

## ४.८ इंग्रज अधिकाऱ्यांच्या मातेची व पत्नीची गर्व्हनरांना विनंती :-

चिमूरच्या हत्याकांडात प्राण गमाविलेले इंग्रज अधिकारी ए.डी.ओ. टी.डी. डूंगाजी यांच्या मातोश्री कुंवरबाई दाराशा डुंगाजी यांनी व्हाईसराय आणि गर्व्हनर यांच्याकडे अर्ज करुन फाशीची शिक्षा झालेल्यांची शिक्षा रद्द करुन त्यांना काळया पाण्याची शिक्षा द्यावी अशी विनंती केली. "या आपल्या कृतीने न्यायाची प्रतिष्ठा वाढेलच परंतू त्या बरोबरच माझ्या दिवंगत पुत्राच्या आत्म्यालाही आपल्या या दयेच्या कृतीने संतोष वाटेल असा मला विश्वास वाटतो. त्यामुळे शक्य तितक्या लवकर शिक्षा कमी कराव्यात" अशी प्रार्थना केली.

चिमूर हत्याकांडात ए.के. सोनवणे या नायब तहसिलदाराचेही प्राण गेले. ते वरोऱ्याला नायब तहसिलदार होते. त्यांच्या पत्नी ग्लेडीज इलीनर सोनवणे यांनीही गर्व्हनर आणि व्हाईसराय यांच्याकडे दयेचा अर्ज केला. त्यात त्यांनी लिहले, "पतीच्या मृत्यूमुळे माझी जी हानी झाली तिचे दु:ख मी अनुभवीत आहे. तथापि फाशीची शिक्षा झालेल्यांना फाशी दिल्याने मला किंवा माझ्या पतीच्या आत्म्याला शांती मिळणार नाही म्हणून माझी नम्र प्रार्थना आहे की, माझ्या भगिनीच्या पतींना फाशीची शिक्षा देणे योग्य होणार नाही तरी आपण त्यांना प्राणदान देण्याची कृपा करावी."[१९]

वरील दोन्ही महिलांनी अशी पत्रे पाठवून जगातील अबलांना लाजविणारे औदार्य दाखविले. चिमूर येथील १९४२ च्या आंदोलनात महिलांनी दिलेले योगदान ऐतिहासिक असेच आहे.

१९४२ च्या भारत छोडो आंदोलनात चंद्रपूर, चिमूर, सोबतच ब्रम्हपूरी, गडचिरोली, वरोरा आणि इतर काही खेडयांमध्ये आंदोलनाचा जोर होता.

**संदर्भ :-**


१. श.गो. कोलारकर, आधुनिक विदर्भाचा इतिहास, मंगेश प्रकाशन, नागपूर २००३ पृ. ३०८.

२. कित्ता पृ.३०१

३. राजु खरडे, १९४२ च्या चले जाव चळवळीत नाग-विदर्भाचे योगदान (अप्रकाशित शोधप्रबंध) पृ. ९२.

४. भगवतीप्रसाद मिश्रा, भारतीय स्वातंत्र्य संग्राम मे चंद्रपूर पृ. २५८.

५. दमयंती पाठक, वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्यसंग्रामातील सहकार्य, मंगेश प्रकाशन नागपूर, २००३, पृ. १९८.

६. राजु खरडे, उपरोक्त पृ. ९९.

७. भगवतीप्रसाद मिश्रा, उपरोक्त पृ. २६१.

८. दमयंती पाठक, उपरोक्त पृ. १९९.

९. किशोर वैद्य, असे झुंजले चिमूर, चिन्मय प्रकाशन यवतमाळ, २००२, पृ. ३४.

१०. दमयंती पाठक, उपरोक्त पृ. २००.

११. कित्ता पृ. १९८.

१२. कित्ता पृ. २००.

१३. कित्ता पृ. २०१.

१४. ज.रा. जोशी, डॉ. ना.भा. खरे यांचे चरित्र पृ. १७०.

१५. राजु खरडे, उपरोक्त पृ. १०६.

१६. श.गो. कोलारकर, उपरोक्त पृ. २२३.

१७. दमयंती पाठक, उपरोक्त पृ. २०३.

१८. कित्ता पृ. २०४.

१९. कित्ता

## प्रकरण - पाचवे

# भंडारा जिल्ह्यातील स्त्रियांचे योगदान

भंडारा जिल्हा महाराष्ट्राच्या अतिपूर्वेकडे असून त्या भागला झाडीपट्टी म्हणतात. भंडाऱ्याची पितळेची भांडी भारतभर प्रसिध्द होती आणि आजही आहे. भांडे तयार करतांना भण भण असा आवाज होत असल्यामुळे त्या गावाला भंडारा असे नाव पडले असावे असा एक मतप्रवाह आहे. भंडारा जिल्हा तांदळाकरीता प्रसिध्द आहे.

भंडारा जिल्हयावर प्राचीन काळात मौर्य, सातवाहन, वाकाटक, कलचुरी, राष्ट्रकूट या घराण्याची सत्ता होती. मध्ययुगात येथे देवगिरीच्या यादवांची सत्ता होती. पुढे गोंडाची आणि नागपूरच्या भोसल्यांची सत्ता होती. नागपूरचे भोसले ब्रिटीशांचा अंमल येईपर्यंत या जिल्हयाचे प्रशासक होते. १८५४ पासून भंडाऱ्यावर ब्रिटीशांचा अंमल सुरु झाला. २ नोव्हेंबर १८६१ रोजी भंडारा जिल्हा मध्यप्रांतात समाविष्ट करण्यात आला. १८६७ मध्ये प्रशासनाच्या दृष्टीने भंडारा हे जिल्हयाचे ठिकाण, तर तिरोडा व साकोली येथे तहसिल केंद्र स्थापन करण्यात आली. अशाप्रकारे या प्रांताचा कारभार चीफ कमिश्नरच्या अधिपत्याखाली आला.

भंडारा नागपूरजवळ असल्यामुळे नागपूरच्या राष्ट्रीय आंदोलनाचे पडसाद भंडारा येथे उमटून, भंडारा येथे राष्ट्रीय जागृतीचे कार्य सुरु झाले. १८९४ पासून राष्ट्रीय चळवळीत येथील सुशिक्षित वर्ग सामील होवू लागला. लोकमान्य टिळकांच्या काळात भंडारा जिल्हयात स्वातंत्र्य चळवळीसाठी अत्यंत अनुकूल वातावरण निर्माण झाले. पुढे असहकार चळवळीत व झेंडा सत्याग्रहात भंडाऱ्यातील लोकांनी उत्स्फुर्तपणे भाग घेतला.

सविनय कायदेभंग चळवळीच्या वेळी हा जिल्हा सक्रिय होता. भंडारा जिल्हयात सविनय कायदेभंग चळवळ बंद झाली तरी, खादीप्रचाराचे कार्य चालूच होते. महिला वर्गाच्या सांयफेऱ्या व प्रभातफेऱ्या चालूच असत. मधून मधून सभाही होत असत. राष्ट्रीय

ग्रामोद्योग मंदिराचा मुहूर्त रोंढा येथे २१ मार्च १९४२ ला विद्यावती देवडिया (नागपूर) यांच्या हस्ते करण्यात आला. रोंढा हे गाव आमगाव जवळ आहे. या कार्यक्रमाला ३५० महिला उपस्थित होत्या. २४ मार्च १९४२ ला लाखनी येथील बापूराव विश्वनाथ कलाराच्या अध्यक्षतेखाली ६० लोकांची सभा झाली. मीराबाई, चिंतामण कलाराची मुलगी, शंकर पांडूरंग कलार आणि चिंतामण कलार यांची उमरेड येथील सभेत भाषणे झाली.[१] एकूणच १९४२ च्या चलेजाव आंदोलनासाठी प्रेरणादायी आणि पोषक असे वातावरण भंडारा जिल्हयात तयार झालेले होते.

९ ऑगस्टला मुंबईला महात्मा गांधीजींसह प्रमुख पुढाऱ्यांना अटक होताच संपूर्ण भारतात 'चलेजाव' चळवळीला सुरवात झाली. भंडारा जिल्हयात चळवळीला प्रारंभ होऊन लवकर चळवळीने तीव्र स्वरुप धारण केले. महात्मा गांधीजीसह जेष्ठ राष्ट्रीय पुढाऱ्यांना पकडल्याची व त्यांना अज्ञात स्थळी पाठविल्याची बातमी भंडारा येथे झेंडा वंदनाचे वेळी कळली. तेव्हा प्रक्षोभ निर्माण झाला. त्यावेळी जनतेवर लाठीमार गोळीबार करण्यात येवून जनतेला पोलीसांद्धारे अत्याचारी वागणूक देण्यात आली. स्थानिक पुढाऱ्यांना तुरुंगात डांबले. परिणामी सर्वत्र चळवळीने जोर धरला.

१९४२ च्या आंदोलनासमयी संपूर्ण भंडारा जिल्हयात असंतोषाचा भडका उडाला होता. पण तुमसर १९४२ च्या चळवळीत आघाडीवर होते. राष्ट्रीय पुढाऱ्यांना अटक केल्याची वार्ता तुमसरला येताच तेथे रात्री पुढला कार्यक्रम काय असावा हे निश्चित करण्याकरीता गुप्त बैठका झाल्या. पोलीसांना याचा सुगावा लागल्याने त्यांनी भंडाऱ्याहून जादा कुमक मागविली. परंतु जनता स्वस्थ बसली नव्हती. ती पोलीसांच्या हालचाली सावधपणे निरखत होती. पोलीसांनी प्रमुख नेत्यांना पकडले होते. त्यामुळे पोलीसांनी एकूण हिंसक वातावरण निर्माण केलेले होते. तरीसुध्दा तुमसरची जनता प्रभातफेरीकरीता रस्त्यावर आली. जमाव पोलीस स्टेशनच्या दिशेने निघाला. तेव्हा पोलीसांनी जमावावर गोळीबार केला. यात सहा जण ठार तर १३० लोक जखमी झाले. स्वातंत्र्याच्या या लढाईत तुमसरचे

६ वीर शहीद झाले. तुमसरचे नाव अमर झाले.[२] गोळीबारानंतर काही काळ लोक पांगले. परंतु पुन्हा सर्वजण शहीदांचे मृतदेह ताब्यात घेण्याकरीता एकत्र आले. शहीदांची निघालेली शवयात्रा वैशिष्टयपूर्ण होती. शवयात्रेला १० हजार लोक उपस्थित होते. यावेळी २५० स्त्रियांसुध्दा उपस्थित होत्या. महिला प्रथमच अंत्ययात्रेत श्रध्दांजली देण्याकरीता उपस्थित होत्या.[३]

तुमसरच्या जनतेवर गोळीबार करुन पोलीसांचे समाधान झाले नाही. पोलीसांनी आता दडपशाही सुरु केली. लोकमान्य राष्ट्रीय विद्यालय बंद करण्यात आले. अनेक पुढाऱ्यांना पकडून तुरुंगात टाकण्याचा सपाटा चालविला. सर्वश्री माकडे गुरुजी, नत्थुजी चौधरी, कर्मवीर बापूजी पाठक, दामले गुरुजी, बुधराम देशमुख, नारायणराव कारेमोरे, नारबाजी पाटील, भिवाजी लांजेवार, सदाशिव किटे यांच्यासह महिलांचे नेतृत्व करणाऱ्या कृष्णाबाई वैद्य, सुमित्राबाई ठाकूर, वेणूताई पाठक या सर्वांना पकडण्यात येवून भंडारा आणि जबलपूर तुरुंगात त्यांची रवानी करण्यात आली.

तुमसरला वरील घडामोडी घडत असतांना मध्यवर्ती ठिकाणी वसलेल्या मोहाडी गावात शांतता नांदणे शक्य नव्हते. मोहाडी गावाला आधीपासूनच नियमितपणे प्रभातफेरी व झेंडावंदन हे कार्यक्रम होत होते. तुमसरला भंडाऱ्याहून पोलीस कुमक जावू नये यासाठी मोहाडीच्या लोकांनी भंडारा-मोहाडी रस्त्यावर अडथळे निर्माण केले. पोलीसांनी मोहाडीच्या अनेक सत्याग्रहींना अटक केली. गावावर सामुहिक दंड आकारला आणि तो जबरीने वसूल केला. मोहाडीप्रमाणेच तुमसर क्षेत्रातील येरली, देव्हाळी, इवाणमोहाडी, आंधळगाव, सिहोरा, बडगाव, सुकडी व मुंढरी या गावातील लोकांनी आंदोलने केली. या सर्व गावातील २०४ व्यक्तींना अटक करण्यात आली. त्यांच्यावर खटले चालवून त्यांना ५ ते १९ महिने तुरुंगवासाची शिक्षा देण्यात आली.[४]

तुमसरच्या घटनांचा भंडाऱ्यात परिणाम होवून भंडाऱ्यात प्रक्षोभांचे वातावरण तयार झाले. १४ ऑगस्ट हा दिवस काळा दिवस म्हणून पाळला जावा असे भंडाऱ्यातील नेत्यांनी

आधीच एकमताने ठरविले होते. तुमसरच्या गोळीबाराचा निषेध व्यक्त करण्याकरीता १४ ऑगस्टला सायं. ६ वा. सभेचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत कडक बंदोबस्तात सभेला प्रारंभ झाला. या सभेत प्र. गो. शेंदुर्णीकर, श्रीमती प्रभावती जकातदार, मुनीश्वर शास्त्री, भाऊसाहेब टेंभेकर, नत्थुलाल मोहनवंशी इत्यादींची वीरश्रीयुक्त आणि इंग्रजांचा निषेध करणारी भाषणे झाली. या सभेतील भाषणे उत्तेजित करणारी असल्यामुळे पुन्हा जनता आणि पोलीस संघर्ष सुरु झाला. पोलीसांनी गोळीबार केला त्यात ३ लोक शहीद झाले. गोळीबारानंतर लोकांनी पोलीसांशी विवाद करुन मृतदेह ताब्यात घेतले आणि त्यावर सन्मानाने अंत्यसंस्कार केले. पोलसांशी विवाद करुन मृतदेह ताब्यात घेणाऱ्यात प्र.गो.श्री. शेंदुर्णीकर, प्रभावतीबाई जकातदार, बाबाजी जोशी, मुनिश्वर शास्त्री इत्यादी होते. या सर्वांना पोलीसांनी ताब्यात घेतले आणि रितसर खटले भरले.[५]

गोंदियातही इतर गावांप्रमाणे आंदोलन सुरु झाले. पोलीसांना न जुमानता सभा घेण्यात आल्या. ११ व १३ तारखेला मिरवणुका काढण्यात आल्या. त्यावेळी अनेकांना अटक करण्यात आली. गोंदियातील चतुर्भज जसानी यांनी गोंदियात रेल्वे लाईन उखडणे, टेलीफोन व्यवस्था विस्कळीत करणे आदी कामे हाती घेतली. पोलीसांना याची खबर लागताच चतुर्भज जसानी आणि इतरांना अटक करण्यात आली.

भंडारा जिल्हयातील प्रत्येक लहान लहान भागात १९४२ ची चळवळ पसरलेली होती. 'अडयाळ पवनी' या भागातही प्रभातफेरी व झेंडावंदन आयोजित करण्यात आलेले होते. येथेही पोलीसांनी अनेकांना अटक केली. सानगडी येथेही चळवळ जोरात सुरु झाली. या गावातील जगन्नाथराव गावीवार यांच्या प्रोत्साहनाने आंदोलन तीव्र बनले. सरकारने त्यांना अटक करुन त्यांच्यावर खटले भरले. येथील एकूण ३१ लोकांना पकडण्यात आले. या गावाव्यतिरिक्त बापावाडी, असगाव, मिन्शी करडी, खेडेपार, सोनेखाटी, पांजरा, जांभोरा, कोका, लेंडेझरी, किसनपूर, पालोरा, दवडीपार, नवेझारी, मुरमाडी, निलजबोरी इत्यादी

लहान सहान गावातही १९४२ ची चळवळ जाऊन पोहोचली होती. झेंडावंदन झाले नाही असे एकही गाव या भागात नव्हते.[६]

भंडारा जिल्हयातील सर्व भागातील या आंदोलनात अनेक स्त्रिया प्रत्यक्ष सहभागी झाल्या. परंतू त्यापेक्षा अनेक स्त्रिया अप्रत्यक्षरित्या या आंदोलनात सहभागी होत्या. आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व पुरुषांना त्यांच्या घरातील स्त्रियांचा पूर्ण पाठिंबा होता. आपल्या शक्यतेनुसार स्त्रियांनी पुरुषांना पूर्णपणे मदत केली.

इ.स. १९४१ मध्ये गोंदिया आणि सालेकसा भागात रोंधा येथे एक राजकीय परिषद आयोजित करण्यात आली होती. १९४२ ची पूर्वतयारी या परिषदेत करुन घेण्यात आली. या राजकीय परिषदेमध्ये त्यावेळेचे नागपूर प्रदेश कॉंग्रेस कमेटीचे अध्यक्ष पूनमचंद रांका, श्री. पन्नालाल देवडिया, कृष्णानंद सोक्ता, श्रीमती विद्यावती देवडिया वगैरे नेते मंडळी उपस्थित होती. त्यात युध्दविरोधी धोरण आणि वैयक्तिक सत्याग्रहाचा प्रश्न चर्चेला घेण्यात आला. त्यामुळे गोंदियातील कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण झाले. यातून १९४२ ची पूर्वतयारीही झाली.[७]

**संदर्भ :-**


१. दमयंती पाठक, वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्यसंग्रामातील सहकार्य, मंगेश प्रकाशन नागपूर, २००३ पृ. २११.

२. शं.गो. कोलारकर, आधुनिक विदर्भाचा इतिहास, मंगेश प्रकाशन नागपूर, २००३ पृ. ३०१.

३. राजू खरडे, १९४२ च्या चलेजाव चळवळीत नाग-विदर्भाचे योगदान (अप्रकाशित प्रबंध) पृ.६६.

४. शं.गो. कोलारकर, उपरोक्त पृ. ३०३.

५. दमयंती पाठक, उपरोक्त पृ. २१२.

६. शं.गो. कोलारकर, उपरोक्त पृ. ३०६-३०७.

७. हंडियेकर वि. ना., स्वातंत्र्य लढ्यातील भंडारा जिल्हा, ऑगस्ट क्रांती सवर्ण महोत्सव समिती, प्रकाशन नागपूर, १९९२ पृ. ८९.

## प्रकरण - सहावे

# अमरावती जिल्ह्यातील स्त्रियांचे योगदान

प्राचीन उमरावती आणि आताची अमरावती ही विदर्भाची सांस्कृतिक राजधानी आहे. रामायण आणि महाभारतामध्ये अमरावतीचा उल्लेख आहे. प्रभू रामचंद्राची आजी ही विदर्भाची होती. श्रीकृष्णाने रुक्मिणीचे हरण अमरावतीच्या देवीच्या मंदिरातून केले, अशी आख्याखिका आहे.

इ.स. १७२२ मध्ये अमरावती हे गाव आणि परगणे बडनेरा इनाम म्हणून राणोजी उर्फ संताजी भोसले यास छत्रपती शाहूकडून मिळाले.[१] त्यानेच अमरावतीचे पुनर्वसन केले. देवगावच्या तहाने हा जिल्हा दुसऱ्या रघुजी भोसल्यांनी वऱ्हाडातील इतर तीन जिल्हयांबरोबर निजामाला दिला. १८५३ मध्ये निजामाकडून वऱ्हाडचा कारभार इंग्रजांनी आपल्या हाती घेतला. राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेनंतर अमरावती जिल्हयात स्वातंत्र्य चळवळीला सुरवात झाली. १८९० मध्ये लंडनला जाणाऱ्या काँग्रेसच्या शिष्टमंडळात अमरावतीचे रघुनाथ पंत मुधोळकर, मोरोपंत जोशी यांचा समावेश होता. डिसेंबर १८९७ मध्ये अमरावतीला काँग्रेसचे १३ वे अधिवेशन भरले. मोरोपंत जोशी, रघुनाथपंत मुधोळकर, दादासाहेब खापर्डे हे अमरावतीचे नामवंत यावेळी काँग्रेसचे मुख्य पुढारी होते.[२] १९१२ च्या बांकीपुरा येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदाचा मान रंगनाथ मुधोळकरांना मिळाला.

गांधी युगात अमरावतीत वीर वामनराव जोशी यांचे प्रभावी नेतृत्व होते. त्यांनी किर्तनाद्वारे, आख्यानाद्वारे आणि साहित्याद्वारे लोकांच्या मनात देशप्रेम जागृत केले. स्वातंत्र्यलढयाच्या काळात अखिल भारतीय स्तरवरील अनेक महत्वाचे नेते अमरावतीत येऊन गेले. १९३० साली अमरावती जिल्हयात वीर वामनराव जोशी यांच्या नेतृत्वामुळे खेडयापाडयातही कायदेभंगाची चळवळ जोरात सुरु झाली. त्या चळवळीला सर्वत्र भरघोस पाठिंबा मिळाला. १३ एप्रिल १९३० रोजी डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली १९

स्वयंसेवकांची तुकडी दहीहांडयास रवाना झाली आणि त्यांनी मीठाचा कायदेभंग केला. यावेळी ब्रिटीश सरकारच्या दडपशाहीच्या धोरणामुळे अनेक नेत्यांना अटक झाली. या राष्ट्रीय आंदोलनात अमरावती जिल्हयातील यावली, पथ्रोट, वरुड ही गावे अग्रेसर होती. वैयक्तिक सत्याग्रहाच्या समयी अमरावतीला २१ नोव्हेंबर १९४० रोजी पहिला वैयक्तिक सत्याग्रह करण्याचा मान संभाजी विनायक उर्फ नानासाहेब गोखले यांना मिळाला.

८ ऑगस्ट १९४२ रोजी 'चलेजाव' चा ठराव काँग्रेसने मंजूर केल्यानंतर अमरावती शहरात आणि जिल्हयात जोरात आंदोलन सुरु झाले. यावली, बेनोडा या ठिकाणी तीव्र स्वरुपाचे आंदोलन झाले. १९४२ च्या चले जाव चळवळीत अमरावती जिल्हयातील स्त्रिया मोठया संख्येने सहभागी झाल्या.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या आरती मंडळामुळे या जिल्हयातील महिलावर्गात राजकीय जाण निर्माण झाली होती. या जिल्हयातील जागृत महिला १९४२ च्या लढ्याचे वेळी आष्टीच्या संग्रामात कमी संख्येने का होईना पुरुषांच्या बरोबरीने सहभागी झाल्या होत्या. वरुडला २५ मे १९४२ ला ६०० लोकांची सभा पुण्याचे शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. वीर वामनराव जोशींची एकसष्टी संपन्न करण्याच्या निमित्ताने या सभेचे आयोजन करण्यात आले होते. वीर वामनरावांनी काँग्रेसच्या उत्कर्षाकरीता खूप परिश्रम घेतले अशी त्यांची स्तुती करणारी भाषणे शंकरराव देव आणि पार्वतीबाई पटवर्धन यांनी दिली.[३]

मुलींमध्ये राष्ट्रीय भावना जागृत करण्यासाठी आत्मविश्वास वृध्दींगत करण्यासाठी त्यांची शिबीरे घेतली जात. १५ जून १९४२ ला हिंदसेवा दलाने मुलींच्या क्रीडा शिबीराचे आयोजन केले होते. ५५ विद्यार्थीनी या शिबीराला उपस्थित होत्या. हे शिबीर रोहणखेड (धामणगांव) या खेडात घेण्यात आले. शिबीरात वर्धेच्या गौराबाई विठ्ठलराव कोरडे यांनी मुलींना मार्गदर्शन केले. अनेक खेळ मुलींना शिकविले. विठ्ठल लक्ष्मण आणि सुखदेव विष्णू खराबे यांनी टकळी आणि रुमाल या वस्तू मुलींना बक्षीस दिल्या. जपानच्या आक्रमणामुळे

भयभीत झालेल्या इंग्रजाविरुध्द आपल्या देशाची सेवा करावी असे मुलींना सुचविण्यात आले. १९४२ मध्ये डॉ. बी.के. दिवाणजींच्या पत्नी दिवाणजी बाईंनी अमरावतीला कामगारांचा मोर्चा काढला. कामगारांना निश्चित पगार मिळावा, त्याचप्रमाणे महागाई भत्ता मिळावा या उद्देशाने मोर्चा काढलेला होता. या मोर्चात ५० महिला होत्या.[४]

काँग्रेस मुंबईला अधिवेशन घेऊन 'चलेजाव' चा ठराव पास करणार या घटनेचा धसका ब्रिटीश सरकारने घेतला होता आणि म्हणून सरकारने ठराव पारीत होण्यापूर्वीच अमरावती शहरात अटकसत्र सुरु केले. ५ ऑगस्ट रोजी श्री. शंकरलाल दुबे यांना अटक करण्यात आली. अमरावती शहरातील ही पहिली अटक समजली गेली. त्यानंतर बऱ्याच जणांना तुरुंगात टाकण्यात आले.  दिनांक १ ऑगस्ट रोजी संभाजीराव गोखले, वीर वामनराव जोशी, डॉ. भोजराज यांना व १० ऑगस्टलाच डॉ. अण्णासाहेब देशमुख, डॉ. सोमण, बाळासाहेब मराठे आणि बाळकृष्ण भंडारी यांना अटक करण्यात आली.[५]

या अटक सत्राची तीव्र प्रतिक्रिया उमटली. यावेळी ब्रिटीशांनी अनेकांना अटक केली. सरकारने वृत्तपत्रांवर आणि रेडीओवर अनेक बंधने घातली. त्यामुळे लोकांच्या संतापात भर पडली. नेत्यांच्या अटकेने तरुण मने संतप्त होत होती. प्रक्षोभाच्या वातवरणाखाली अमरावतीतले युवक आणि पोलीस यांच्यात झटापटी घडत होत्या. त्यातच तुकडोजी महाराजांच्या झंझावती प्रचार सुरु होता त्यामुळे जनतेत एक प्रकारे चैतन्य निर्माण झाले होते.  दगडांनी बॉंमची जागा घेतली. शाळा, कॉलेजस सर्वच बंद होती, सारा विद्यार्थी वर्ग पेटून रस्त्यावर आला होता. प्रक्षोभित जमाव नगरपालिकेसमोर एकत्रित आला व त्यांनी मिरवणूक काढण्याचा प्रयत्न केला. अमरावतीतले सर्व रस्ते अडविण्यात आले. लोकांनी सिटी कोतवालीवर राष्ट्रीय झेंडा फडकविण्याचा निश्चय केला. तेव्हा जमाव हटविण्याच्या घोषणा करुन पोलीस लोकांवर चालून येऊ लागले. त्यांच्यावर राष्ट्रीय घोषणा देत लोक दगडफेक करु लागले.[६]

## ६.१ कृष्णाबाई रंगारी यांचे बलिदान :-

सिटी कोतवालीवर झेंडा लावण्याकरीता अमरावती शहरातील जमाव जमला होता. जमावाने राष्ट्रीय घोषणा देत दगडफेक सुरु केली. तेव्हा पोलीस अधिकारी मेल्ड्रम भडकला आणि त्याने पोलीसांना लाठीमार करण्याचा आदेश दिला. परंतु लाठीमाराने लोक हटत नाही हे लक्षात आल्यानंतर पोलीस अधिकाऱ्यांनी गोळीबार करण्याचा हुकूम दिला. तेव्हा पोलीसांनी प्रथम हवेत गोळीबार केला. त्यावेळी जमावाने चहूबाजूंनी दगडांचा वर्षाव सुरु केला. पोलीसांनी आता जमावाच्या दिशेने गोळ्या झाडण्यास प्रारंभ केला. तेव्हा मोर्शी तालुक्यातील गणेशपूरची कृष्णाबाई रंगारी ही तरुण महिला राजकमल चौकाच्या दिशेने जात होती. जाता जाता ती मिरवणूक पाहत होती, तिला या मिरवणूकीचा अभिमान वाटत होता. इतक्यात पोलीसांची एक गोळी कृष्णाबाई रंगारी यांच्या छातीत घुसली. कृष्णाबाई रक्ताच्या थारोळ्यात पडली आणि शहीद झाली.

कृष्णाबाई शहीद झाली ही बातमी कळली तर लोक आणखी चिडतील आणि ते आपल्यावर त्वेषाने हल्ला चढवतील या भीतीने पोलीसांनी लगेच कोणाला काही कळू न देता कृष्णाबाईला गाडीत टाकले आणि कृष्णाबाईवर त्यांनी अंत्यसंस्कार केले. त्यामुळे जमावातील लोकांना कृष्णाबाई शहीद झाली ही बातमी कळली नाही.[७]

कृष्णाबाईंची ही हकीगत लोकांपासून लपविली तरी सरकारी दप्तरात तिची नोंद झालीच आणि संपूर्ण विदर्भातील एकमेव शहीद महिला म्हणून कृष्णाबाईचे नाव अजरामर झाले.[८]

## ६.२ भूमिगत कार्यकर्त्यांना महिलांची मदत :-

ऑगस्ट क्रांती आंदोलनाचे क्रांतिकारक शामनारायण काश्मिरी आणि हिंदुस्थानी लालसेनेचे सरसेनापती मगनलाल बागडी भूमिगत असतांना अमरावतीला आले. काश्मिरी आठ दिवस तर मगनलाल बागडी अनेक दिवस अमरावतीला होते. काश्मिरी जेठमलजी

वजीर यांच्याकडे तर मगनलाल बागडी चंद्रभानजी ठाकूर व मिर्झा यांच्याकडे होते. यावेळी या भूमिगत नेत्यांना सुरक्षित राखण्यात अमरावतीच्या महिलाही सहभागी होत्या.

### ६.३ सुंदराबाई पटेरिया यांचे पराक्रम :-

चलेजाव चळवळ सर्वत्र जोरात सुरु असतांना आणि अमरावती शहरातील सर्व प्रमुख नेत्यांना तुरुंगात टाकले असतांना अमरावतीच्या छत्रपुरी खिडकी भागात राहणाऱ्या साधारण परिस्थितीच्या जिजोदिया ब्राम्हण परिवारातील श्रीमती सुंदराबाई मनसुखलाल पटेरिया या शूर महिलेने, पारंपारिक पध्दतीच्या पडदा पध्दतीची पर्वा न करता किंवा समाज काय म्हणेल याची सुध्दा पर्वा न करता सरकारी कार्यालयावर नेण्याकरीता महिलांचा मोर्चा काढला. श्रीमती कांताबेन वर्मा या पराक्रमी महिलने या मोर्चाचे नेतृत्व केले होते.

अमरावती शहरातील महिलांनी काढलेल्या या मोर्चाचे ठिकठिकाणी स्वागत झाले. शहरातून निघालेला हा महिलांचा मोर्चा प्रथम कॅम्प भागातील वकिलांच्या बार रुममध्ये गेला. मोर्चातील महिलांनी वकिलांना बांगडयांचा अहेर केला. तेथून त्या डेप्युटी कमिश्नरच्या कार्यालयावर गेल्या. महिलांच्या मोर्चाची बातमी पोलीसांना कळताच पोलीसांनी महिलांना अडविले आणि त्यानंतर सर्व महिलांना कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये आणले. पोलीसांनी महिलांना माफी मागावी यासाठी त्यांच्यावर दडपण आणले. परंतु महिलांनी माफी मागण्यास नकार दिला. यावेळी सुंदराबाई पटेरिया यांनी सरकारने आपल्यावर खटला भरावा असे आव्हान दिले. शेवटी सरकारने सुंदराबाईवर खटला भरला आणि सुंदराबाईला त्या खटल्यात एक महिन्यांची शिक्षा झाली.[९]

कोणत्याही गोष्टीची पर्वा न करता देशसेवेने भारावून गेलेल्या सुंदराबाई पटेरिया यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी केलेला पराक्रम हा निश्चितच प्रेरणादायी आहे.

## ६.४ अमरावतीच्या इतर महिलांचा पराक्रम :-

१९४२ च्या या चळवळीत अमरावतीमधील अनेक कुटूंब सक्रिय सहभागी होते. त्यात हरिपंत देवधर यांचा समावेश होता. ते स्वत: सरकारी नोकरीत होते पण त्यांच्या कुटूंबातील सदस्य त्यांची पत्नी लक्ष्मीबाई, भाऊ आणि मुली यांनी चळवळीत भाग घेतला. लक्ष्मीबाई या पार्वतीबाई शिवाजीराव पटवर्धन यांच्या सोबत चळवळीत सहभागी असत. लक्ष्मीबाई देवधरांच्या मुली शांता व इंदू या लहान जुळया भगिनी प्रभात फेऱ्यांमध्ये राष्ट्रीय गाणी व सभांमध्ये स्वागत गीत म्हणावयास जात असत.[१०]

मुंबईचे त्र्यंबकराव ठाकूर हे व्यवसायनिमित अमरावतीला स्थाईक झाले. ते काँग्रेसचे कार्यकर्ते होते. १९४२ च्या आंदोलनात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. त्यांच्या पत्नी कमलाबाई या वनिता समाज या प्रसिध्द संस्थेच्या संस्थापक सदस्या बनल्या. कमलाताई काँग्रेसच्या महिला आघाडीत कार्य करीत होत्या. १९४२ च्या आंदोलनात प्रभावी वक्तृत्वामुळे त्या प्रसिध्दीस आल्या.

शेंदूरजना घाट येथील शांता नायजी पिंजरकर या महिलेने या चळवळीत भाग घेवून महत्त्वपूर्ण कामगिरी केली. प्रभावती बाळकृष्ण बेलसरे या मोर्शीच्या महिलेने एक वर्षापर्यंत भूमिगत राहून महत्वाचे कार्य केले. शांताबाई श्रीधर भट या कम्युनिष्ट विचारसरणीच्या महिलेने समाजकार्याबरोबरच राजकीय चळवळीत भाग घेतला. त्यांनी १९४२ च्या चळवळीत सहभागी असलेल्या लोकांना आश्रय दिला. कार्यकर्त्यांना आर्थिक मदत केली. भूमिगत असलेल्या कार्यकर्त्यांना त्यांनी भरपूर मदत केली.[११]

फेब्रुवारी १९४३ मध्ये सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांच्या संयोजकत्वाखाली 'अमरावती जिल्हा फांशी निवारक समितीची' स्थापना होऊन समितीतर्फे गोळा केलेला फंड, आष्टी चिमूरच्या फाशीची शिक्षा झालेल्यांची अपीले, फेडरल कोर्ट व प्रीव्ही कौन्सिलकडे करण्यासाठी देण्यात व्हाईसरायकडे ठराव करुन पाठविले होते.[१२]

## ६.५ यावलीचा स्वातंत्र्यलढा :-

अमरावती जिल्हयातील यावली या गावाने १९४२ मध्ये इतिहास घडविला. या गावातील चळवळीच्या काळातील घटना कधीही विसरता येणार नाही. १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीतही या गावातील लोकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. येथील जनता एकमेकांच्या खांद्याला खांद्या लावून राष्ट्रीय चळवळ यशस्वी करण्यासाठी नेहमीच सिध्द राहत होती.

१४ ऑगस्ट १९४२ रोजी पंजाबराव यावलीकर यांच्या नेतृत्वाखाली यावलीतील लोक गांधी चौकात एकत्र जमले. त्यात हिंदू मुसलमान, चांभार, महार, तेली, कुणबी, माळी, इत्यादी सर्व जातीतील लोक होते. भारतीय एकात्मा येथे अवतरली होती. १५ ऑगस्टला सकाळी ८.०० वाजता पासून गावातील व परिसरातील जनता जुलमी इंग्रज सत्तेची प्रतीके ताब्यात घेण्याच्या निर्धाराने गांधी चौकात एकत्रित झाली. यावेळी अनेक स्त्रिया उपस्थित होत्या. त्यांनी सत्याग्रहींना मंगल आरत्यांनी ओवाळले. सत्याग्रहींनी माहुली पोलीस स्टेशनवर मोर्चा नेवून ते ताब्यात घेतले. त्यामुळे चिडलेल्या इंग्रजांनी १७ व १८ ऑगस्टला दडपशाही सुरु केली. यावलीकरांनी जिवाची पर्वा न करता पोलीसांशी दोन हात केले. यावलीकर जनतेने गावठी शस्त्रनिशी शस्त्रसज्ज पोलीसांबरोबर सतत चार तास केलेला संघर्ष देशाच्या स्वातंत्र्य लढ्याचे इतिहासातील सुवर्णपर्व ठरला. यावलीच्या जनतेने इंग्रजांच्या छळवादाला धिरोदात्तपणे तोंड दिले.[१३]

दि. १५ ते १८ ऑगस्ट या तीन दिवसात यावलीतील क्रांती व प्रतिकारांची गाथा घडली. यावलीच्या या संपूर्ण लढ्यात एकूण ३२ इसमांना गोळया लागल्या. त्यात तानाबाई न्हावीण (कानेरकर) नावाची एक महिला होती व उध्दव ढोक नावाचा ९ वर्षाचा अल्पवयीन मुलगाही होता. त्यापैकी तीन इसम तात्काळ शहीद झाले, २ दुसरे दिवशी शहीद झाले. २ तुरुंगात व १ तुरुंगातून सुटल्यावर शहीद झाले. एकूण ७१ लोकांना अटक झाली. पैकी ९ इसम खटल्याच्या निरनिराळ्या अवस्थेत सुटले. ६२ लोकांना निरनिराळ्या मुदतीच्या

शिक्षा झाल्या. यावलीवर १०,००० रु. सामुदायिक दंड बसवून तो १३४ लोकांकडून वसूल करण्यात आला. दंड न देणाऱ्यांचा छळ करण्यात आला.[१४]

## ६.६ इतर भागातील स्वातंत्र्यलढा :-

अमरावती व यावलीप्रमाणे जिल्हयातील सर्वच तालुक्यांमधून १९४२ च्या चलेजाव चळवळीने पेट घेतला. बेनोडा, इत्तमगांव, लोणी या भागात जनतेने सरकारवर हात न उचलता हसत हसत मृत्यूच्या दाढेत जाण्याचा पराक्रम केला. संपूर्ण अमरावती जिल्ह्यात या चळवळीने व्यापक स्वरुप घेतले. अनेक लहान लहान गावात झालेल्या या आंदोलनात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिला सहभागी झाल्या होत्या. अनेक महिलांनी पुरुषांना लढयासाठी सिध्द केले. अनेक महिलांनी अप्रत्यक्षरित्या या आंदोलनाकर्त्यांना मदत केली. महिलांनी दिलेल्या योगदानाची पाहिजे त्या प्रमाणात इतिहासात नोंद न झाल्यामुळे आजही अनेक सक्रिय सहभाग घेणाऱ्या महिलांची कामगिरी काळाच्या उदरात गडप झालेली दिसते.

**संदर्भ :-**


१. भि. दे. कारंजकर, अमरावती शहराचा इतिहास, अमरावती नगरपालिका, अमरावती, १९७८ पृ. ३७.

२. कित्ता, पृ. २२७.

३. दयमंती पाठक, वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील सहकार्य, मंगेश प्रकाशन, नागपूर २००३, पृ. २०५.

४. कित्ता पृ. २०६

५. नानासाहेब दिघेकर, अमरावती जिल्हयातील स्वातंत्र्यलढा, ऑ.क्रां.सु.म.समिती १९९२, पृ.५७.

६. शरद कोलारकर, आधुनिक विदर्भाचा इतिहास, मंगेश प्रकाशन नागपूर, २००३ पृ.२७०.

७. तारा धर्माधिकारी, स्वातंत्र्यलढ्यातील स्त्री, पृ. ९२.

८. दमयंती पाठक, उपरोक्त पृ. २०७.

९. बा.व.खापर्डे (संपा), अमरावती शहराचा इतिहास, अमरावती महानगरपाकिा, अमरावती, २००१ पृ. २९२.

१०. संदीप हातेवार (संपा), भारताच्या स्वातंत्र्य लढयात निम्नवर्गीय महिलांची भूमिका (स्मरणिका) २०११, पृ. ४३.

११. कित्ता पृ. ४४.

१२. वा. ब. खापर्डे (संपा), उपरोक्त पृ.३०३.

१३. भि. र. वाघमारे, अमरावती जिल्हयातील स्वातंत्र्य आंदोलन, वेदमुद्रा प्रकाशन, अमरावती, २०१३ पृ. १९०.

१४. ह. वा. देशपांडे, यावलीचा स्वातंत्र्यसंग्राम, पद्मश्री प्रकाशन, २०१४, पृ. १६१.

## प्रकरण - सातवे

# अकोला जिल्ह्यातील स्त्रियांचे योगदान

अकोला जिल्हा विदर्भातील एक महत्त्वाचा जिल्हा. हा जिल्हा १८५३ पर्यंत निजामाकडे होता. तत्पूर्वी तैनाती फौजेच्या खर्चाच्या रकमेचे कर्ज निजामाकडे असल्यामुळे अकोला जिल्हा १८५३ मध्ये इस्ट इंडिया कंपनीकडे सोपविण्यात आला. १८५७ मध्ये वऱ्हाडचे दोन जिल्हे करण्यात आले. १) पश्चिम वऱ्हाड (मुख्य केंद्र अकोला), २) पूर्व वऱ्हाड मुख्य केंद्र (अमरावती). इ.स. १९०३ च्या कराराने वऱ्हाड हा भाग ब्रिटीश सरकारने आपल्याकडे २५ लाख रुपये वार्षिक भाडे निजामाला देण्याच्या कराराने प्राप्त केला आणि हा वऱ्हाडचा भाग मध्य प्रांताला जोडण्यात आला आणि तेथील चीफ कमिश्नरकडे राज्यकारभाराची जबाबदारी सोपविण्यात आली.

प्राचीन काळात अकोला जिल्हयात मौर्य, सातवाहन, वाकाटक, कलचुरी, राष्ट्रकुट या राजघराण्याची सत्ता होती. मध्ययुगात देवगिरीच्या यादवांची अकोला जिल्हयावर सत्ता होती. इ.स. १२९४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजी याने देवगिरीवर आक्रमण करुन तेथील राजा रामदेव यादवाला आपली सत्ता पत्करण्यास भाग पाडले. इ.स. १३१८ मध्ये देवगिरीच्या यादवांची सत्ता संपुष्टात आली तेथे अल्लाउद्दीन खिलजीची सत्ता प्रस्थापित झाली. त्यामुळे अकोला जिल्हयावर अल्लाउद्दीनची सत्ता प्रस्थापित झाली. पुढे तुघलकांच्या काळात दक्षिणेत बहामनीची सत्ता उदयास आली. परंतू १४८५ नंतर बहामनी सत्तेचे विभाजन झाले. फतेहउल इमादशहा याने इ.स. १४८५ मध्ये वऱ्हाड प्रांतात आपली सत्ता स्थापन करुन राजधानी एलिचपूर ठेवली. तेव्हांपासून वऱ्हाड प्रांतात व पर्यायाने अकोला जिल्हयात इमादशाहीची सत्ता प्रस्थापित झाली. पुढे वऱ्हाड मोगलांच्या ताब्यात गेला. औरंगजेबाच्या मृत्यूसमयी गाझीउद्दीन फिरोज जंग हा वऱ्हाडचा सुभेदार होता. परंतू अकोला जिल्हा औरंगजेबाचा वजीर असदखानच्या वैयक्तिक जहागिरीचा एक भाग होता. त्याचा प्रतिनिधी

ख्वाजा अब्दुल लतीफ हा अकोला येथे राहत असे. त्यानेच अकोल्याला परकोट बांधून अकोल्याचे नाव आपल्या मालकांच्या नावाने असदगड असे ठेवले.

इ.स. १७१९ मध्ये पेशवा बाळाजी विश्वनाथ याने मोगल बादशहाकडून प्राप्त झालेल्या सनदेनुसार वऱ्हाड, खानदेश, गोंडवाना या भागातून चौथाई व सरदेशमुखीचे वसुलीचे अधिकार मिळविले. ३ सप्टेंबर १७२४ रोजी साखरखेर्डा येथे पहिला निजाम चिकुलीस खान आसफजल याने हैद्राबादचा सुभेदार मुबारिज खानचा पराभव करुन दक्षिणेत आपले पाय रोवले आणि तो दक्षिणेचा सुभेदार बनला. परंतू नागपुरचे भोसले राजे वऱ्हाडचे मोकासदार असून ते त्या भागातून चौथाई वसूल करीत असे. त्याचवेळी निजामही त्या भागातून राजस्व वसूल करत असे. अशा प्रकारे वऱ्हाड प्रांतावर एकाचवेळी भोसले आणि निजाम या दोघांचा अंमल प्रस्थापित झाला. १८०३ पर्यंत नागपूरच्या भोसले राजाचा अंमल निजामबरोबरच वऱ्हाडवर होता. १८०३ मध्ये दुसऱ्या रघुजी बरोबर झालेल्या देवगावच्या तहाने ब्रिटीशांनी वऱ्हाडचे चार जिल्हे निजामाकडे सोपविले. पुढे निजामाकडून हा प्रदेश इंग्रजांनी घेतला.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात अकोला जिल्हयाचे योगदान महत्वपूर्ण आहे. अकोला जिल्हयात राष्ट्रीय जागृतीचे कार्य जोमाने सुरु झाले. खंडेराव बाळाजी फडके यांनी १८६७ मध्ये वऱ्हाडसमाचार नावाचे साप्ताहिक सुरु करुन जनतेत राष्ट्रप्रेम, राष्ट्रभिमान निर्माण करण्याचे कार्य केले. पुढे लोकमान्य टिळकांचा स्वदेशी प्रचार व राष्ट्रीय शिक्षणाचे कार्यही अकोला जिल्हयात जोमाने सुरु झाले. लोकमान्य टिळकांची स्वराज्याची मागणी अकोला जिल्हयात रुजू लागली. त्यांच्या विचारांनी प्रभावित झालेला गट अकोल्यात निर्माण झाला. या जहाल गटाने अकोला व संपूर्ण अकोला जिल्हयात ब्रिटीश विरोधी आंदोलन तीव्र केले. गांधी युगात असहकार चळवळ आणि कायदेभंग चळवळीत अकोला जिल्हा अग्रेसर होता. ब्रिजलाल बियाणी, दादासाहेब गोळे यांनी दहीहांडा येथे मीठाचा सत्याग्रह केला. वैयक्तिक

सत्याग्रहातही हा जिल्हा पुढे होता.[१] असहकार चळवळ आणि कायदेभंग चळवळीत अकोला जिल्हयातील महिला मोठया संख्येने सहभागी झाल्या होत्या.

## ७.१ १९४२ च्या लढयाची तयारी :

वैयक्तिक सत्याग्रहानंतर अशा तऱ्हेचा निकराचा लढा द्यावा लागेल अशी जाणीव ठिकठिकाणच्या काँग्रेस कार्यकर्त्यांना होती व त्याप्रमाणे अकोला जिल्हयातील काँग्रेस कार्यकर्तेही लढ्याच्या तयारीला लागले होते. महात्मा गांधीजींनी 'यंग इंडिया' मध्ये जे लेख लिहले त्यावरुन स्वातंत्र्य प्राप्तीच्या निर्णयावर लढा होणारच याची इतरांप्रमाणे अकोला जिल्हयातील काँग्रेस कार्यकर्त्यानांही कल्पना होती. काँग्रेस कमिटयांमार्फत दिन प्रतिदिन कार्यकर्त्यांच्या सभा होवून गांधीजींच्या या विचारांची जाणीव शहर व जिल्हयातील नेते करुन देत होते. त्यासाठी कार्यकर्त्यांचे संघटन, युवक युवतींमध्ये जागृती निर्माण करणे, अभ्यास मंडळातून लढयाची जाणीव करुन देणे, प्रभात फेऱ्या व सायंफेऱ्यातून प्रचार करणे व इंग्रज राजवटीविरुध्द जनतेत जागृती करणे इ. प्रकारचे कार्य १९४० पासूनच अकोला जिल्हयात सुरु होते.[२]

विदर्भाचे व जिल्हयाचे प्रमुख नेते श्री. ब्रिजलाल बियाणी, डॉ. आबासाहेब खेडकर जी.आर. कुलकर्णी, श्रीमती दुर्गाताई जोशी, प्रमिलाताई ओक, राधाबाई ओक इ. नेत्यांचे जिल्हाभर दौरे सुरु होते. अकोला शहरातील संघटन व जागृतीचे कार्य प्रमिलाताई ओक, विनयकुमार पाराशर, गोपीलाल शर्मा, बालासा भारोटे, भगवानसा मावळे आदि तरुण व अच्युत देशपांडे आदि कार्यकर्ते ब्रिजलाल बियाणींच्या मार्गदर्शनाखाली करीत होते. महिला स्वयंसेविकांचे एक पथक प्रमिलाताई ओक यांच्या नेतृत्वाखाली तयार झाले होते. प्रभातफेऱ्या काढून व राष्ट्रीय गाणी गाऊन जनतेत जागृतीचे काम या महिला करीत असत. मुंगी परिवारातील मुली व सुद्राबाई जोशी यांच्या मुली अशा अनेक मुली आणि

सौ. विमलाबाई देशपांडे, सुशिलाबाई खत्री, प्रेमाबाई अनीस, दयाबाई दहीकर आदि महिला कार्यकर्त्या या कार्यात भाग घेत होत्या.[३]

१३ जून १९४२ ला सुभद्राबाई जोशींचे अकोल्याला सभेत भाषण झाले. जूनमध्ये ग्रामोद्योगाचे सहस्त्रबुध्दे अकोल्यात राष्ट्रीय शाखेत आले. तिथे त्यांनी घोषणा केली. आता पक्षभेद राहणार नाही. महात्माजींच्या मनात परिवर्तन झाले. चळवळीला आता मर्यादा राहणार नाही 'करा किंवा मरा' ही घोषणा शेवटची राहील. २० जुलै १९४२ ला प्रमिलाताई ओकांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत, महिलांनी येत्या आंदोलनात सक्रिय सहभाग घ्यावा, त्याचप्रमाणे महिलांनी आपल्या पती व मुलांना आंदोलनात भाग घेण्यासाठी प्रोत्साहित करावे अशा आशयाची सभा झाली. दि. २४ जुलैला ब्रिजलाल बियाणी, पी.बी. गोळे, व्ही.पी. सप्रे वकील, के.व्ही. सहस्त्रबुध्दे, दुर्गाताई जोशी, प्रमिलाताई ओक, आणि एम.बी. सोमाणी यांनी एका खाजगी सभेत कॉंग्रेस कार्यकारी मंडळाच्या ठरावावर चर्चा केली आणि 'नगर संरक्षण दल अकोला' स्थापन करण्याचे ठरविण्यात आले.[४] २ ऑगस्ट ला प्रमिलाताई ओकांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत वर्धेला काँग्रेसच्या कार्यकारिणीने घेतलेल्या निर्णयाबाबत विश्वास व्यक्त करण्यात आला. महात्मा गांधीजींच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करणे, जनतेत चळवळीकरीता प्रचार करणे आणि हिंद सेवादलाचे सदस्य होणे याबाबत ठराव पारीत करण्यात आले. ६ ऑगस्टला १५ लोकांची सभा सुभद्राबाई जोशींच्या उपस्थितीत अकोल्याला पी.वाय. ओकांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यात काँग्रेसने पारित केलेला वर्धा ठराव डोळ्यासमोर ठेवून कार्यक्रमाची आखणी केली. ८ ऑगस्ट ला ४०० लोकांची सभा आ. एम. पेंडसे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सभेत दुर्गाताई जोशी म्हणाल्या, रशियाच्या तेलाच्या खाणीत शत्रूचे प्रभुत्व स्थापन झाले आहे. ब्रिटीशांचे शेवटचे दिवस आले आहेत. त्यांच्या पापतच ते मरतील. यासाठी दुर्गाताईंनी उपस्थितांना विनंती केली की, जनतेने या परिस्थितीचा लाभ उठवावा.[५]

## ७.२ १९४२ च्या लढयास सुरवात :

८ ऑगस्टच्या मुंबई अधिवेशनावरुन विदर्भात परत येणाऱ्या नेत्यांना मलकापूरलाच अटक करण्यात आली. त्यात अकोला जिल्हयाचे व विदर्भाचे मान्यवर नेते ब्रिजलाल बियाणी, दादासाहेब गोळे, आबासाहेब खेडकर यांचा समावेश होता. मुंबईच्या अधिवेशनास प्रेक्षक म्हणून गेलेले अनेक कार्यकर्ते परत आले. प्रमिलाताई ओक, जी.आर. कुलकर्णी, माणिकलाल सोमाणी हे त्यात होते. प्रमिलाताई आणि जी.आर. कुलकर्णी पोलीसांची नजर चुकवून गावात आले व गुप्तपणे वावरु लागले.[६]

या आधीच अकोला येथे महात्मा गांधीजींच्या अटकेची बातमी कळताच मिरवणूकी काढण्यात आल्या. सरकारच्या कृतीचा निषेध व्यक्त करण्याकरीता अकोला, कारंजा, आकोट, वाशिम, यावलखेड आणि अकोली जहांगीर येथे सभा घेण्यात आल्या. दि.९ ऑगस्टला ५००० लोकांची सभा झाली. या सभेत दुर्गाताई जोशी, डी. एम. केदार, एस.डी. ठाणवी, बी.एन. उदासी, एम.बी. सोमाणी, एम.ए. वैराळे, यांची काँग्रेस नेत्यांच्या अटकेचा निषेध करणारी भाषणे झाली.

अनुसयाबाई संपतराव भोपळे, विठ्ठलराव माळी आणि काही लोकांनी स्टेशन हाऊसवर जंगल कायदा मोडण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांना अटक करण्यात आली. त्यामुळे राजस्थान भवन आणि अकोल्यांची प्रेस या काँग्रेसच्या कार्याच्या असलेल्या जागांना सरकारतर्फे मोहर लावण्यात आली. आठवडयातून दोन दिवस निघणाऱ्या 'मातृभूमी' या पत्रावर बंदी घालण्यात आली.

अकोल्याच्या अनेक कार्यकर्त्या मुंबईच्या ऐतिहासिक महत्वाच्या अधिवेशनाला उपस्थित होत्या. १० तारखेला सकाळी मुंबईहून स्थानिक पुढारी परत अकोल्याला येणार याची लोकांना कल्पना होती. त्यामुळे शेकडो लोक पहाटेपासूनच रेल्वे स्टेशनवर जमा व्हायला लागले. प्रमिलाताई ओक आल्यानंतर त्यांच्याकडून लोकांना समजले की, ब्रिजलाल बियाणी व इतर पुढारी यांना मलकापूरला अटक झालेली आहे.[७]

प्रमिलाताईंनी त्याच दिवशी डाबकी रोडवरील त्यांच्या वडीलांच्या म्हणजे बापूसाहेब फडके यांच्या मळ्यात कॉंग्रेस कार्यकर्त्यांची एक गुप्त सभा आयोजित केली. या सभेचे निमंत्रण गुप्तपणे प्रमुख्र कार्यकर्त्यांना पोहचविण्यात आले होते. महात्मा गांधीचा 'करा किंवा मरा' आणि आपले आपणच पुढारी बना' हा संदेश प्रमिलाताईंनी सभेत वाचून दाखवून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. प्रमिलाताईंनी मुंबईहून आणलेले मार्गदर्शक पत्रक छापून त्याच्या प्रती अकोला शहर व जिल्हयात गुप्तपणे वितरीत करण्यात आल्या. १९४२ चा अंतिम लढा स्वातंत्र्यासाठी होता याची कार्यकर्ते व जनता यांना कल्पना होतीच पण तो लढा कसा द्यावा याचे मार्गदर्शन जनतेला मिळाले. त्याप्रमाणे अकोला जिल्हयात सर्वत्र शासकीय यंत्रणा कोलमडून पाडण्याचे प्रयत्न सुरु झाले. गिरणी कामगार, विद्यार्थी आणि टिळक राष्ट्रीय शाळेचे विद्यार्थी व शिक्षक यांनी हे तोडफोडीचे कार्य विशेष जोराने, उत्साहाने व धडधडीने केले. व्यापाऱ्यांनीही फार मोठी साथ दिली.[८]

११ तारखेला पहाटे पोलीसांची धाड दुर्गाताई जोशींच्या घरावर पडली. त्यांना पकडण्याकरीता ७०-८० पोलीसांनी सर्व बाजूंनी आक्रमण केले आणि त्यांना अटक केली.

अकोल्यात प्रत्यक्ष आंदोलनाने जोर धरला. अकोल्याच्या सावता मिलच्या मजूरांनी सैनिकांकरिता कापड विणून देण्यास नकार दिला. कट्टर कॉंग्रेसी नेते किसनलालजी गोयनका यांनी मजूरांना सांगितले की, ३ महिने ते मिल बंद ठेवणार असतील तर त्यांना ३ महिने पगार देण्यात येईल. यावेळी प्रमिलाताई ओक आणि जे.जी. शर्मा यांना ४०० मिल मजूरांना सांगितले की, त्यांनी रेल्वे व पोस्ट ऑफिसवर आक्रमण करुन तोडफोड व जाळपोळ करावी. सरकारकडून विरोध झाल्यास बळाचा वापर करावा. ब्रिटीशांना भारत सोडायला लावण्याकरीता मरणाला तयार राहिले पाहिजे. अकोल्यात फक्त २०० पोलीस आहेत. त्यांना न घाबरता कर देणे बंद करुन, ब्रिटीशांचे राज्य मान्य न करता कॉंग्रेसच्या राज्यात राहावे, हा मार्ग सत्याग्रहाचा नसून क्रांतीचा आहे.[९]

प्रमिलाताईंच देशभक्तीपर भाषण ऐकून मिल मजुरांचा मोर्चा मोहता मिलवर गेला. ती बंद करुन तेथील मजूरांसह मोर्चा रेल्वे स्थानकावर गेला आणि तिथे रुळ उखडले, टेलिफोनचे खांब व तारा तोडल्या. शाळा, महविद्यालये, कापड गिरण्या, पेट्रोल पंप पाडण्यात आले. पहिला संप मनुताई कन्या शाळेच्या मुलींनी केला. मुलींचा जथ्था न्यू इंग्लिश शाळेतून निघाला. पुढे मॉर्डन हायस्कूलवर गेला. तिथली मुले, मुली जथ्यात सामील झाल्यावर नंतर जत्था सरकारी मुलींची शाळा, सरकारी हायस्कुलवर पोहचला. त्यावेळी पोलीस आले, त्यांनी मुलींना ठोकायला सुरवात केली. काही मुली निसटल्या. त्यांनी रस्त्यावरची दिवे फोडली. मिरवणूकींची संख्या वाढतच होती. घोषणा चालूच होत्या. अत्यंत प्रखर शब्दात सरकारवर टिकास्त्रे फोडली जात होती. जे बोलत होते त्यांना अटक होत होती. सायंकाळी पुन्हा सभा, भाषणे व अटक असे चक्र सुरु होते. केंद्रावरील सायक्लोस्टाईल यंत्रे वेगवेगळया ठिकाणी पाठविण्यात आली. पत्रके काढण्यात आली. सायंकाळी ज्याच्या त्याच्या हातात पत्रके होती.

काँग्रेसचे नेते बापू सहस्त्रबुध्दे यांनी मातृभूमी पत्राच्या संपादिका आणि आघाडीच्या काँग्रेस नेत्या प्रमिलाताई ओक यांना निरोप पाठविला की त्यांनी यावेळी लेख लिहित बसू नये. चंडीकेचे स्मरण करुन रणांगणात उतरावे आणि सत्याग्रहाची कमान चढती ठेवावी.[१०]

### ७.३ १३ ऑगस्टला ज्वाला भडकली :-

१३ ऑगस्टला राजस्थान प्रेसच्या समोर कॉटन मार्केटमधून बापू सहस्त्रबुध्दे यांनी झेंडा मिरवणूक काढली. बापूंनी काँग्रेस मैदानाचे कुलूप तोडून हातातील ध्वज स्तंभावर फडकवला. बापू त्यावेळी काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांना लगेच पोलीसांनी अटक केली. बापूंनी केदारांना झेंडा सांभाळायला सांगितला. केदारांचे बलदंड शरीर पाहून त्यांच्या वाटेला कुणी गेले नाही. याचवेळी प्रमिलाताई ओक १५ हजार जमावाचे नेतृत्व करीत कॉटन मार्केट मधून काँग्रेस मैदानाकडे निघाल्या होत्या. निघण्यापूर्वी त्यांनी कॉटन

मार्केटमध्ये दिलेल्या आवेशपूर्ण भाषणांनी जमावामध्ये उत्साह संचारला होता. प्रमिलाताई यावेळी म्हणाल्या, "मी जाहीर करते आहे की, हा सत्याग्रह नाही, हे बंड आहे, ही क्रांती आहे आणि हा लढा जे लढणार नाहीत, जे नपुसंक आहेत, जे आपल्या आईच्या दुधासी बेईमान असतील, त्यांनी आताच घरात जाऊन दडून बसावे, कारण मी आता माघार घेणार नाही. माझ्या बरोबरीच्या माझ्या भगिनी माघार घेणार नाहीत. जे भेकड असतील त्यांना या मिरवणूकीत स्थान नाही, असा कोणी या ठिकाणी आहे? मला जवाब द्या" तेव्हा जमावाने एकासुरात 'करेंगे या मरेंगे' अशी घोषणा दिली.

प्रमिलाताईंच्या भाषणाने जमावाच्या अंगात विजेचा संचार झाला होता. बेफाम झालेल्या १५ हजार नागरिकांचा मोर्चा इतका मोठा होता की, इतकी मोठी मिरवणूक शहरात कधी निघाली नव्हती. त्या मिरवणूकीचे नेतृत्व एक बाई करीत होती. त्यांच्याबरोबर सुशीलाबाई खत्री, विमलाबाई देशपांडे, दयाबाई दहीकर, राधाबाई भाटीया, प्रेमा अनिष आणि सुभद्राबाई गावंडे या महिला होत्या. त्यांच्यामागे ५०-६० महिला आणि त्यांच्या मागे १५ हजारांचा जमाव होता.[११]

मिरवणूक निघताच पोलीस सतर्क झाले होते. ब्रिटीश विरोधी घोषणा देत मिरवणूक मैदानाकडे जात होती. पोलीसांच्या तुकडया मिरवणूकीच्या मागे मागेच होत्या. त्याचबरोबर बाजूनेही कडे करुन हत्यारबंद पोलीस चालत होते. जनतेचा प्रचंड उत्साह व निर्भयता पाहून पोलीस दलही स्तंभित झाले होते.[१२]

यावेळपर्यंत संध्याकाळचे ५ वाजले होते. घामामुळे आणि श्रमामुळे प्रमिलाताईंच्या कपाळावरचे कुंकू कपाळभर पसरले होते. अंबाडा सुटून केस मोकळे सुटलेले होते. जणू काही चंडिकाच त्यांच्या अंगात संचारल्याचा भास होत होता. प्रमिलाताई बरोबरीच्या महिलाही जोशात नारे लावीत होत्या. 'अंग्रेजो चले जाव' 'भारत माता की जय', महात्मा गांधी की जय अशी नारे जोरात लावीत होते.[१३]

## ७.४ पोलीस व महिलांमध्ये रणधुमाळी :-

मिरवणूक काँग्रेस मैदानावर आली तेव्हा गोरा सार्जन्ट चर्च समोरच्या रस्त्यावर मध्यभागी उर्मटासारखा उभा होता. केदार ध्वज घेवून पूर्वस्थितीत काँग्रेस मैदानात उभेच होते, तर गोऱ्या सार्जन्टच्या मागे त्याची सुरक्षा करण्यास पोलीस भिंतीसारखे उभे होते. ब्रिटीश अधिकाऱ्याला पाहताच मिरवणूकीतील लोक जास्तच खवळले व त्यांनी 'अंग्रोजो भाग जाव' च्या घोषणा दिल्या; पण गोरा सार्जंट १५ हजाराच्या जमावाला घाबरला नाही. तो जागेवरच प्रमिलाताई, मिरवणुकीला हात उंच करुन थांबवतील या आशेने उभा होता. परंतू प्रमिलाताईंनी आपले बाहू उंच करुन घोषणा दिली की, 'आगे बढो' त्याचवेळी त्यांच्या बरोबरच्या तरुण स्त्रियांनी 'इन्कलाब जिंदाबाद' म्हणताच इतरांनी जिंदाबाद म्हणून साथ दिली. तोपर्यंत प्रमिलाताई व सहकारी ५ स्त्रियांनी धडक देताच सार्जन्ट २-३ पावले मागे ढकलला गेला. गोरा सार्जन्टच्या मागोमाग शिस्तीत इतरही मागे असलेली पोलीस तीन-चार पावले मागे सरकली.

मिरवणुकीतील जमाव मैदानावरुन पुढे सरकताच पोलीस त्यांच्या घेरावात येवू लागले. पुन्हा धडक बसताच गोऱ्या सार्जंटला राग आला त्याने हात समोर करुन स्त्रियांना मागे ढकलले. पुन्हा एकदा स्त्रियांनी धडक देताच त्याने बेत प्रमिलाताईंना मारला. त्यामुळे प्रमिलाताईंना राग येवून त्यांनी गोऱ्या सार्जन्टच्या थोबाडीत मारली असता सार्जंट तीन चार बेत प्रमिलाताईंवर मारले. स्त्रियांशी पोलीसांची धक्का बुक्की सुरु होताच काँग्रेस मैदानावर जनतेने धाव घेतली त्यात गणपतराव औशालकर, मोहनलाल प्रेमराज, मधू वैराळे, श्रीराम शर्मा, शांताराम जैन, श्रीधरराव देशमुख, आदी कार्यकर्ते आणि राष्ट्रीय शाळेचे विद्यार्थी आघाडीवर होते.[१४]

याचवेळी मुनी गुरुजींचे लक्ष प्रमिलाताईवर जाताच ते लगेच समोर आले व गोऱ्या सार्जंटला पकडून खाली पाडले. लोक त्याला ठोसे देत होते. हे पाहून पोलीस इन्स्पेक्टरने धावत जावून प्रमिलाताईंना आधी बाजूला केले व त्यांना पोलीस गाडीत बसविले. इतर

स्त्रियांनाही बाजुला केले. पोलीसांनी लोकांवर लाठीचार्ज केला. सात आठ पोलीसांनी मुनी गुरुजींना चांगलेच बदडले. यावेळी बघ्यांच्या गर्दीत केदार गुरुजींची म्हातारी आई होती. इतर बायका पोलीसांनी लाठी चार्ज केल्यावर मागे सरकल्या पण म्हातारीच्या पाठीत पोलीसाने जोरात लाठी मारली, तशी ती दुकानासमोर पडली. पोलीसाने तिच्या बरगडीत बुटाची लाथ मारली. भाटे ग्राऊंडवर जमाव पांगत सुटला अन पोलीस लाठया मारत निघाले. त्यावेळी केदार गुरुजी पूर्वीसारखे झेंडा घेवून उभे होते. त्यांच्यापासून २०० मीटरवर त्याच्या म्हाताऱ्या आईला रांगडा पोलीस बुटांनी लाथाडत होता व ती निपचीत पडली होती. हे पाहून एका दाढीवाल्या माणसाने रस्त्यावर पडलेल्या मोठा दगड पोलीसावर भिरकावला. तेव्हा पळणाऱ्या जमावाला सुचले की, रस्त्यावर गिट्टीचे ढीग पडले आहेत. तेव्हा हजारो हातांनी पोलीसांवर दगडाचा मारा सुरु केला. त्यामुळे पोलीस मागे सरकले. जमिनीवर पडलेल्या सार्जंटला कसेबसे त्यांनी उचलून क्लबमध्ये नेले. मागे सरकत असलेल्या पोलीसांना दुसऱ्या सार्जंटने समोर जाण्याचे आदेश दिले. पोलीसांनी जोरदार लाठीमार केला. पोलीस आणि जनता यांच्यात लाठी- दगडांचा मारा सुरु असतांना केदारांनी जोरात 'झेंडा उचा रहे हमारा' गीत म्हटले. पोलीस केदार गुरुंजीकडे पाहत राहीले. दुसरीकडे पोलीसांकडून जनतेवर लाठीचार्ज सुरु होता.

पोलीसांच्या जबरदस्त लाठीमाऱ्यामुळे अनेक लोक जखमी झाले होते. त्यांना दत्तू गर्गे, अंबादास खोब्रागडे व इतरांनी शेजारीच राहणाऱ्या मश्रुवाल यांच्या स्वामीनारायण धर्मभवनामध्ये उपचार करण्यासाठी नेले होते. जवळच डॉ. एल.टी. शहा यांचा दवाखाना होता. यावेळी नानाभाई इच्छाराम यांच्या पत्नी विजयालक्ष्मी मश्रुवाल यांनी एकटीने स्वामीनारायण धर्मभुवनाची दार सताड उघडली. एकटीने घरातल्या खाटा आत नेल्या. घरातील सर्व मंडळी आजारी असतांना त्यांच्याकडे दुर्लक्ष करुन त्यांनी डॉ. शहा यांच्या मदतीने जखमींची सेवाशुश्रूषा केली. डॉ. शहा यांनी अत्यंत तत्परतेने व परिश्रमपूर्वक जखमींवर उपचार केले. मुनी गुरुजींवर उपचार केले गेले. यावेळी जखमींच्या जखमा धुणे,

पट्टया बांधणे, त्यांना धीर देणे, दूध-कॉफी देणे, त्यांच्या नातेवाईकांना कळविणे, शेकण्याकरीता गरम पाणी देणे ही कामे सौ. विजयालक्ष्मी मश्रुवाला यांनी केले. जखमींची सतत सुश्रुषा केल्यानंतरही त्यांच्या चेहऱ्यावरील प्रसन्न भाव आणि आवाजातला प्रेमळ गोडवा कायम होता.[१५]

मैदानावरची रणधुमाळी रात्री ८.३० वाजता थंड पडली, दुपारी १२ पासून लोक सतत मैदानावर उभे होते. मार खात होते, घोषणा देत होते. धर्मराज केदार मात्र रात्री ८.३० पर्यंत झेंडा घेवून मैदानावरच उभे होते. याच दरम्यान बॅरिस्टर आबासाहेब फडके व प्रमिलाताईचे पती काकासाहेब ओक हे तिथे आले. त्यावेळी काकासाहेबांच्या म्हणण्यानुसार केदारांनी झेंडा त्यांना दिला आणि स्वत:चा आईच्या सुश्रूषेसाठी निघून गेले. बापू सहस्त्रबुध्दयांनी सोपविलेली कामगिरी, केदारांनी चोखरित्या पूर्ण केली. १३ ऑगस्टला पोलीसांनी केलेल्या लाठी हल्ल्यात १०० च्या वर लोक जखमी झाले होते. ५०-६० लोकांवर अजूनही धर्म भुवनात उपचार चालू होता; तर बाकीचे मलमपट्टी करुन घरी निघून गेले होते.[१६]

## ७.५ प्रमिलाताई आणि इतर महिलांना अटक :-

१३ ऑगस्टला अकोला शहरात बापू सहस्त्रबुध्दे, मातृभूमीच्या संपादिका प्रमिलाताई ओक, राधाबाई ओक, दयाबाई दहीकर, सुशिलादेवी खत्री, विमलाबाई देशपांडे, राधाबाई भाटिया, बद्रिनाथ हिरालाल यांना अटक करण्यात आली तर रात्री १० वाजता सरदार निरातसिंग, प्रेमजी व चुन्निलाल यांना अटक करण्यात आली. दुसऱ्या दिवशी सौ. विमलाबाई देशपांडे यांची तीन वर्षाची मुलगी बिजलीला तुरुंगात पाठविण्यात आले. श्रीमती प्रेमाबाई अनीश आणि सौ. अनुसयाबाई भोपळे यांना पण अटक झाली. अनुसयाबाई बरोबर त्यांचा दोन वर्षाचा मुलगा विजय यालाही तुरुंगवास भोगावा लागला.[१७]

## ७.६ ऑगस्ट नंतरचे आंदोलन :-

१३ ऑगस्टच्या या घटनेने शहरात व जिल्हयात वातावरण प्रक्षुब्ध झाले. उघडरित्या झेंडयांची मिरवणूक काढून अटक करवून घेण्याचे कार्यक्रम अकोला शहरात व जिल्हयातील गावोगावी सुरु होतेच. प्रमुख कार्यकर्ते भूमीगत झाले होते. या भूमीगत कार्यकर्त्यांनी तारा तोडणे, रेल्वे रुळ उखडणे, गाडया पाडण्याचा प्रयत्न करणे, सरकारी कार्यालये जाळणे व उध्वस्त करणे ही कामे सुरु केली. बॉम्ब बनविण्याचा कारखानाही सुरु केला.[१८]

१८ नोव्हेंबर १९४२ ला सावताराम मिलच्या मालकाची पत्नी राधादेवी गोयनका, ब्रिजलाल बियाणींची पत्नी सावित्रीबाई बियाणी, सावताराम मिलमधील एक महिला आणि एक अन्य महिला अशा चौघींना सभा घेण्याचा प्रयत्न करणे आणि नारे लावणे या कारणानिमित्य अटक करण्यात आली. तरीही जिल्हयात भूमिगत लढा सुरुच राहिला.[१९]

## ७.७ १९४२ च्या लढयात सहभागी अकोल्यातील पराक्रमी महिला :-

१९४२ च्या चलेजाव आंदोलनात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून अकोला जिल्हयातील महिला लढल्या. यात दुर्गाताई जोशी, ताराबेन मश्रुवाल, श्री. राधादेवी गोयनका, प्रमिलाताई ओक, प्रेमाबाई अनीश, सुभद्राबाई जोशी, सुशीला खत्री, विमलाबाई देशपांडे, जाम्बुवंती मुंगी (मालीनीबाई शेट्टे), रुक्मिणीदेवी गोयनका यांचा प्रामुख्याने समावेश होता. इतरही अनेक महिलांनी या लढयात अप्रत्यक्षपणे सहभाग घेतला.

विदर्भाच्याच नव्हे तर भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनात दुर्गाताईचे योगदान महत्वपूर्ण होते. वऱ्हाडची वाघीन हे नामाभिधन त्यांना अकोला वासियांनी दिले. १९२७ ते १९४२ पर्यंत दुर्गाताईंची प्रचारकार्याच्या निमित्ताने विदर्भात वेगवेगळया ठिकाणी व्याख्याने होत. व्याख्यानातून आणि आपल्या मातृभूमीमधील लिखाणांमधून त्यांनी ब्रिटीशांविरुध्द लोकजागृती केली. १९४२ च्या आंदोलनासमयी दुर्गाताईंना काही काळ स्थानबध्द ठेवण्यात आले होते. अकोला येथील नानाभाई मश्रुवाल यांचे घर कॉंग्रेसच्या लढयात संचालनाचे

प्रमुख केंद्र होते. या परिवाराचे स्वातंत्र्यलढयातील योगदान उल्लेखनिय होते. कायदेभंग चळवळीत नानाभाईंची मुलगी ताराबेन मश्रुवाल यांनी महत्वपूर्ण कार्य केले. त्यावेळी त्यांना ६ महिन्यांचा कारावास भोगावा लागला. १९४२ च्या आंदोलनासमयी पोलीसांनी गुप्त पत्रके शोधण्याच्या निमित्ताने मश्रुवाल यांच्या घरी अनेक वेळा धाडी घातल्या परंतू त्यांच्या घरी काहीही सापडले नाही. परंतू गुप्त पत्रके निघणे सुरुच होते. शेवटी पोलीसांनी मश्रुवालांच्या घरी काम करणाऱ्या मगन नावाच्या मुलाला पोलीस स्टेशनमध्ये नेऊन चांगलेच बदडले. याची माहिती ताराबेनला मिळताच त्यांनी सरळ पोलीस स्टेशनला जाऊन इन्स्पेक्टरला चांगलेच खडसावले. तेव्हा पोलीसांनी त्यांची माफी मागून मगनला सोडून दिले. परंतू लवकरच ताराबेनला अटक केली आणि सहा महिन्यांनी शिक्षा दिली.[२०] तुरुंगात असतांना ताराबेन मश्रुवाल यांनी कैदी भगिनींना शासनाकडून मिळत असलेल्या वाईट वागणुकी विरुध्द चळवळ केली.[२१]

राधादेवी गोयनका या अकोल्यातील काँग्रेसचे प्रमुख कार्येकर्ते आणि आर्थिक दृष्टया काँग्रेसला जोरदार पाठबळ देणारे व्यक्तीमत्व किसनलालजी गोयनका यांच्या पत्नी. किसनलालजी स्वातंत्र्य संग्रामात १९३० पासून आघाडीवर होते. त्यांना राधादेवीचा पूर्ण पाठींबा होता. १९४२ च्या स्वातंत्र्यलढयासाठी स्त्रियांना संघटित करुन राधादेवींनी या लढ्यामागे स्त्रीशक्ती उभी केली तर किसनलालजींनी ही चळवळ तीव्र करण्यासाठी तनमनधनाने सहाय्य केले. २४ डिसेंबर १९४२ रोजी स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होऊन राधादेवींनी अल्पसा तुरुंगवासही भोगला.

काँग्रेसच्या धडाडीच्या कार्यकर्त्या प्रमिलाताई ओक अकोल्याच्या दैनिक मातृभूमीच्या संपादिका होत्या. १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामात त्यांनी महत्वाची कामगिरी केली. लढावू वृत्तीने वैयक्तिक सत्याग्रह आणि चले जाव चळवळीत भाग घेतला. १३ ऑगस्ट १९४२ ला अकोल्यातून निघालेल्या सर्वात मोठया लढाऊ मिरवणुकीचे त्यांनी नेतृत्व

केले. शेवटी त्यांना अटक होवून ४ महिन्यांची सक्तमजूरीची शिक्षा झाली. १ वर्षाची स्थानबध्दताही लावण्यात आली.[२२]

हिदीचे प्रकांड पंडीत खुबीलाल पंडीत यांच्या पत्नी प्रेमाबाई अनीश यांनीही १९४२ च्या लढयात हिरीरीने भाग घेतला. प्रेमाबाईच्या कार्याला पतीचा पूर्ण पाठिंबा होता. वैयक्तिक सत्याग्रहात त्यांनी भाग घेतला होता. १९४२ च्या लढयात भाग घेतल्यामुळे त्यांना ६ महिन्यांचा कारावास घडला. सुभद्राबाई जोशी यांनीही १९४२ च्या महिला आंदोलनात महिलांचे नेतृत्व करुन कॉँग्रेसच्या कार्यक्रम राबविला. त्यामुळे त्यांना नागपूरच्या तुरुंगात दीड महिना स्थान बध्दतेत ठेवण्यात आले. दयाबाई दहिकर (सुमन घाटोळे) यांनीही १९४२ च्या लढ्यात महत्वाचे योगदान दिले. १९४२ च्या चळवळीत प्रमिलाबाई ओकांबरोबर ज्या चार महिला आघाडीवर होत्या. त्यात दयाबाई दहीकर या पण होत्या. झेंडा वंदनाकरीता कांताबेन वर्मा बरोबर त्या गेल्या असतांना त्यांना अटक करण्यात आली आणि ३ महिन्यांची शिक्षा झाली. १९४२ मधील पहिली शिक्षा संपल्यावर त्यांनी आपले राष्ट्रीय कार्य पुन्हा सुरु केले. अकोल्यात कॉँग्रेसची पत्रके छापल्यानंतर मश्रुवालांच्या घरी येत असत त्यांनी १५० पत्रके वाटण्याकरीता घेतली होती. शेवटचे पत्रक वाटून झाले आणि त्यांना पुन्हा पकडण्यात आले. त्यावेळी दुसऱ्यांदा त्यांना नागपूर तुरुंगात ठेवण्यात आले. यावेळी त्यांना ६ महिन्यांची सक्त मजूरीची शिक्षा झाली. १९४२ मध्ये त्यांचे वय केवळ २२ वर्षाचे होते.[२३]

कमलाबाई सोहनी या महिलेने दै. मातृभूमी अकोला आणि दै. तरुण भारत व गावकरीमधून 'चले जाव' चळवळीच्या वेळी सरकारविरुध्द लिखाण करुन लोकांमध्ये चेतना निर्माण केली. स्वातंत्र्याच्या लढाईत धडाडीने कार्य करणारे विठ्ठलचंद खत्री यांच्या पत्नी सुशीला खत्री यांनी पतीबरोबर स्वातंत्र्य लढयात सतत भाग घेतला. १९४२ च्या क्रांती लढयातही सुशीलाबाई सहभागी झाल्या. प्रमिलाताईंच्या नेतृत्वात निघालेल्या प्रचंड मोर्चात त्या सामील झाल्या होत्या. त्यामुळे त्यांना अटक करुन ६ महिन्यांची शिक्षा देण्यात आली. तुरुंगातून सुटल्यानंतरही स्वातंत्र्य मिळेपर्यंत त्यांचे कार्य सुरु होते. विमलाताई देशपांडे याही

प्रमिलाताईंच्या नेतृत्वाखाली निघालेल्या प्रचंड मोर्चात सहभागी झाल्या होत्या. पोलीसांच्या लाठीमाराचा तडाका त्यांना बसला. १३ ऑगस्टला मोर्चानंतर विमलाबाई भूमीगत झाल्या. भूमीगत कार्य करतांना त्यांना २६ ऑगस्टला अटक झाली. त्यांची तीन वर्षाची मुलगी सरोज उर्फ विजू ही आईबरोबर तुरुंगात होती. चार महिन्यांची सक्त मजूरीची शिक्षा विमलाताईंनी भोगली.[२४]

अकोला शहरातील शिवाजी वेशीजवळील दत्तोपंत मुंगी यांचे पूर्ण कुटूंबच राष्ट्रप्रेमी वृत्तीचे असल्यामुळे १९३५ पासून राजकारणात भाग घेत होते. दत्तोपंताच्या दोन मुली जाम्बुवंती आणि लीला या दोन बहीर्णींनी स्वातंत्र्य लढयात उत्साहाने भाग घेतला. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनासमयी गुप्त रितीने पत्रके वाटणे व गुप्तरितीने प्रचार करणे आदी कार्य केली. त्यांचे बंधू विनायक दत्तात्रय मुंगी यांना त्यांच्या बहिणीकडून प्रेरणा मिळाली. १९४२ च्या आंदोलनात तारा तोडणे, घातापाताच्या कामाला मदत करणे, फेऱ्या काढणे, निरोधने करणे, विदेशी मालाची होळी, इत्यादी कामे आपल्या शक्तीनुसार केली. १९४२ मध्ये मुंगीच्या घरी कॉंग्रेसची पत्रके छापली जात असत. छापण्याकरीता लागणारी माहिति ब्रिजलाल बियाणीकडून त्या मिळवित. ही कामे करतांना पोलीसांनी त्यांना पकडले. मात्र वयाने लहान असल्यामुळे तंबी देऊन सोडून दिले.

अकोला जिल्हयातील कॉंग्रेसचे पुढारी व स्वातंत्र्य सेनानी श्रीरामजी गोयनका यांच्या पत्नी रुक्मिणीदेवी यांनी १९४२ च्या लढयात सक्रिय सहभाग घेतला. प्रभात फेऱ्या काढणे, महिलांचे संघटन करणे ही कामे केली. १९४२ च्या लढ्यात बेकायदा ठरविलेल्या मैदानात जाऊन झेंडा लावण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्यांना ६ महिन्यांची सक्त मजूरीची शिक्षा झाली.[२५] एकूणच १९४२ च्या चलेजाव चळवळीत अकोला जिल्हयातील महिलांचे योगदान फार मोठे आहे.

**संदर्भ :-**

१. राजू खरडे, १९४२ च्या चलेजाव चळवळीत नाग-विदर्भाचे योगदान, अप्रकाशित शोधप्रबंध, पृ.१५५, १५६.

२. अच्युतराव देशपांडे, अकोला जिल्हयातील स्वातंत्र्यलढा, ऑ.क्रा. सु. महोत्सव समिती मुंबई, १९९२, पृ. ४४.

३. कित्ता पृ. ४५.

४. दमयंती पाठक, वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्यसंग्रामातील सहकार्य, मंगेश प्रकाशन नागपूर, २००३, पृ.१८४.

५. कित्ता पृ. १८५.

६. अच्युतराव देशपांडे, उपरोक्त पृ. ४६.

७. दमयंती पाठक, उपरोक्त पृ.१८६.

८. अच्युतराव देशपांडे, उपरोक्त पृ. ४७.

९. दमयंती पाठक, उपरोक्त पृ.१८७.

१०. कित्ता पृ. १८८.

११. के. य. ओक, स्मृतींच्या मशाली पृ. १०० ते १०२.

१२. अच्युतराव देशपांडे, उपरोक्त पृ. ५३.

१३. दमयंती पाठक, उपरोक्त पृ.१८९.

१४. राजू खरडे, उपरोक्त पृ. १६८.

१५. दमयंती पाठक, उपरोक्त पृ.१९०, १९१.

१६. के. य. ओक, उपरोक्त पृ. १०५ ते १०७.

१७. अच्युतराव देशपांडे, उपरोक्त पृ. ५४.

१८. कित्ता पृ. ५५.

१९. दमयंती पाठक, उपरोक्त पृ. १९२.

२०. राजू खरडे, उपरोक्त पृ. २३९.

२१. दमयंती पाठक, वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्यसंग्रामातील सहकार्य, मंगेश प्रकाशन नागपूर, २००३, पृ.२३९.

२२. कित्ता पृ. २४०, २४१.

२३. कित्ता पृ. २४२, २४४.

२४. कित्ता पृ. २५१.

२५. कित्ता पृ. २५२.

## प्रकरण - आठवे

# यवतमाळ जिल्हयातील स्त्रियांचे योगदान

यवतमाळ हा १८७५ साली जिल्हा म्हणून जाहीर झाला. त्यापूर्वी हे जिल्हयाचे ठिकाण असले तरी यवतमाळ शहर हेच जिल्हयातील मुख्य ठिकाण होते. १८७५ ते १८९० या काळात यवतमाळ शहराची लोकसंख्या फक्त २००० इतकी होती. यवतमाळला डिस्ट्रीक्ट कलेक्टर, तहसिलदार, जिल्हा वन अधिकारी, जिल्हा न्यायधीश राहण्यास सुरवात झाल्यामुळे श्री. देव, श्री मंडले वकील येऊन राहू लागले व मवाळांचा एक गट निर्माण झाला. १८८५ साली अखिल भारतीय पातळीवर काँग्रेसचा जन्म झाला. यवतमाळला काँग्रेसची शाखा जरी निर्माण झाली नाही तरी अर्ज विनंत्या करुन मिळेल त्या सुधारणा इंग्रजाकडून पदरात पाडून घ्याव्यात हे जे काँग्रेसचे धोरण होते त्याच धोरणाचा अवलंब यवतमाळ शहरातील मवाळ गट करु लागला. यवतमाळ मध्ये कचेऱ्या व शिक्षण संस्था यामुळे जसा वकील, डॉक्टर व सरकारी नोकरांचा एक वर्ग निर्माण झाला. तसाच कापसाच्या व्यापारामुळे व जिनिंग प्रेसिंग उद्योगामुळे राजस्थानी, गुजराथी, पारशी व्यापाऱ्यांचा एक वर्ग उदयाला आला. या सर्वांनी मिळून गावात काहीतरी सांस्कृतिक कार्यक्रम असावेत व सांस्कृतिक जीवन असावे असे वाटून सामाजिक व सांस्कृतिक संस्था काढल्या. यवतमाळात मवाळांचे अधिपत्य होते. त्यांच्या प्रयत्नांमधून सन १८९८ मध्ये सोशल क्लब व ज्युबिली लायब्ररी या संस्था निघाल्या.[१]

लोकमान्य टिळकांच्या उदयानंतर राष्ट्रीय राजकारणाचे पडसाद स्थानिक राजकारणात उमटले. लोकमान्य टिळकांनी राजकीय क्षेत्रात ज्या तंत्राचा उपयोग करावयाचे ठरविले त्याच तंत्राचा अवलंब करावयाचा असे ठरविणारा जहाल गट यवतमाळात उदयास आला. या गटात सर्वप्रथम तपस्वी बाबासाहेब परांजपे, शामराव दादा देशपांडे, पृथ्वीगीर हरिगीर गोसावी, दत्तोपंत काणे, गणपतराव मालवी, दादासाहेब कोठेकर, गोपाळराव टोंगो,

मारोतराव जामनकर, कृष्णाजी पेशवे ही मंडळी एकत्र आली. त्यांना असे वाटू लागले की, टिळकांच्या चतु:सूत्रीचा वापर यवतमाळ जिल्हयात स्वातंत्र्य चळवळ पसरविण्याकरीता करावा. वृत्तपत्रे, राष्ट्रीय शाळा काढणे, स्वदेशी व बहिष्काराचा प्रचार करणे या तंत्राचा वापर करण्याचे त्यांनी ठरविले. तपस्वी बाबासाहेब परांजपे, दत्तोपंत काणे, शामरावदादा देशपांडे यांच्या प्रोत्साहनामुळे पृथ्वीगीर हरिगीर गोसावी उर्फ पापासाहेबांनी केसरी या पुण्याच्या वृत्तपत्राच्या पावलावर पाऊल टाकून 'हरिकिशोर' या नावाचे वृत्तपत्र १९०५ मध्ये काढले. याचवर्षी यवतमाळात टिळकांच्या आगमनामुळे चैतन्य निर्माण झाले आणि येथील लोक राष्ट्रीय चळवळीत सक्रिय भाग घेवू लागले श्री कळमकरांनी स्वदेशीचे दुकान काढले. 'जिल्हा सभा' स्थापन करुन त्याद्वारे खेडोपाडी स्वदेशी व बहिष्काराचा प्रचार केला. १९०५ मध्ये 'विद्यागृह' नावाची राष्ट्रीय शिक्षण देणारी शाळा काढली. स्वातंत्र्य चळवळीकरीता जागृती निर्माण करणे, समाजाचे प्रश्न सोडविने या हेतूने विद्यागृहाची स्थापना करण्यात आली.[२] १९८० पासून सरकारची दडपशाही वाढली. त्यामुळे सन १९०८ ते १९१५ हा काळ यवतमाळ जिल्हयातील स्वातंत्र्य चळवळीतील कॉंग्रेस कार्यकर्त्यांना एखाद्या 'अंधारयुगा' सारखा गेला. सरकारने 'विद्यागृह' शाळा बंद केली. पृथ्वीगीर गोसावी यांच्यावर देशद्रोहाचा खटला चालवून दोन वर्ष सक्त मजूरीची शिक्षा दिली. याचकाळात यांनी 'डिस्ट्रीक्ट असोसिएशन' ही संस्था काढली.[३]

'डिस्ट्रीक्ट असोशिएशन' ही संस्था स्वातंत्र्य चळवळ पसरविण्याचे एक अद्वितीय तंत्र होते. तिच्या कार्याच्या माध्यमातून सुविधा, सवलतींची मागणी खेडातल्या लोकांना करायला लावायची व सरकारने त्या सोयी, सवलती दिल्या नाहीत की इंग्रज सरकारला भारतीय जनतेच्या कल्याणात रुची नाही म्हणायचे बिगार बलुते आदींना अन्यायाचा प्रतिकार करायला शिकवावयाचे व कायद्याचा प्रतिकार करण्याची क्षमता वाढवायची. स्वातंत्र्य चळवळीचा एक भाग 'डिस्ट्रीक्ट असोशिएशन' बनली. टिळकांच्या मृत्यूनंतर असहकारितेच्या युगाला सुरवात झाली. यवतमाळच्या राजकारणावर लोक नायक बापूजी

अणेंचा प्रभाव वाढू लागला. कायदेभंग चळवळीच्या काळात विदर्भात समुद्र नसल्याने १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहाने खेडयात तेवढे आकर्षण वाटेना तेव्हा डिस्ट्रीक्ट असोशिएशनने 'जंगल सत्याग्रहाचे' तंत्र विकसित केले. जंगल सत्याग्रहाचे अती दुर्गम खेडयात स्वातंत्र्य चळवळ पोहोचविली व हा जिल्हा भारतभर प्रसिध्द झाला. 'बिगार बलुता' चळवळीमुळे सुध्दा हा जिल्हा देशभर प्रसिध्द झाला. या चळवळीने अन्यायाचा प्रतिकार करणे लोकांना शिकविले. लोकनायक बापूजी अणे यांनी टिळकांच्या तंत्रात आणि महात्मा गांधीजीच्या सत्याग्रह व बहिष्कार या तंत्रात समन्वय घडवून आणला. स्वातंत्र्य चळवळीने टिळक युगात टिळक युगातील तंत्राचा व गांधी युगात गांधी युगातील तंत्राचा वापर केला. इतकेच नव्हे तर सुरवातीला फार सौम्य वाटणाऱ्या १९२० च्या चळवळीने १९४२ मध्ये बरेच रौद्र रुप धारण केले.[४]

इ.स. १९३७ ते १९४० या काळात पंडीत जवाहरलाल नेहरु, पट्टाभी सीतारामय्या, मौलाना आझाद, सरदार पटेल या राष्ट्रीय नेत्यांना यवतमाळात पाचारण करुन त्यांच्याद्वारे राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळ अधिक तीव्र करण्यात आली. दुसरे महायुध्द सुरु झाल्यानंतर महात्मा गांधीजींच्या आवाहनानुसार साम्राज्यवादाच्या विरोधात वैयक्तिक सत्याग्रहाला सुरवात झाली. यवतमाळ येथे १६ फेब्रुवारी १९४१ रोजी वैयक्तिक सत्याग्रहाला सुरवात झाली. यावेळी आनंदराव देशपांडे, बाबासाहेब घारफळकर यांनी अभूतपूर्व जागृतीचे काम केले. या सत्याग्रहात जवाहरलाल दर्डा यांनी भाग घेतला. यवतमाळ जिल्हा कॉंग्रेस कमेटीने महत्वपूर्ण कामगिरी केली.[५]

### ८.१ चलेजाव चळवळीस सुरवात :-

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या मुंबई येथील अधिवेशनात 'चलेजाव' ची घोषणा होताच ९ ऑगस्ट १९४२ ला रात्रीच यवतमाळ जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे लोक अनौपचारिकरित्या आपण यवतमाळला काय करावे याचा विचार करु लागले. महात्मा गांधीना अटक झाली

ही बातमी यवतमाळला आली, त्याचबरोबर लोकात संतापाची लाट निर्माण झाली. यवतमाळ शहर काँग्रेसचे अध्यक्ष ताराचंद सुराणा व सचिव आनंदराव देशपांडे यांनी त्वरीत यवतमाळ शहर काँग्रेसची तातडीची बैठक बोलविली.[६] विदर्भातल्या इतर जिल्हयात ज्याप्रमाणे मुंबईहून 'चलेजाव' चळवळ कशी चालवायची याचे निर्देश येऊन पोहोचलेत तसे यवतमाळ जिल्हयात निर्देश वेळेवर पोहोचले नाहीत त्यामुळे नेत्यांत आणि कार्यकर्त्यांत एक प्रकारचा वैचारिक गोंधळ निर्माण झाला आणि त्यामुळे तरुण रक्त आणि वयोवृध्द नेते यांच्यात संघर्ष निर्माण झाला. जिल्हा काँग्रेसच्या बैठकीत नेमके काय करावे याबाबत निर्णय होऊ शकला नाही. परंतू जमलेल्या सर्व सदस्यांनी सर्व राष्ट्रीय पुढाऱ्यांना अटक केल्याबद्दल ब्रिटीश सरकारचा निषेध करणारा ठराव आणि त्याप्रमाणे ब्रिटीशांच्या उच्चाटनाचा ठराव बैठकीत पास केला.[७]

### ८.२ आझाद मैदानावरची सभा :-

जिल्हा काँग्रेसमधील तरुण मंडळींनी काँग्रेस श्रेष्ठीकडून येणाऱ्या आदेशाची वाट न पाहता १० ऑगस्ट रोजी गांधी चौकातून निषेधाची मिरवणूक काढून आझाद मैदानात सभा घ्यायची असा निर्णय घेतला. पोलीसांना याची खबर लागताच तरुणांची धरपकड सुरु झाली. त्यामुळे आयोजक तरुण भूमिगत झाले. पोलीसांचा बंदोबस्त असतांनाही ऐनवेळी गांधी चौकात तरुण कार्यकर्ते प्रगट झाले. पाहता पाहता गर्दी जमून गर्दीचे रुपांतर मिरवणूकीत झाले. पोलीसांनी कार्यकर्त्यांना अटक केली. १० जणांवर खटले भरुन तुरुंगात टाकले. यावेळी काही कार्यकर्ते भूमीगत झाले त्यांनी चळवळ पुढे चालविली.[८]

### ८.३ मेघराज छल्लानी यांचा गांधी चौकात सत्याग्रह :-

१२ ऑगस्ट १९४२ रोजी गांधी चौकात मेघराज छल्लानी यांनी ४ वाजता सत्याग्रह केला. पोलीसांनी त्यांना पकडले. त्यामुळे लोकांचा संताप अनावर झाला. जमावाने पोलीसांवर दगडफेक सुरु केली. सरकारी मालमत्तेची तोडफोड सुरु केली. पोलीसांनी

लाठीमार केला. एकूण ३०० लोकांना तुरुंगात टाकले. १३ ऑगस्टला वजरे टेलर यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह करण्यात आला. त्यांनाही पोलीसांनी अटक केली. तेथे उपस्थित चंपालाल बोरुदिया यांनाही अटक केली, त्यांना मारहाण केली त्यामुळे यवतमाळात तणाव वाढला.[९]

## ८.४ ग्रामीण भागातील चळवळ :-

यवतमाळ शहराप्रमाणेच जिल्हयातील वणी, पुसद, दिग्रस, दारव्हा, पांढरकवडा, घाटंजी व बाभुळगांव लोणी या भागात निषेध सभा आणि मोर्च निघाले. ठरल्याप्रमाणे सर्वच ठिकाणी पोलीसांनी दडपशाही करीत अटक सत्र सुरु केले. अनेक कार्यकर्त्यांना अटक करुन तुरुंगात टाकण्यात आले.

## ८.५ स्त्रियांचा सहभाग :-

यवतमाळ जिल्हयात राष्ट्रीय जागृती निर्माण करण्याच्या कार्यात जीजी देशपांडे आणि आनंदीबाई दामले आघाडीवर होत्या. यवतमाळ जिल्हयाचे काँग्रेसच्या युध्दमंडळाचे अध्यक्ष ॲड. दिनकरराव दामले यांच्या आनंदीबाई पत्नी होत्या. काँग्रेसच्या बैठकींना उपस्थित राहणे, व्याख्याने देणे, शिबीरे घेणे, सत्याग्रहात सहभागी होणे, स्वातंत्र्यलढयाशी संबंधीत अशी अनेक कामे आनंदीबाईंनी केली. कायदेभंग चळवळीत आनंदीबाई सक्रिय होत्या. जिल्हयातील रंगुबाई मिडवाईक, रंगूबाई रामाजी या स्त्रियांनी जंगल सत्याग्रहात आणि भगवती मथुराप्रसाद परदेशी व मंजुषा बापूशा मुलमान यांनी कायदेभंग चळवळीत भाग घेतल्यामुळे ६ महिन्यांची सक्तमजूरीची शिक्षा त्यांना भोगावी लागली.[१०]

स्वातंत्र्य लढयात जिल्हयातील महिलांचा सहभाग इतर जिल्हयांच्या तुलनेत अल्पसा का होईना पण होता. १९४२ च्या चलेजाव चळवळीत जिल्हयातील महिला प्रत्यक्षात मोठया प्रमाणात सहभागी नसल्या तरी, या चळवळीत सहभागी पुरुषांना स्त्रियांनी अप्रत्यक्षरित्या

भरपूर मदत केली. पुरुष मंडळी आंदोलनसमयी घराबाहेर आणि तुरुंगात असतांना धैर्याने सर्व परिस्थितीचा सामना स्त्रियांनी केला हे कार्यही फार मोठे असेच होते.

प्रत्यक्ष चलेजाव चळवळ सुरु व्हायच्या काही दिवस आधी १९ जून १९४२ रोजी कळंब येथे ३५० लोकांची सभा यशवंतराव पालेकरांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेत वर्धा येथील शांताबाई सुर्यभानजी माळी आणि हरीभाऊ मुळे यांनी सभेला संबोधित केले. "ग्रामोद्योगाचे नूतनीकरण' आणि 'ब्रिटीशांनी भारत सोडावा', याविषयी बोलतांना आपसात मतभेद असले तरी खादी वापरण्यावर भर द्यावा असे जोर देवून सांगितले. सध्याच्या शिक्षणपध्दतीमुळे लोक मानसिकदृष्टया कमजोर झाले असून युध्दनिधीला मदत करणे पाप आहे असे सांगून महात्मा गांधीची आज्ञा पाळवी" असे त्या सभेत बोलल्या.

चलेजाव चळवळ यवतमाळात जोरात सुरु झाल्यानंतर सरकारी दडपशाहीसुध्दा जोरात सुरु होती. त्याची पर्वा न करता २६ ऑगस्ट रोजी काशीबाई कुणबीन या ५५ वर्षाच्या पराक्रमी महिलेने नगरभवनाकडे २५ मुलांसह मोर्चा नेला. १०० लोकांच्या उपस्थितीत त्यांनी ब्रिटीशांना भारतातून हाकलून लावले पाहिजे या शब्दात त्या गरजल्या. "सरकारी नोकरांनी आपल्या जागांचे राजीनामे द्यायला पाहिजेत आणि विद्यार्थ्यांनी शाळा आणि महाविद्यालये सोडायला पाहिजेत" असेही त्या म्हणाल्या, परंतू पोलीसांनी काशीबाईंवर कोणतीही कारवाई केली नाही.[११]

चले जाव चळवळीत यवतमाळ जिल्हयातील स्त्रियांनी भाग घेवून संपूर्ण स्त्री वर्गाचे प्रतिनिधीत्व केले.

**संदर्भ :-**


१. वसंत उर्फ बाळासाहेब पेशवे, सौ. मंदाकिनी पेशवे, यवतमाळ जिल्हयातील स्वातंत्र्य लढा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई १९९२, पृ.९.

२. कित्ता पृ.१४.

३. कित्ता पृ.२३.

४. कित्ता पृ.६.

५. राजू खरडे, १९४२ च्या चलेजाव चळवळीत नाग-विदर्भाचे योगदान, अप्रकाशित शोधप्रबंध, पृ.२८८-२८९.

६. वसंत उर्फ बाळासाहेब पेशवे, उपरोक्त पृ. ८१.

७. शरद कोलारकर, आधुनिक विदर्भाचा इतिहास, मंगेश प्रकाशन, नागपूर २००३ पृ. २९३.

८. कित्ता पृ.२९४.

९. कित्ता पृ.२९५.

१०. दमयंती पाठक, वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्यसंग्रामातील सहकार्य, मंगेश प्रकाशन नागपूर, २००३, पृ.२६४.

११. कित्ता पृ.२१०,२११.

## प्रकरण - नववे

# बुलढाणा जिल्हयातील स्त्रियांचे योगदान

बुलढाणा जिल्हा अमरावती विभागाच्या चार जिल्हयांपैकी पश्चिमेकडील सर्वात शेवटचा जिल्हा आहे. या जिल्हयातील लोणार हे खाऱ्या पाण्याच्या नैसर्गिक सरोवरासाठी प्रसिध्द आहे. छत्रपती शिवरायांना जन्म देणाऱ्या राजमाता जिजाबाई यांचे माहेर याच जिल्हयाच्या दक्षिणेला असलेले सिंदखेडराजा हे आहे. या गावचे लखुजी जाधव यांची ही जहागीर आहे. ऐतिहासिकदृष्टया बुलढाणा जिल्हयातील अमडापूर, देऊळघाट, जामोद, जानेफळ, मलकापूर, मेहकर, साखरखेर्डा, रोहणखेडा, शहापूर ही गावे उल्लेखनिय आहेत. शेगावचे श्री गजानन महाराजांचे मंदिर, श्रीक्षेत्र नागझरी येथील गोमाजी महाराजांचे मंदिर, सैलानी येथील दर्गा आणि इतर काही इतिहासकालीन मंदिर आजही या जिल्हयात सुस्थितीत आहेत. चक्रधर स्वामींचा संचार या जिल्हयात झाला. सुप्रसिध्द साहित्यीक श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे वास्तव्य जळगांव जामोद कानडे यांचे वास्तव्य जळगांव जामोद येथे काही वर्ष होते. कॉंग्रेसचे जुने प्रसिध्द कार्यकर्ते पं.दिनकर शास्त्री कानडे यांचे वास्तव्य याच जिल्हयात होते. वऱ्हाडचा इतिहास लिहणारे या मा. काळे व संत चोखामेळा यांचा जन्म याच जिल्हयात मेहुण या गावी झाला. स्त्रियांमध्ये जागृती निर्माण करणाऱ्या व स्त्रीमुक्ती चळवळीची बीजे पेरणाऱ्या ताराबाई शिंदे यासुध्दा बुलडाण्याच्याच होत्या.[१]

इ.स.१८०३ च्या देवगावच्या तहाने वऱ्हाडातील चार जिल्हे बुलडाण्यासह निजामाला मिळाले. १९०३ मध्ये बुलडाणा जिल्हा ब्रिटीश सरकारने आपल्याकडे घेतला आणि १९०५ मध्ये या जिल्हयाची पुर्नरचना केली. मेहकर, चिखली, मलकापूर हे तालुके या जिल्हयात जोडण्यात आले. प्रशासकीय कारभाराचे केंद्र बुलडाणा येथे स्थलांतर करण्यात आले. पुढे हा जिल्हा मध्यप्रांतास जोडण्यात आला. १९५६ पर्यंत बुलडाणा जिल्हा मध्यप्रांत वऱ्हाडचा भाग होता.[२]

लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधीजींच्या काळात हा जिल्हा राजकीयदृष्टया जागृत होता. मेहकरचे दादासाहेब ढोमणे, खामगावचे डॉ. पारसनीस, बुलडाण्याचे या. मा. काळे, श्री. कानेरकर मलकापूरचे श्री पिंपळकर या प्रमुख लोकांनी लोकमान्य टिळकांपासून प्रेरणा घेवून या जिल्हयात जागृती केली. १९०८ मध्ये लोकमान्य टिळकांचा प्रथम दौरा विदर्भात झाला. त्याचा परिणाम या जिल्हयावर झाला. स्वराज्य प्राप्तीसाठी नवे नेतृत्व या जिल्हयात निर्माण झाले. अकोला आणि बुलडाणा हे जिल्हे एकमेकांना लागून असल्यामुळे राजकीय चळवळींच्या दृष्टीने परस्परांशी निगडीत होते. गांधीजींच्या नेतृत्वाखालील १९२०, १९३०, १९३२ या काळात झालेल्या सर्व चळवळीत बुलडाणा जिल्हयाने प्रामुख्याने भाग घेतला.[३]

## ९.१ १९४२ च्या चलेजाव चळवळीला सुरवात :-

८ ऑगस्ट रोजीच्या रात्रीला 'इंग्रजांनी चालते व्हा, भारतीयांनी स्वातंत्र्यासाठी जे जे शक्य असेल ते करा व प्रयत्नात मरण आले तर मरा' असा संदेश गांधीजींनी दिल्यानंतर कॉंग्रेसचे प्रांतीक नेते गांधीजींचा संदेश घेऊन आपल्या गावी परतत असतांना त्यांना वाटेतच अटक करण्यात आली. अटकेचे हे सत्र प्रांतिक व तालुका स्तरापर्यंत चालविण्यात आले होते. मध्यप्रांत वऱ्हाडातील मुंबईहून परत येणाऱ्या अनेक नेत्यांना बुलडाणा जिल्हयातील मलकापूर येथेच अटक करण्यात आली.

इतर प्रांतातील नेत्यांप्रमाणे बुलडाणा जिल्हयातील नेतेही मुंबईचे अधिवेशन आटोपून आपापल्या गावी येण्यास परतले. काहींना भुसावळ येथेच अटक करण्यात आली. तर काहींना विदर्भ प्रांताचे प्रवेशद्वार व मुंबई प्रांताची सीमा असलेले बुलडाणा जिल्हयातील मलकापूर येथे अटक करण्यात आली.[४]

बुलढाणा जिल्हयातील, मुंबईचा संदेश घेऊन जाणारे सर्वस्वी पुरुषोत्तम मोतीलाल झुंझुनवाला, डॉ. पुरुषोत्तम गोविंद एकबोटे, माणिकचंद दिपचंद बनवर, चंपतलाल

गणपतसा मेवाडे, दादासाहेब उर्फ व्यंकटेश केशव सोमण, मोतीलाल बख्तावरमल, गोपाल प्रसाद शंकरलाल दुबे या सर्व कार्यकर्त्यांना मलकापूर येथे १ ऑगस्ट १९४२ रोजी अटक करण्यात आली.[५]

याशिवाय काँग्रेसचे नेते पुरुषोत्तम झुनझुनवाला यांना त्यांच्या घरी जावून अटक करण्यात आली. कार्यकर्त्यांच्या अटकेमुळे बुलडाणा जिल्हयात सर्वत्र संतप्त वातावरण निर्माण झाले. सर्वत्र १९४२ च्या ज्वाला भडकल्या. सरकारी कचेऱ्या ताब्यात घेणे, दळणवळणाची साधने नष्ट करणे, पोस्ट, तार, कचेऱ्या, रेल्वे आदीचे सर्व व्यवहार तोडफोड करुन बंद पाडणे, शाळा कॉलेज बंद पाडणे वगैरे कार्यक्रम जनतेने सुरु केले. तालुक्यांच्या ठिकाणी आणि ग्रामीण भागातही चळवळीने जोर धरला. राष्ट्रीय झेडयांची मिरवणूक काढून 'इंग्रजांनो चालते व्हा' या घोषणा प्रत्येक तालुक्याच्या शहरातून व मोठमोठया गावातून दिल्या जात होत्या. या घोषणामुळे जिल्हयातून शंभरावर कार्यकर्त्यांना अटक झाली व त्यांना निरनिराळया तुरुंगात डांबण्यात आले. खामगावाची राष्ट्रीय शाळा चळवळीच्या केंद्रस्थानी होते.[६]

## ९.२ महिलांचा सहभाग :-

गांधी युगात झालेल्या स्वातंत्र्य चळवळीत बुलडाणा जिल्हयातील महिला आघाडीवर होत्या. कायदेभंग चळवळीच्या काळात दारुच्या दुकानांवर पिकेटिंग करण्याचे कार्य या महिलांनी स्वीकारले होते. खामगावच्या श्रीमती जिजीबाई देशपांडे, रुक्मिणीबाई कोर्डे, पार्वतीबाई पत्की या महिला दारुच्या व परदेशी कापडाच्या दुकानावर पिकेटींगमध्ये आघाडीवर होत्या.[७] येथील कासीबाई हरीभाऊ कांबळे, देऊळगाव राजा येथील सौ. शांताबाई मेवाडे, खामगांव येथील सीताबाई झुनझुनवाला, इंदिराबाई एकबोटे, सुगंधाबाई पवार, रमाबाई गवाणे, जयमाला शहा, इंदिराबाई भडंग, इंदिराबाई पारसनीस,

रुक्मिणीबाई कोरडे या महिला १९४२ च्या चलेजाव चळवळीत सक्रिय होत्या. या प्रमुख महिलांशिवाय इतर अनेक महिलांनी अप्रत्यक्षरित्या या लढयात सहभाग घेतला.[८]

## ९.३ सौ. शांताबाई चंपालालजी मेवाडे यांचे कार्य :-

तत्कालीन चिखली तालुक्यातील देऊळगाव राजा हे स्वातंत्र्य लढयाच्या काळातील एक प्रमुख केंद्र होते. दि. १ ऑगस्ट १९४२ रोजी देऊळगाव राजा येथील प्रसिध्द कार्यकर्ते चंपालालजी मेवाडे यांना अटक झाल्यानंतर त्यांच्या प्रचाराचे काम त्यांच्या पत्नी सौ. शांताबाई चंपालाल मेवाडे यांनी केले. त्यांनी १९४२ च्या चळवळीत सक्रिय भाग घेतला. प्रभातफेऱ्या काढून त्याद्वारे त्यांनी प्रचाराचे कार्य केले. ठिकठिकाणी सभा घेऊन ब्रिटीशांविरुध्द जागृती केली. त्यामुळे सरकारने त्यांना अटक केली. अडीच महीने कैदेत ठेवल्यानंतर सहा महिने सक्त मजूरीची शिक्षा दिली.[९]

सौ. शांताबाईंनी आपल्या पतीच्या अटकेनंतर महात्मा गांधीच्या रचनात्मक कार्याचा प्रचार करीत स्वातंत्र्याच्या चळवळीचा डोलारा पुढे नेण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी १९४२ च्या चळवळीत सक्रिय राहून महत्वपूर्ण कार्य केले.[१०]

## ९.४ सीताबाई झुनझुनवाला यांचे कार्य :-

सीताबाई झुनझुनवाला यांनी १९४२ च्या चलेजाव चळवळीत महत्वाचे योगदान दिले सीताबाई या महात्मा गांधीचे मानसपुत्र जमनालालजी बजाज यांची पुतणी होय. जमनालालजींचे भाऊ गंगाकिसनजी आणि लक्ष्मीबाई बजाजांच्या या कन्या होत्या. जन्मापासूनच त्यांना राष्ट्रीय कार्याचे बाळकडू मिळाले होते. बालपण वर्धेला गेल्यामुळे राष्ट्रीय वृत्तीला खतपाणी मिळाले. १९३२ च्या कायदेभंग चळवळीत त्यांनी सहभाग घेतला. लहान असल्यामुळे त्यावेळी त्यांना अटक झाली नाही. सीताबाईंचा विवाह खामगांव येथील पुरुषोत्तमजी झुनझुनवाला यांच्याशी झाला. पुरुषोत्तमजी बुलडाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे प्रमुख होते. त्यामुळे राष्ट्रीय विचारांच्या सीताबाईंना सासरी सुध्दा स्वातंत्र्य संग्रामात भाग

घेण्यास प्रोत्साहनच दिले. १९४२ च्या चलेजाव चळवळीच्या वेळी सीताबाईंनी अनेक भूमीगतांना मदत केली. आपल्या समाजातील महिलांना चळवळीत सहभागी होण्यास प्रोत्साहन दिले. सीताबाईंच्या कार्यामुळे त्यांना सरकारने अटक केली. सीताबाईंना सहा महिन्यांचा कारावास भोगावा लागला त्यावेळी त्यांचा मुलगा ८ महिन्यांचा होता.[११]

## ९.५ सौ. कौसल्याबाई काशीनाथ आवटे यांचे कार्य :-

खामगांव येथील स्त्री कार्यकर्त्या सौ. कौसल्या काशीनाथ आवटे यांनी १९४२ च्या चलेजाव चळवळी दरम्यान विध्वसंक कृत्यांना मदत केली व त्यांचा प्रचार केल्याच्या आरोपावरुन त्यांना चार महिने स्थानबध्द केले होते.[१२]

१९४२ च्या चलेजाव चळवळीत बुलडाणा जिल्हा विदर्भातील इतर जिल्हयांप्रमाणेच सक्रिय होता. पुरुषांसोबत या जिल्हयातील कमी प्रमाणात का होईना महिलाही सक्रिय होत्या. या लढयात प्रत्यक्ष भाग घेवून महत्वाचे योगदान देणाऱ्या महिलांसोबतच अनेक महिलांनी भूमिगत राहून लढयाला हातभार लावला. अनेक महिलांनी आपल्या घरातील पुरुषांना लढ्यात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले. घरातील पुरुष मंडळी लढ्यात उतरल्यानंतर आणि तुरुंगात गेल्यानंतर घराची सर्व जबाबदारी आनंदाने स्वीकारली. अशा अनेक महिलांचे योगदान महत्वाचे आहे. त्यांचे कार्य इतिहासाला अज्ञात आहे.

**संदर्भ :-**

१. शरद कोलारकर, आधुनिक विदर्भाचा इतिहास, मंगेश प्रकाशन नागपूर, २००९, पृ. २५८.

२. राजू खरडे, १९४२ च्या चले जाव चळवळीत नाग-विदर्भाचे योगदान, अप्रकाशित शोधप्रबंध पृ. २७७-२७८.

३. शरद कोलारकर, उपरोक्त पृ. २६०.

4. Report of 1st and 2nd half of Aug. 1942 F.N. 18/08/42 Poll(I), National Archieves, New Delhi.

5. Police Jail, Court Record, Superintendent of Buldhana District Jail Class-2, Buldhana.

६. शरद कोलारकर, उपरोक्त पृ. २६०, २६१.

७. कित्ता पृ. २६४.

८. कित्ता पृ. २७०.

९. भ.ग. कुंटे, स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश, महाराष्ट्र राज्य, विदर्भ विभाग खंड-२, मुंबई, १९७६ पृ. १४६.

१०. नामदेव ढाले, स्वातंत्र्यचळवळीत बुलडाणा जिल्हयाचे योगदान, नभ प्रकाशन अमरावती, २०१३, पृ. ३४१.

११. दयमंती पाठक, वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्यसंग्रामातील सहकार्य, मंगेश प्रकाशन नागपूर, २००३, पृ. २६७, २६८.

१२. न.र. फाटक, स्वातंत्र्यसैनिक चरित्रकोश, महाराष्ट्र राज्य विदर्भ विभाग, खंड-१, मुंबई १९७१, पृ.१७.

## प्रकरण - दहावे

# उपसंहार

भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्य संग्रामाचे लक्षणीय वैशिष्टय म्हणजे भारतीय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील उत्स्फुर्त व उत्साहपूर्ण सहभाग होय. शेकडो वर्ष घराच्या चौकटीत अडकून पडलेल्या भारतीय महिलांनी परंपरागत चौकट ओलांडली आणि पुरुषांच्या खांद्याला खांद्या लावून किंबहूना काही ठिकाणी पुरुषांपेक्षाही पुढे जावून ब्रिटीशांविरुध्द लढा दिला. सुशिक्षित, अशिक्षित, गर्भश्रीमंत-दरित्री, भिन्न धर्माच्या, भिन्न जातीच्या, भिन्न संस्काराचा प्रभाव असलेल्या लक्षावधी भारतीय महिला धैर्याने स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झाल्या. साऱ्या जगाच्या इतिहासात अपवादानेच आढणारे हे वास्तव आहे.

भारतीय स्वातंत्र्य लढयातील महिलांच्या सहभागाला वैशिष्टयपूर्ण स्थान आहे. कारण महिलांनी कोणत्याही गोष्टीचा विचार न करता केवळ देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून स्वातंत्र्याच्या पेटत्या यज्ञकुंडात उडी घेतली. अत्यंत धीटाने जुलमी ब्रिटीश सत्तेचा सामना करुन त्यांना हादरवून सोडले.

इंग्रजी सत्तेच्या स्थापनेबरोबर भारतात केवळ राजकीयच नव्हे तर सामाजिक परिवर्तनाचे युग सुरु झाले. भारतात धार्मिक व सामाजिक प्रबोधनाचे वैचारिक क्रांतीचे युग सुरु झाले. भारतीय महिलांच्या अगतिक, दयनीय परिस्थितीकडे आद्य सुधारकांचे लक्ष गेले. महिलांना शिक्षण दिल्यास त्यांच्या उन्नतीचा मार्ग खुला होईल या धारणेतून स्त्री शिक्षणाचा श्रीगणेशा झाला. शिक्षणाबरोबर महिलांमध्ये नवे विचार रुजू लागले, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होऊ लागला. सामाजिक जाण निर्माण होऊ लागली आणि घराच्या चार भिंतीच्या बाहेर पाऊल ठेवण्याचे मनोधैर्य त्यांच्यात निर्माण झाले. महिलांमध्ये राजकीय जाणीव निर्माण होण्याची ही पूर्व तयारी होती. या दरम्यान भारतात राष्ट्रवादाचा उदय झाला. भारतीयांना पाश्चात्य राज्यकर्त्यांकडून न्याय, अधिकार मिळावेत या हेतूने राष्ट्रीय

सभा स्थापन झाली. प्रारंभी मवाळ असणारी राष्ट्रीय सभा लोकमान्य टिळक व त्यांच्या जहाल सहकाऱ्यांच्या प्रेरणेने जहाल राष्ट्रवादी बनू लागली. या प्रक्रियेला महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाने प्रचंड गती दिली. भारतीय स्त्री मुक्तपणे व उत्साहाने राजकीय क्षेत्रात वावरु लागली. स्वातंत्र्यलढयात सहभागी होवू लागली. राष्ट्रीय कार्यासाठी शारीरिक हालअपेष्टा सोसू लागली. स्वातंत्र्य संग्रामातील हे महत्वाचे व मोलाचे पर्व ठरले.

भारतीय स्वातंत्र्यलढयात भारतातील निरनिराळया भागातील महिलांप्रमाणेच विदर्भातील सर्व भागातील महिला जुलमी सत्तेविरुध्द आघाडीवर होत्या. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून विदर्भात सामाजिक प्रबोधनाला सुरवात झाली. पाश्चात्य शिक्षणाची  शिक्षणाची सुरवात होऊन मुलींसाठी शाळा स्थापन झाल्या. पश्चिम महाराष्ट्रात सुरु झालेल्या वैचारिक प्रबोधनाचे वारे विदर्भात सुशिक्षित व सुबध्द वर्गात मूळ धरु लागले. एकोणविसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात महिलांच्या उन्नतीचे कार्य करण्यासाठी हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या का होईना, पण महिला पुढे सरसावल्या. या सामाजिक प्रबोधनातून वैदर्भीय महिलात राजकीय जाणीवेचा उदय होऊ लागला. या शतकाच्या अखेरीस राष्ट्रवादी विचारांचा स्त्रोत काही वैदर्भीय महिलांना राष्ट्रीय कार्यात सहभागी होण्यास प्रवृत्त करु लागला.

लोकमान्य टिळकांच्या विदर्भातील दौऱ्यांपासून विदर्भात त्यांच्या जहाल राष्ट्रीय विचाराला लोकांचा पाठिंबा मिळत गेला. विदर्भातील टिळकांचे अनुनायी त्यांच्या विचारांचा जोरात प्रचार करु लागले. टिळकांच्या अनुयायांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या कुटुंबीयांवरही पडू लागला. परिणामी लक्ष्मीबाई खापर्डे, उमाबाई परांजपे या स्त्रियाही कार्यप्रवृत्त बनल्या. मोरोपंत जोशी यांच्या धर्मपत्नी यशोदाबाई या आपल्या पतीप्रमाणे मवाळ गटाच्या प्रतिनिधी बनल्या.

गांधी युगात विदर्भातील महिलांचा आंदोलनातील सहभाग वाढला. सविनय कायदेभंगाच्या चळवळीच्या काळात सत्याग्रही महिलांची संख्या लक्षणीयरित्या वाढली.

ग्रामीण भागातील शेकडो महिला शहरी महिलांच्या बरोबरीने सत्याग्रहात सहभागी झाल्या. या काळात अनेक महिलांना तुरुंगात डांबण्यात आले. या काळात विदर्भातील अनेक महिलांची धडाडी व नेतृत्वगुण दिसून आले. कायदेभंग चळवळीच्या काळात पुरुषांना महिलांच्या कर्तृत्वाचा, धडाडीचा, त्यागप्रवृत्तीचा प्रत्यय आला. भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील निर्वाणीच्या लढयात विदर्भातील महिला उत्साहाने सहभागी झाल्या. १९४२ चा 'भारत छोडो' हा लढा भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासातील अतिशय व्यापक स्वरुपाचा शेवटचा लढा होता. या लढयात गांधीजींनी दिलेल्या 'करा किंवा मरा' या मंत्राने प्रेरित होवून असंख्य पुरुषाप्रमाणेच महिलाही या लढयात उतरल्या. या लढयातील महिलांची कामगिरी स्वातंत्र्यप्राप्तीच्या दृष्टीने मोलाची ठरली.

या लढयात सहभागी झालेल्या महिलांनी तुरुंगाची पर्वा न करता धडाडीने कार्य करीत राहिल्या. काही स्त्रियांनी पिछाडीची कामे करुन चळवळीला मदत केली. भूमिगतांना अनेक ठिकाणी स्त्रियांनी केलेली मदत स्वातंत्र्य प्राप्तीच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरली. ब्रिटीशांच्या दडपशाहीला न जुमानता विदर्भातील सर्वच जिल्हयातील सर्व स्तरातील असंख्य स्त्रियांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या या चळवळीत भाग घेवून स्वातंत्र्याचा मार्ग खुला केला.

नागपूर जिल्हयातील विद्यावती देवडिया, सुभगाबाई काशीकर, अनुसयाबाई काळे, द्वारकाताई देऊस्कर, सरलाताई शेर्लेकर, निर्मलाताई साळवे (श्रीवास्तव), अनुसयाबाई जोशी, कुसुम शर्मा, कुलसुंबी महंमद याकूबभाई, कमलाताई होस्पेट, प्रमिलाताई दाणी, शांताबाई हरकरे, राधाबाई अहेर, गंगुबाई बुधे, शांताबाई माडखोलकर, क्रांतीदेवी साळूबाई घोडमारे, इंदूमती देशमुख, उमाबाई फडणवीस, गंगाबाई तिडके, लक्ष्मीबाई गुप्ता, या सर्व पराक्रमी महिलांनी या अंतिम निर्वाणीच्या लढयात आपापल्या परीने महत्वाची कामगिरी केली. काहींनी प्रत्यक्ष आंदोलनात उडी घेवून तुरुंगवास पत्करला तर काहींनी भूमिगतांना योग्य ती मदत करुन देशभक्तीचा परिचय दिला. अनुसयाबाई काळे यांनी चिमूर-आष्टी-

प्रकरणातील फाशी झालेल्या २४ वीरांची फाशीची शिक्षा रद्द करावी यासाठी अथक परिश्रम घेतले आणि सर्वांची फाशीची शिक्षा रद्द करविली. विद्यावती देवडिया आणि सुभगाबाई काशीकर यांचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे.

भारताच्या स्वातंत्र्यलढयाच्या इतिहासात वर्धा जिल्हयाचे स्थान अतिशय महत्वपूर्ण होते. वर्धा शहर स्वातंत्र्यलढयाचे केंद्रस्थान बनलेले होते. महिलाश्रम सारख्या संस्थांची स्थापना वर्धा जिल्हयात झाली असल्यामुळे महिला वर्गात राजकीय जागृती अन्य जिल्हयाच्या तुलनेने अधिक झाली होती. परिणामी १९४२ च्या आंदोलनात वर्धा जिल्हयातील स्त्रियांचा मोठा सहभाग होता. महिलाश्रमातील मुलींनी १९४२ च्या चळवळीचे प्रचारकार्य अत्यंत जोमाने केले. महिलाश्रमातील अनेक महिलांचे स्वातंत्र्यलढयातील कार्य गौरवास्पद आहे. मालिनीताई थत्ते, शरयूताई धोत्रे, मालीनीताई दास्ताने, कमलाताई लेले, शांताबाई मानक, सुंदराबाई चक्रे, उषा देशपांडे, वेणूताई चौधरी, यमुनाताई पाटील, मीरा शहा, रमाबेन रुईया या सर्व वीर महिलांनी जुलमी सत्तेशी धीटपणे लढा दिला. चळवळीचा प्रचार केला. याशिवाय अंजनाताई सोमाजी नंदरधने, जानकीदेवी बजाज, सावित्रीदेवी बजाज यांनीही महत्त्वाचे कार्य केले. आष्टी येथील नागपूरे कुटूंबातील महिला, विठाबाई शिंदे, कासाबाई शिंदे, अहिल्याबाई नागपूरे या सर्व महिलांनी आंदोलनादरम्यान चंडिकेचे रुप धारण करुन ब्रिटीशांना हादरवून सोडले. खडकीच्या महिलांनी गोळीबाराला न जुमानता दिलेला लढा अभूतपूर्व असाच होता. वर्धा जिल्हयातील महिलांनी या लढयात दिलेले योगदान संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेणारे होते.

चंद्रपूर जिल्हयातील चिमूरचा स्वातंत्र्यलढा देशभर गाजला. चिमूर येथील आंदोलनानंतर जुलमी सरकारने तेथील महिलांवर केलेले अत्याचार ब्रिटीशांचे खरे राक्षसी रुप दर्शविणारे होते. दडपशाहीच्या काळात चिमूर येथील महिलांना खूप हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. दादीबाई बेगडे यांनी यावेळी दाखविलेल्या पराक्रमाला तोड नाही. जीवाची पर्वा न करता दादीबाईंनी कलेक्टरला सैनिकांचे महिलांवरील अत्याचाराबाबत

सुनाविले. दडपशाहीच्या काळात त्यांनी अनेक स्त्रियांना आश्रय देवून त्यांची होणारी विटंबना थांबविली. दादीबाईंचे आणि त्यांच्या सहकारी स्त्रियांचे कार्य अतिशय मोलाचे आहे. चिमूर येथील महिलांवरील अत्याचाराचे खरे स्वरुप लोकांसमोर आणण्याचे महत्वपूर्ण कार्य नागपूरच्या डॉ. दुर्गाताई वझलवार आणि त्यांच्या सहकारी महिलांनी केले.

भंडारा जिल्हयातील कृष्णाताई वैद्य, सुमित्राबाई ठाकूर, वेणूताई पाठक, प्रभावतीबाई जकातदार, कौसल्याबाई गौर या महिलांनी आंदोलनादरम्यान सरकार विरुध्द महत्वपूर्ण लढा दिला. कौसल्याबाई गौर ६ महिन्यांच्या कारावासात असतांना त्यांचा १० वर्षाचा मुलगाही त्यांच्यासोबत होता.

पूर्व विदर्भातील महिलांप्रमाणेच पश्चिम विदर्भातील महिलाही १९४२ च्या लढयात पुरुषांसोबत आघाडीवर होत्या. अकोला येथील महिलांचे कार्य तर अजोड आहे. यशोदाबाई जोशी, लक्ष्मीबाई खापर्डे, दुर्गाताई जोशी, पार्वतीबाई पटवर्धन, यांच्या पुढाकारामुळे या भागातील महिलांमध्ये चांगलीच जागृती झालेली होती. त्यामुळे निर्वाणीच्या या अंतिम लढ्यात अमरावती व अकोला येथील महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन मोलची कामगिरी केली.

अमरावती येथे या आंदोलनादरम्यान शहीद झालेली कृष्णाबाई किसन रंगारी ही तरुण महिला संपूर्ण विदर्भात एकमेव शहीद महिला म्हणून अजरामर झाली. भारतमातेला स्वतंत्र करण्याकरीता आत्माहूती देणारी कृष्णाबाई धन्य झाली. कांताबेन वर्मा, सुंदराबाई पटेरिया या अमरावतीच्या महिलांनी समाज काय म्हणेल याची पर्वा न करता देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलेले कार्य दृढ देशभक्तीचा परिचय देणारे आहे.

अकोला हे स्वातंत्र्य चळवळीचे विदर्भातील महत्त्वाचे केंद्रस्थान होते. १९४२ च्या लढयाचे वेळी अकोला जिल्हयातील महिला निर्भयतेने पुढे आल्या. दुर्गाताई जोशी, प्रमिलाताई ओक, सुभद्राताई जोशी या प्रमुख महिलांनी आंदोलनाची पूर्व तयारी केली. त्या संदर्भात लोकांपर्यंत माहिती पोहोचविली. १३ ऑगस्टला प्रमिलाताई ओक यांच्या

नेतृत्वाखाली निघालेला मोर्चा अभूतपूर्व असाच होता. स्त्रीशक्तीचे खरे रुप प्रमिलाताईंमध्ये संचारले होते. प्रमिलाताई ओक यांच्यासह सुशीलाबाई खत्री, विमलाबाई देशपांडे, दयाबाई दहिकर, राधाबाई भाटिया, प्रेमा अनिश, सुभद्राबाई गावंडे या महिलाही जोशात आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. या महिलांनी दाखविलेले धैर्य आणि केलेला पराक्रम याला तोड नाही. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे हेच त्यांचे एकमेव ध्येय होते. अकोला येथील ताराबेन मश्रुवाल, राधादेवी गोयनका, रुक्मिणीदेवी गोयनका, विजयालक्ष्मी मश्रुवाल, जाम्बुवंती मुंगी या सर्व देशभक्त महिलांनी या लढयात दिलेल्या योगदानाला तोड नाही.

यवतमाळ आणि बुलडाणा या जिल्हयातील महिलांही कमी संख्येने का होईना पण या लढयात सहभागी होत्या. यवतमाळ येथील काशीबाई कुणबीन यांनी अत्यंत पराक्रमाने पुढे येऊन लोकांना ब्रिटीशांविरुध्द जागृत केले. बुलडाणा जिल्हयातील महिला गांधी युगातील सर्वच आंदोलनात आघाडीवर होत्या. शांताबाई मेवाडे, सीताबाई झुनझुनवाला, कौसल्या काशीनाथ आवटे, कासीबाई काढोळे या महिलांनी १९४२ च्या चलेजाव चळवळीत सहभागी होऊन आंदोलनाचा प्रचार केला. सीताबाई झुनझुनवाला आणि शांताबाई मोवाडे, कौसल्याबाई आवटे यांना तुरुंगवास भोगावा लागला.

एकूणच विदर्भातील महिलांनी १९४२ च्या चले जाव चळवळीत सहभागी होऊन अत्यंत महत्वाचे योगदान दिले. देशभक्तीचा ध्यास घेऊन देशाला स्वातंत्र मिळवून देण्यासाठी या महिलांनी कुटूंबाचा, मुलाबाळांचा विचार न करता जुलमी सत्तेविरुध्द लढा दिला. दडपशाहीची पर्वा न करता महिला या आंदोलनात पुढे होत्या. तुरुंगवासाची शिक्षा आनंदाने भोगल्या. प्रत्यक्षात लढयात सहभाग न घेतलेल्या अनेक स्त्रियांनी पिछाडीवर राहून जमेल ते काम केले. भूमिगतांना आवश्यक ती मदत केली, प्रोत्साहन दिले. पुरुष आंदोलनात व कैदेत असतांना कुटूंबाची जबाबदारी योग्यपणे सांभाळली अशा असंख्य महिलांचे कार्य सुध्दा विशेष महत्वाचे होते. अशा असंख्य महिलांच्या कार्याची नोंद

इतिहासात सापडत नाही. ही फार मोठी खंत आहे. इतिहासाला अज्ञात असलेल्या अनेक महिलांची कामगिरी दुर्लक्षित करता येत नाही. त्यांचा शोध घेऊन त्यांचे कार्य प्रकाशात आणणे हे भावी संशोधकासमोरील महत्त्वाचे काम आहे. प्रस्तुत संशोधन हे त्या दृष्टीने दिशा दाखविणारे आहे.

# संदर्भ सूची (Bibliography)

## A) मुळ साधने (Original Sources)


- **English :**

1. Khare N.B., My Political Memories 1959.
2. Kunte B.G., Correspondence and Diary of G.S. Khaparde, Vol. VIII, Government of Maharashtra 1978.
3. Kunte B.K. Congress Activities (1942-46) Vol. IV, Govt. of Maharashtra Bombay, 1965.
4. Kunte B.K. Mahatma Gandhi, Vol. III Part V, Govt. of Maharashtra Bombay, 1965.
5. Kunte B.K. Source Material for a History of the freedom movement mahatma Gandhi in Maharashtra (1915-1946) Govt. of Maharashtra, 1980.
6. Mishra Dwarkaprasad, The history of freedom movement in Madhya Pradesh, Govt. Printing M.P. 1956.
7. Pattabhi Sitaramayya, History of Indian, National Congress Vol. II, (1935-1947) S. Chand & Co. Delhi, 1969.

- **हिंदी**

१. बियाणी ब्रिजलाल, शुक्लअभिनंदन ग्रंथ, मध्यप्रदेश हिंदी साहित्य संमेलन, १९५५.

२. श्रीराम श्री. १९४२ की क्रांती, भारती पुस्तक मंदिर आग्रा १९४६.

३. व्यास दीनानाथ, अगस्त सन १९४२ का महान विप्लव, विनोद पुस्तक मंदीर आग्रा १९४६.

४. मिश्रा भगवती प्रसाद, भारतीय स्वातंत्र्य संग्राम मे चंद्रपूर, नरेंद्र मिश्रा, १९८६.

- **मराठी :-**

१. ओक के. य., स्मृतींच्या मशाली, ओंकारप्रसाद मिश्र, चिटणीस, स्मृतींच्या मशाली प्रकाशन समिती, अकोला, १९८६.

२. बजाज जानकीदेवी, माझी जीवनयात्रा - पॉप्युलर बुक डेपो मुंबई, १९६०.

३. बियाणी ब्रिजलाल, १९४२ च्या आंदोलनातील विदर्भातील हुतात्मे, वि.प्रा.हु. स्मारक स. अकोला १९४६.

४. भागवत अनुताई, बिल्वदल, मेधा पब्लिकेशन हाऊस अमरावती, द्वितीय आवृत्ती अमरावती, २०१३.

५. देशपांडे हरीहर वामन, यावलीचा स्वातंत्र्यसंग्राम, शहीद स्मारक समिती यावली, तृतीय आवृत्ती, २०१४.

६. देशपांडे अ.के., अकोला जिल्हयातील स्वातंत्र्यलढा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती मुंबई, १९९२.

७. देशपांडे अ.के., बुलडाणा जिल्हयातील स्वातंत्र्यलढा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई, १९९२.

८. दिघेकर नानासाहेब, अमरावती जिल्हयातील स्वातंत्र्य लढा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई, १९९२.

९. धर्माधिकारी चंद्रशेखर, वर्धा जिल्हयातील स्वातंत्र्य लढा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई, १९९२.

१०. धर्माधिकारी तारा, स्वातंत्र्य लढयातील स्त्री, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती मुंबई, १९९२.

११. गेडाम शंकरराव, स्वातंत्र्य लढयातील नागपूर जिल्हयाचा सहभाग, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई, १९९२.

१२. गुप्ता रमेश, बंडखोर खेडयांची गोष्ट, रामकृष्ण गंजीवाले, १९७६.

१३. हंडियेकर वि.ना., भंडारा जिल्हयातील स्वातंत्र्य लढा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती मुंबई, १९९२.

१४. जोशी दुर्गाताई, विदर्भ कन्या, राजस्थान प्रिटींग अँड लिथो वर्क्स लि. अकोला १९८६.

१५. जोशी यशोदाबाई, आमचा जीवनप्रवास, व्हिनस प्रकाशन पुणे, १९६५.

१६. कडवे रघुनाथ, १९४२ चा आष्टीचा स्वातंत्र्यसंग्राम, संस्कार प्रकाशन नागपूर, १९६८.

१७. काटकर तु. ना., कर्मवीर कन्नमवार, मुंबई, १९६८.

१८. काळे पु.बा. अनुसयाबाई आणि मी, राजहंस प्रकाशन पुणे, २०१४.

१९. कारंजकर भि.दे. अमरावती शहराचा इतिहास, भाग १,२ अमरावती नगरपालिका, १९७८.

२०. कुंटे भ.ग. (संपा), स्वातंत्र्यसैनिक चरित्रकोश, महाराष्ट्र राज्य, विदर्भ विभाग भाग-२, मुंबई, १९७६.

२१. काळे, वा.सी. , लोकनायक बापूजी अणे व भारतीय राजकारण, राम शेवाळकर लो. अणे जन्मशताब्दी समिती, वणी.

२२. काळी रा.वि., दिव्यत्वाची प्रचिती, द.ग. काळी महाल, नागपूर १९८५.

२३. खापर्डे बा.ग. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र, प्रसाद प्रकाशन पुणे, १९६२.

२४. पेशवे बाळासाहेब, मंदाकिनी पेशवे, यवतमाळ जिल्हयातील स्वातंत्र्य लढा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती मुंबई, १९९२.

२५. फडके य. दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड २,३,४,५ के सागर पुणे, दुसरी आवृत्ती २००८.

२६. फाटक न. र. स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश, विदर्भ विभाग, महाराष्ट्र राज्य खंड १,२ मुंबई १९७१.

२७. उदासी बि.ना. (संपा) स्वातंत्र्य संग्रामात वऱ्हाडचे योगदान दे. मुद्रिका प्रकाशन, अकोला १९८६.

**B) दुय्यम साधने (Secondary Sources):-**

- **English :-**


1. Bipin Chandra, amales Tripathi, Barun De, freedom struggle National Book Trust, India, 2010.
2. Choudhari K. K. Maharashtra & Indian freedom struggle silver jubilee Pub. Bombay 1985.
3. Deshpande R.H., India fight for freedom, S.D. Deshmukh, Bombay, 1986.
4. Joshi P. L. Political Ideas and Leadership in Vidarbha Silver Jublies Committee D.P.S. & P.A. Nagpur University, Nagpur 1980.


- **हिंदी :-**


१. चौधरी के.के. भारतीय स्वतंत्रता संग्राम और महाराष्ट्र, महाराष्ट्र शासन मुंबई.

२. देवसरे हरिकृष्ण, स्वतंत्रता के ५० वर्ष, डायमंड पॉकेट बुक्स, १९९८.

३. देशपांडे पा.दि., छोडो भारत क्रांतिदिन १९४२, श्री. दा. मेघरे.

४. वक्काणी नि.आ., आधुनिक विदर्भ का इतिहास, मंगेश प्रकाशन नागपूर, १९८५.

५. सरकार सुमित, आधुनिक भारत, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, १७ वी आवृत्ती २०१०.


- **मराठी :-**


१. अंधारे भा. रा., सोनटक्के श्रीकांत, आधुनिक नागपूर, विश्वभारती प्रकाशन, नागपूर, २०१४.

२. अंधारे भा.रा. कोठेकर शांता (संपा) नागपूर नगरी त्रिशताब्दी ग्रंथ, २००४.

३. देशपांडे सुरेश, स्वातंत्र्य लढयात हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, ह.व्या.प्र.मंडळ, अमरावती १९९४.

४. ढाले नामदेव, स्वातंत्र्य चळवळीत बुलडाणा जिल्हयाचे योगदान, नभ प्रकाशन अमरावती, २०१३.

५. घुमडे गजानन, भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत नागपूर शहराचे योगदान, (१९२०-१९४७) लघुशोध प्रबंध (अप्रकाशित)

६. जावडेकर शं.द. आधुनिक भारत, पुणे, २००१ कॉन्टिनेंटल प्रकाशन, नागपूर २००३.

७. कोडोलीकर पु. द., लोकमान्य टिळक, महा.राज्य.सा. आणि सं. मंडळ, मुंबई, २०१३

८. केळकर श्रीपाद, छोडो भारत कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे १९८३.

९. खरडे राजू, १९४२ च्या चले जाव चळवळीत नाग-विदर्भाचे योगदान (अप्रकाशित शोधप्रबंध) २००२.

१०. मंगळ वेडेकर राजाभाऊ, अखेरची झुंज, अरुण पारगावकर, १९९२.

११. मांडवकर भाऊ, राष्ट्रसंत आणि स्वातंत्र्याची चळवळ, संस्कार प्रकाशन, नागपूर १९९२.

१२. नवाझ मोदी (संपा) वासंती फडके (अनु) भारतीय स्वातंत्र्य लढयातील स्त्रिया, मेहता पब्लिसिंग हाऊस पुणे, २००३.

१३. प्रधान ग. प्र. स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत, पुणे १९७८.

१४. पवार विजय, स्वातंत्र्य चळवळीत नागपूरच्या वृत्तपत्रांची भूमिका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान नागपूर, २०१५.

१५. पाठक दमयंती, वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील सहकार्य, मंगेश प्रकाशन, नागपूर, २००३.

१६. फाटक न.र., लोकमान्य, मौज प्रकाशन, मुंबई, २००६.

१७. प्यारेलाल (ब्रिजमोहन हेडा अनु), महात्मा गांधी अखेरचं पर्व, खंड १ ते ४ पराग एजन्सी अकोला, २००४.

१८. तळवलकर गोविंद, सत्तांतर १९४७, खंड १,२ मौज प्रकाशन मुंबई,१९८३.

१९. ठाकरे आर. एस., आष्टीचा क्रांतीदिन, ऑगस्ट क्रांती समिती १९९२.

२०. वैद्य किशोर, असे झुंजले चिमूर, चिन्मय प्रकाशन, यवतमाळ २००२.

२१. वैद्य सुमन, कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, नागपूर २००९.

२२. वैद्य सुमन, कोठेकर शांता, महाराष्ट्रातील काँग्रेसचा स्वातंत्र्य लढा, सु.दा. देशमुख, महा. राज्य. साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई १९८५.

२३. वाघमारे बी. आर., अमरावती जिल्हयातील स्वातंत्र्य आंदोलन, वेदमुद्रा प्रकाशन अमरावती, २०१३.

२४. वाळींबे वि.स., सत्तावन ते सत्तेचाळीस, राजहंस प्रकाशन पुणे, २००७.

२५. येडेकर श्याम, भारतीय स्वातंत्र्य लढयातील स्त्रियांचे योगदान, महाराष्ट्र मंगला येडेकर, कोल्हापूर २००७.


## C) District Gazetteer


- Nagpur, Wardha, Chandrapur, Bhandara, Amravati, Akola, Yavatmal, Buldhana.


## D) स्मरणिका :


१. स्वातंत्र्य संग्राम शहीद, जिल्हा माहिती अधिकारी अमरावती तर्फे प्रकाशित अमरावती ९ ऑगस्ट १९८१.

२. भारतीय स्वातंत्र्य लढयात विदर्भाचे योगदान, श्री शिवाजी महाविद्यालय अकोट यांच्यातर्फे प्रकाशित (राज्यस्तीय इतिहास परिषद निमित्य) दि. २२ जानेवारी २०११.

३. भारतीय स्वातंत्र्य लढयात निम्नवर्गीय महिलांची भूमिका, कला व विज्ञान महाविद्यालय पुलगाव यांच्यातर्फे प्रकाशित (राज्यस्तरीय इतिहास परिषद निमित्य) दि. १५ फेब्रुवारी २०११.

४. वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्य लढयात व शैक्षणिक कार्यात योगदान, पंढरीनाथ महाविद्यालय, नरखेड यांच्या तर्फे प्रकाशित (राज्यस्तरीय इतिहास परिषद निमित्य) २ फेब्रुवारी २०१३.